# माणूस

शनिवार । ९ ऑक्टोबर १९७६ । साठ पैसे

□ □

नैय्यायिकांचे अनुमान श्रीनिवासशास्त्री यांनी मांडले.
शिवरामकृष्णांनी मीमांसक काय म्हणतात ते सांगितले.
दोघेही पुण्यातील डेक्कन कॉलेजमधील गाढे विद्वान.
सगळी मुलाखत मूळ संस्कृतातून घेतली प्रदीप प्रभाकर गोखले
या तत्त्वज्ञानाच्या तरुण विद्यार्थ्याने.

□ □

## विषय : पुनर्जन्म

□ □

चाळीस वर्षांपूर्वी मानवेन्द्रनाथ रॉय यांनीही या विषयावर तुरुंगात असताना
एक चिकित्सक लेख लिहिलेला होता. या विस्मृतीत गेलेल्या
लेखाचा अनुवाद सादर करीत आहेत, महाराष्ट्रातील एक रॉयवादी
लेखक मा. पं. शिखरे.

□ □

रत्नाकर मतकरी यांनी एका सुशिक्षित, बुद्धिवादी आणि संपन्न कुटुंबातील
सर्व व्यक्तींच्या मुलाखती घेऊन मरणोत्तर अस्तित्वावर प्रकाश टाकणारी
एक प्रदीर्घ सत्यकथा, घडली तसतशी, त्या त्या व्यक्तींच्या तोंडूनच वाचकांना
ऐकविली आहे.

□ □

## माणूस दिवाळी अंक

याशिवाय ....

□ □

.... याशिवाय

साहित्य, विज्ञान, मानवसेवा या क्षेत्रांतील उत्तुंग शिखरांचे दर्शन घडवणारे वेचक आणि वेधक लिखाण.

## श्वाइत्झर अखेरचे पर्व

आफ्रिकन जनतेशी-मातीशी एकरूप झालेल्या अल्बर्ट श्वाइत्झरच्या लॅम्बरीन जंगलातील अखेरच्या करुणोदात्त पर्वाचे अस्वस्थकारी चित्रण

लेखिका : **सुमती देवस्थळे**

☐

## गुस्ताव फ्लॉबर्ट
## आणि
## मदाम बोव्हारी
## एक रसग्रहण

लेखक : **सॉमरसेट मॉम**

अनुवाद : **माधव मनोहर**

☐

## खास विज्ञान पुरवणी

सादरकर्ते : **डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर**

☐

नाट्यविभाग, चित्रपटविभाग, एखाददुसरी निवडक लघुकथा आणि एक महत्त्वपूर्ण कादंबरी

☐

**प्रसिद्धी : १८ ऑक्टोबर**

**किंमत : ६ रुपये**

---

विक्रेत्यांनी मागणी वेळेवर नोंदवावी. वर्गणीदारांनी रजि. पोस्टाने अंक हवा असल्यास, दोन रुपये त्वरित पाठवून द्यावेत. सोबत नाव, पत्ता, वर्गणीदार क्रमांक कळवावा.

# पोलंड

## अन्नकिंमतीचा पेचप्रसंग

वा. दा. रानडे

पोलंडमधील अन्नकिंमतीत वाढ करण्याच्या सर्व योजना तेथील कम्युनिस्ट सत्ताधाऱ्यांनी १९७८ च्या मध्यापर्यंत पुढे ढकलल्या आहेत अशी बातमी 'पोलिटीका' या पोलिश कम्युनिस्ट पक्षाच्या साप्ताहिकाने दिली आहे. देशात या प्रश्नावर आणखी असंतोष निर्माण होऊ नये या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला.

किमतवाढीच्या प्रश्नावर सरकारची व कम्युनिस्ट पक्ष नेत्यांची लोकांपुढे ही दुसरी माघार आहे. गेल्या जूनमध्ये मांसाच्या किमती ६९% पर्यंत वाढविण्यात येईल असे सरकारने जाहीर केले. लोकांनी– विशेषतः कामगारांनी– या भाववाढीविरुद्ध निदर्शने केली, रेल्वेगाड्या अडविल्या. या असंतोषाची तीव्रता पाहून सरकारने भाववाढ स्थगित केली आणि या प्रश्नावर अधिक विचार करून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. मांसाच्या किमतीतील ६९ टक्के वाढ ३५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात आली, पण आता ही मर्यादित वाढही १९७८ च्या मध्यापर्यंत रद्द करण्यात आली आहे. लोकांच्या विरोधाची दखल सरकारला घ्यावी लागली आणि दडपशाहीच्या जोरावर आपला निर्णय अंमलात न आणता तो स्थगित करण्यात आला. कम्युनिस्ट सरकारच्या एखाद्या निर्णयाविरुद्ध नापसंती, असंतोष व्यक्त होऊ लागला, निदर्शने झाली की, प्रतिगामी शक्तींचा हा उठाव असे म्हणून तो दडपून टाकावयाचा ही कम्युनिस्ट राजवटीची नेहमीची पद्धत. यावेळीही या विरोधावर प्रतिगामित्वाचा शिक्का कम्युनिस्ट पत्रातून प्रथम मारण्यात आला, पण विरोध दबत नाही असे दिसताच वस्तुस्थितीची दखल घेणे कम्युनिस्ट राज्यकर्त्यांना भाग पडले.

यापूर्वी १९५६ व १९७० मध्ये पोलंडमध्ये अशीच निदर्शने व उठाव झाले होते. १९५६ मधील निदर्शनांचा उद्रेक स्टॅलिनपद्धतीच्या दहशती राजवटीविरुद्ध होता. क्रुश्चेव्ह यांनी स्टॅलिनवादाच्या निर्मूलनाची मोहीम सुरू केली. त्याचा तो परिपाक होता. या उठावानंतर पोलंडमध्ये गोमुल्कांच्या हाती सत्ता सोपविण्यात आली. ते १९७० पर्यंत अधिकारावर होते. पोलंडला प्रतिक्रांतीपासून त्यांनी वाचविले. रशियन नियंत्रणापासून अधिक स्वायत्तता मिळविण्याचा प्रयत्न केला. पूर्व युरोपातील इतर कम्युनिस्ट देशांच्या मानाने पोलंडमध्ये अधिक स्वातंत्र्य आहे हे बुद्धिजीवीही मान्य करतात. पण त्यांना आणखी स्वातंत्र्य हवे होते. विचारप्रकटनाच्या स्वातंत्र्यासाठी १९६८ मध्ये त्यांनी वाद केला. तो दडपून टाकण्यात आला. बुद्धिजीवींच्या या लढ्यास कामगारवर्गाचा पाठिंबा मिळाला नाही. याची प्रतिक्रिया १९७० साली दिसून आली. सरकारच्या धोरणाविरुद्ध कामगारांनी निदर्शने, उठाव केले, पण बुद्धिजीवी वर्ग त्यात सहभागी झाला नाही. पण बुद्धिजीवींचा पाठिंबा मिळाला नाही तरी, गोमुल्कांना राजीनामा देणे भाग पाडण्यात त्यांनी यश मिळविले. गोमुल्कांचा भर काटकसरीच्या कारभारावर होता. आपले राहणीमान सुधारावे, उपभोगाच्या वस्तू आपणास अधिक प्रमाणात खरेदी करता याव्यात अशी कामगारांची अपेक्षा होती. पण समाजवादाची उभारणी करावयाची तर, काही वर्षे काटकसरीने राहिले पाहिजे. उपभोगांच्या वस्तूंचे उत्पादन, वापर व त्यावरचा खर्च कमी केला पाहिजे, असे गोमुल्का यांचे धोरण होते. पोलंडला कॉफीने भरलेले एक जहाज पाठविण्याची ब्राझीलची तयारी होती, पण त्यासंबंधीच्या करारावर सही करण्याचे गोमुल्कांनी नाकारले. 'समाजवादाची उभारणी करू पाहणाऱ्या राष्ट्राने कॉफी, लेमन यांसारख्या गोष्टीशिवाय राहायला शिकले पाहिजे,' असे ते म्हणत. आर्थिक कारभार त्यांनी अत्यंत शिस्तीने केला. एक पैसा कर्जाचाही बोजा आपल्या मागून येणाऱ्या सत्ताधाऱ्यांवर त्यांनी ठेवला नाही. पण कामगारवर्गात व जनतेत त्यांच्या राजवटीबद्दल असमाधान आणि असंतोष होता. दीर्घकाल साधे, काटकसरीचे जीवन जगण्याचा लोकांना कंटाळा आला होता.

गोमुल्कांच्या राजीनाम्यानंतर गिरेक यांच्याकडे सत्तेची सूत्रे गेली. त्यांनी व्यवहार्थ आर्थिक धोरण आखले. मॉस्कोशी वितुष्ट येऊ न देता आपल्या धोरणांना देशातील सर्व गटांचा पाठिंबा मिळविण्यात त्यांना यश आले. राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचे आश्वासन त्यांनी दिले व ते खरे केले. शेतीच्या क्षेत्रातील कराची पद्धत त्यांनी बदलली आणि आरोग्यसल्लाविषयक सवलतींची योजना सबंध ग्रामीण जनतेस लागू केली. लेखक व कलाकारांना अधिक स्वातंत्र्य दिले. चर्चशीही संबंध सुधारले. पण हे सारे करताना मार्क्सवाद–लेनिनवादाच्या मूलभूत विचारप्रणालीलाच आव्हान दिले जाऊ नये आणि मॉस्कोचा रोष होऊ नये याची दक्षता त्यांनी घेतली. विशिष्ट मर्यादेपलीकडे विचारस्वातंत्र्य व मतभेदांचे प्रकटन त्यांनी जाऊ दिले नाही. पण त्याचबरोबर विचारवंतांशी समझोता करून कम्युनिस्ट भूमिकेतील आग्रहीपणाला शक्य तेथे मुरड घातली. घटनेतील काही संकल्पित दुरुस्त्यांबद्दल ५९ विचारवंतांनी एका निवेदनाद्वारे नापसंती व्यक्त केली होती. 'कम्युनिस्ट पक्ष ही देशातील आघाडीची राजकीय शक्ती आहे,' असे एका दुरुस्तीत म्हटले होते. त्यातील 'आघाडीची' शब्दाऐवजी 'मार्गदर्शक' शब्द सरकारने मान्य केला. 'पोलंडचे रशियाशी अविभक्त आणि अतूट संबंध राहतील,' असे एका दुरुस्तीत म्हटले होते. सुधारित मसुद्यात हे शब्द गाळून टाकण्यात आले. मॉस्कोपासून जास्तीत जास्त स्वायत्तता मिळविण्याच्या भूमिकेचाच हा विजय आहे. असे असले तरी विचारवंतांवरचे सर्व निर्बंध रद्द झाले असा याचा अर्थ नाही. तुमची पुस्तके काही काळ प्रसिद्ध होणार नाहीत, तुम्हाला परदेशी प्रवासास परवानगी मिळणार नाही, असे अनेक लेखकांना कळविण्यात आले आहे.

सर्व गटांचा विश्वास संपादन करणाऱ्या गिरेक यांच्या धोरणाविरुद्ध मग जूनपासून असंतोष का व्यक्त होऊ लागला आहे. अन्नाच्या किमतीचा प्रश्न गोमुल्कांप्रमाणेच गिरेक यांनाही यशस्वीपणे सोडविता आलेला नाही. अन्नकिंमती वाढविण्याचा निर्णय वास्तविक आर्थिक दृष्ट्या योग्य होता. कारण १९७० पासून पगारात ४० टक्के वाढ झाली असता अन्नकिंमतीत मात्र काहीही वाढ झाली नाही. शेतकऱ्यांना सरकार आर्थिक मदत देई, त्याचा अर्थ व्यवस्थेवर बोजा पडला. शेती–उत्पादन वाढावे हा त्यामागचा उद्देश, पण उत्पादनात वाढ होण्याऐवजी उलट घटच झाली. योजनेप्रमाणे शेतीउत्पादनात १९७४ व १९७५ च्या दरम्यान ३७ टक्के वाढ अपेक्षित होती, पण प्रत्यक्षात २.६ टक्के घट झाली. सहा वर्षीपूर्वी गोमुल्कांना याच परिस्थितीला तोंड लागले. अन्नकिंमती वाढविण्याच्या निर्णयाविरुद्ध झालेल्या उठावामुळे गोमुल्कांना सत्ता गमवावी लागली. गिरेक यांनी लोकांची मागणी मान्य करून आपल्यावरचा तो प्रसंग टाळला आहे. पण टाळाटाळ व चालढकल किती वेळ करणार ? आर्थिकदृष्ट्या योग्य निर्णय सरकारला केव्हातरी कठोरपणे अंमलात आणावाच लागेल. □

# सोलकढी

## □ काजवे पाहा–पाहू नका

धृतराष्ट्राच्या शंभर मुलग्यांपैकी दुर्योधन आणि दुःशासन एवढे दोनच आपल्याला ठाऊक आहेत. बाकीच्या अठ्ठयाण्णव कौरवांची नावे आणि चेहरे आपल्याला ठाऊक नाहीत. गेल्या काही वर्षांत 'महाभारत' हा ग्रंथ बाबा कदम यांच्या कादंबऱ्यांइतका लोकप्रिय होऊन राहिला आहे. तरी अजून कोणा उपक्रमशील मराठी कादंबरीकाराने दुर्योधन वा दुःशासन वा दोघेही नायक कल्पून दुर्योधन–दुःशासनायन लिहिलेले नाही. 'त्यामुळे दुर्योधन–दुःशासन खरा कोण होता?' असा शास्त्रीय उपग्रंथ एखाद्या दाजी लेखकाला लिहिता आलेला नाही. या दोन्ही दुर्घटना (येथे शब्दांच्या आरंभी आलेला 'दु' नेहमीसारखा वाईटवंगाळ अर्थ सुचवत नाही; दुर्योधन आणि दुःशासन या दुकलीच्या नावांचे सूचन 'दु' या आद्याक्षरोल्लेखाने करायचे आहे.–येथे अनंतराव दिसतात : पाहा बरे.) लौकरच दिसतील अशी आशा करून प्रस्तुत विषय धृतराष्ट्रपुत्र जो 'प्रदूषण' याच्याकडे वेळीच वळतो. प्रदूषण खरा कोण होता, हे दाजीशास्त्री पणशीकरांनासुद्धा सांगता येणार नाही. मला येईल. पण मी तूर्त एवढेच सांगतो की, प्रदूषण हा धृतराष्ट्राचा एकूणसत्तरावा पुत्र होय : 'दूषणा'च्या पाठचा आणि 'दुर्दूषणा'च्या आधीचा.

प्रदूषणाने आपल्या दोन दुर्नामांकित वडीलभावांसारखा महाभारतात काही प्रताप दाखवलेला नाही. शंभरातला एकूणसत्तरावा असल्यावर प्रताप कोण दाखवू शकेल? अलिबाबा आणि चाळीस चोर यांच्यामधला एकूणचाळिसावा चोर काय चोरी करणार? महाभारतात जे करणे प्रदूषणाला जमले नाही ते त्याने आता फुरसतीने चालवले आहे. फक्त आपल्याकडे अथवा युरोप–अमेरिकेत नव्हे; गोजिरवाण्या जपानमध्येसुद्धा.

महायुद्धातल्या पाडावानंतर जपानने नवी उभारणी करण्याचा कार्यक्रम हाती घेतला तो काहीशा बेभानपणे. त्यामुळे आर्थिक घडी सावरली; पण काही सौंदर्यसंचिते हरवली. उदाहरणार्थ, काजवे. प्रदूषणामुळे जपानमधील काजवे विझून गेले. त्याआधी जपानमध्ये अंधारभर काजवे असायचे. मुद्दाम काजवे पाहण्यासाठी सहली निघायच्या. काजवे म्हणजे दिवंगत सामुराईंचे आत्मे, अशी समजूत होती. मच्छरदाणीत काजवे सोडून, त्या लुकलुकत्या चिमुकताऱ्यांकडे पाहत जपानी पोरे झोपी जायची. आता पोरांना काजवे पाहायला मिळत नाहीत. जपानच्या अकरा कोटी लोकसंख्येपैकी आठ कोटी लोक शहरांतून राहतात. शहरात काजवे नाहीत. खेड्यांतूनसुद्धा ते तुरळकले आहेत.

हे बरे नव्हे असे काही शहाण्यांना वाटले. पोरांना टी. व्ही. द्यायचा तसे काजवेसुद्धा द्यायला हवेत; वाढलेल्या पोरांनी सिगरेटी ओढण्याआधी, बिअर पिण्याआधी, लूप वापरण्याआधी काजवे पाहून ठेवायला हवेत, असा विचार त्यांनी केला. मग त्यांनी पद्धतशीरपणे काजव्यांची पैदास चालू केली. आता वर्षातील ठराविक रात्री ठराविक विभागातून हे काजवे, वीज किंवा पाणी खेळवावे तसे, खेळवले जातात. काजवे पाहिल्यावर जपानी पोरांचे जे व्हायचे ते होते. त्यात अजून तरी काही बदल झालेला नाही.

आमच्या लोकशाही भारतात मुळात हे प्रदूषणाचे झेंगट नाही. प्रदूषणाशिवाय प्रगती घडवून आणण्याचा एक अभिनव प्रयोगच येथे चाललेला आहे. भौगोलिक प्रदूषणाचे सोडा; जगात आज सांस्कृतिक प्रदूषण केवढे हिडिस चालले आहे ते पाहा. आमच्याकडे तेही नाही हो. काजव्यांबद्दल म्हणाल, तर काजवे पाहू नका एवढे आमच्या मुलांना नुसते सांगितले तर, काजव्यांसकट लुकलुकणारे काहीच आमची मुले पाहणार नाहीत. अशी मुले राष्ट्राचा भविष्यकाल उज्ज्वल करतात. ◻

## □ परग्रहस्थ पाहुणा

मोठी माणसे मोठी नेमकी कशी होतात, याचे मला नेहमी आश्चर्य वाटत आलेले आहे. मोठ्या माणसांना मात्र त्याचे काहीच वाटत नाही. उंटाला आपल्या एक वा दोन मदारींचे ओझे होऊ नये किंवा गेंड्याला आपली एक वा दोन शिंगे बोचक होऊ नयेत तसे मोठ्या माणसांना आपल्या मोठेपणाचे ओझे होत नाही किंवा तो बोचकही होत नाही. काही मोठी माणसे पाळण्यात मोठी होतात; काही मोठी माणसे शाळेत मोठी होतात; काही मोठी माणसे चाकरीत मोठी होतात; काही मोठी माणसे तुरुंगात मोठी होतात; काही मोठी माणसे खुर्चीत मोठी होतात; काही मोठी माणसे मृत्युलेखात मोठी होतात.

लहान माणसांचे काहीच होत नाही; मोठ्या माणसांची चरित्रे होतात. चरित्रलेखक मोठ्या माणसांच्या मोठेपणाचा सूक्ष्म अगर बृहद्दर्शकातून शोध घेतात : अलौकिक-मोठेपणाची लोकिकलव्री कारणे सांगतात. ते सांगणे अतोनात कंटाळवाणे होते. ब्रिटनमध्ये नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका चरित्रलेखकाने ते छान टाळले आहे.

चरित्रनायक आहे युरी गेलर. या इस्रायली माणसाकडे अद्भुत अतींद्रिय शक्ती आहे. आपल्या दृष्टिक्षेपाने तो पोलादी वस्तू वाकवू शकतो; घड्याळ बंद पाडू शकतो, बंद पडलेले चालू करू शकतो. त्याच्या स्पर्शाने वस्तू आपले गुणधर्म बदलतात. अगदी नोबेल–पारितोषिकविजेत्या शास्त्रज्ञांनी युरी गेलरची परीक्षा घेतली आहे, आणि त्यांची खसखस झाली आहे. त्याच्या अलौकिक शक्तीचा प्रत्यय त्यांना निखालस आला; पण तिची लौकिक कारणे शोधताना त्यांना थुई घालून बसावे लागले.

चरित्रलेखक असा बसला नाही. वास्तविक तोसुद्धा मानसशास्त्रज्ञ वगैरे आहे. पण अलौकिकाची कारणे कधीकधी अलौकिकसुद्धा असतात, हे त्याला ठीक उमजले आहे. म्हणून युरी गेलरची शक्ती पार्थिव नाही, तो मुळी पृथ्वीपुत्रच नाही; तो कोणत्यातरी दुसऱ्या एखाद्या ग्रहावरून पृथ्वीवर अवतरलेला परग्रहस्थ पाहुणा आहे, असा त्या चरित्रलेखकाचा सिद्धान्त आहे. हा परग्रहस्थ पाहुणा येथे कशाला कडमडायला आलाय, असा प्रश्न तुम्ही विचारणारच. तेव्हा विचारा. त्याचे उत्तर असे आहे की, परग्रहस्थ शत्रू पृथ्वीवर स्वारी करायची तयारी करत असून युरी गेलर हा त्यांचा बहिर्जी नाईक आहे, आणि अधूनमधून अनंतरावांसारख्या काही डोळसूंना दिसणाऱ्या उडत्या तबकड्या ही त्यांची टेहळणीयाने आहेत.

हे चरित्र देखमाल खपेल. कारण विकत घेऊन पुस्तके वाचणारे परग्रहस्थ वाचकसुद्धा ते वाचू पाहतील.

–अनंतराव

# ऑपरेशन एन्टेबी

## इस्राएलची गरुडझेप । रवींद्र गुर्जर

युगांडाच्या एन्टेबी विमानतळावरील रोमहर्षक मुक्तिनाटयामुळे इस्राएलची मान जगात अधिक उंच झालेली आहे. इदी अमीनने मात्र स्वतःची नाचक्की करून घेतली, या घटनेचे बरे–वाईट पडसाद पुढे उमटल्याशिवाय राहणार नाहीत.

रविवार दिनांक २७ जून १९७६ तेल अवीव्हहून निघालेले एअर फ्रान्सचे विमान वाटेत अथेन्सला उतरले. पुढे ते पॅरिसकडे वळण्या-ऐवजी भलत्याच दिशेला चालले. पॅलेस्टाईन मुक्ति आघाडीच्या काही गनिमांनी विमानाचा अचानक ताबा घेतला. २६३ प्रवाशांचे जीवन धोक्यात आले. दुसऱ्या दिवशी पहाटे विमान एन्टेबी तळावर उतरले. युगांडाने गनिमांना आसरा दिला. त्यांनी इस्राएलमधील ४० गनीम कैद्यांच्या सुटकेची मागणी केली. नाहीतर विमान आणि ओलिस ठेवलेल्या लोकांना खलास करण्याची धमकी त्यांनी दिली.

इस्राएलमध्ये तातडीची बैठक पंतप्रधान राबिन यांनी बोलावली. विचारविनिमय सुरू झाला. गनिमांनी दिलेली मुदत फार थोडी होती. परिस्थितीचा पूर्ण अंदाज नव्हता. इस्राएलच्या १०४ निरपराध नागरिकांच्या जीवनाचा सवाल होता, पण त्यासाठी दहशतवादालाही बळी पडायचे नव्हते. चक्रे जोरात सुरू झाली. गुप्तहेर खात्याने आवश्यक माहिती त्वरेने गोळा केली. विमानतळाचा नकाशा व फोटो, गनिमांची वर्णने आणि उतारूंचा तपशील जमा झाला. इदी अमीनचा या कृष्णकृत्यात हात असावा याची खात्री झाली. आणि एन्टेबी विमानतळावर धोका पत्करूनही गरुडझेप घेण्याचा इस्राएल सरकारने निर्णय घेतला.

रंगीत तालीम सुरू झाली. त्या दरम्यान चाच्यांनी मागणीची मुदत ४ जुलैपर्यंत वाढवून दिली होती. युगांडाची मिग विमाने नष्ट करण्याच्या अटीवर केनियाने मदतीचे आश्वासन दिले. प्रात्यक्षिके जोरात सुरू होती. कैद्यांची देवघेव करण्यास इस्राएलने मान्यता जाहीर केली. वस्तुतः तो एक डाव होता.

३ जुलैची रात्र. तीन विमाने एन्टेबीवर घिरटया घालू लागली. इस्राएलमधील ४० कैदी घेऊन फ्रान्सचे विमान आले आहे, असा बहाणा त्यांनी केला. विमानतळावर दिवे लागले. विमानातून हुबेहूब इदी अमीनसारखी गाडी बाहेर पडली. आत अमीनच्या चेहरेपट्टीचा एकजण बसला होता. आणखी एक जीपही तळावर धावू लागली. गोळीबार सुरू झाला. युगांडाचे अनेक सैनिक त्यात बळी पडले. जुन्या विमानतळावरील इमारतीमध्ये सर्व उतारू आणि गनीम होते. गनीम सावध होण्यापूर्वीच त्यांना ठार करण्यात आले. इस्राएलचा एक कमांडर मात्र या ऑपरेशनमध्ये कामी आला. ऐनवेळच्या गोंधळामुळे आणि भीतीमुळे तीन ज्यू उतारू मृत्युमुखी पडले. त्वरेने सर्व ज्यू नागरिकांना विमानात चढवण्यात आले. निघण्यापूर्वी शब्द दिल्याप्रमाणे तळावरील दहा मिग विमाने नष्ट करण्यात आली. ४ जुलैला सकाळी ११॥ वाजता तेलअवीव्हला विमाने सुरक्षितपणे पोचली. पुढे एक आठवडा इस्राएलमध्ये आनंदोत्सव चालू होता.

विमानाच्या अपहरणानंतर गनिमांच्या मागण्यांचा पुरस्कार इदी अमीन टेलिफोनवरून इस्राएलच्या कर्नल बार-लेव्हशी करत होता. बारलेव्ह हे पूर्वी युगांडात सैनिकांना प्रशिक्षण देण्यासाठी काही वर्षे राहिलेले होते. त्यांची अमीनशी चांगली दोस्ती झाली होती. त्यामुळे फोनवरून इस्राएलच्या वतीने त्यांनी शिष्टाई चालू ठेवली होती. 'ऑपरेशन' ची तयारी होईपर्यंत वेळ काढणे न शक्य झाल्यास सामोपचाराने उतारूंची मुक्तता करणे हे त्यांचे धोरण होते. परंतु अमीन स्वतः त्या प्रकरणात गुंतलेला असल्यामुळे त्याने दाद दिली नाही. त्या दोघातील वाटाघाटीचे फोनवरील संभाषण टेपरेकॉर्डवर ध्वनिमुद्रित करण्यात आले. त्याचा गोषवारा या लेखात दिलेला आहे.

तडजोडीची इच्छा नसल्यास सरकारी पातळीवर संभाषण किती कृत्रिम, पोकळ व औपचारिक होते, आणि त्यात सदिच्छेचा भ्रामक देखावा कसा निर्माण करता येतो याचे हे उत्तम उदाहरण आहे. तेल अवीव्ह शहराबाहेरील आपल्या प्रासादामधून कर्नल बारलेव्ह यांनी युगांडांच्या अध्यक्षांना फोन लावला......

## इदी अमीनचा मानभावीपणा

### (दि. ३० जून १९७६ वेळ दुपारी २)

बार–लेव्ह : प्रेसिडेंट ?

अमीन : कोण बोलतंय ?

बार–लेव्ह : कर्नल बार–लेव्ह.

अमीन : कसं काय, दोस्त ?

बार–लेव्ह : आपण कसे आहात, सर ?

अ. : आज तुमचा आवाज ऐकून मला खूपच आनंद होतोय.

बा. : मी माझ्या घरून बोलतोय. नुकतीच मला ती घटना समजली. दोस्त, तुम्ही एक गोष्ट करू शकाल ?

अ. : जरूर, कारण तुम्ही माझे चांगले मित्र आहात.

बा. : दोस्त, तुम्हाला एक महान शांतिदूत म्हणून इतिहासात नाव मिळण्याची मोठी संधी आलेली आहे. इंग्लंड, अमेरिका व युरोपमध्ये काही लोक तुमच्याबद्दल वाईट लिहितात. तुम्ही लोकांचा

मुक्त करून त्यांना दाखवून द्या की, तुम्ही शांततेचे भोक्ते आहात. इतिहास तुमची मोठ्या व्यक्तींत गणना करील. वायरलेसवरून तेथील हकिगत समजल्यानंतर आज सकाळी माझ्या मनात हे विचार आले.

अ. : 'पॉप्युलर फ्रन्ट' शी मी यशस्वी बोलणी केली आहेत. त्यांनी ४७ ओलिस उतारूंना सोडून दिले आहे. अर्थात अजूनही त्यांच्या ताब्यात १४५ इस्रायली व ज्यू आणि इतर बंदीही आहेत. एकूण २५०......मी त्यांतील ४७ जणांना सोडवून फ्रेंच राजदूताचे ताब्यात दिले आहे. आज दुपारी पाच वाजता रेडिओ युगांडा मुद्दाम ऐका.

बा. : इस्रायली लोकांचे काय ?

अ. : बाकीच्या लोकांना पॉप्युलर फ्रन्टच्या लोकांनी पुरता गराडा दिलेला आहे–ते म्हणतात की इस्राएल सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत, तर उद्या दुपारी १२ वाजता ते फ्रेंच विमान उडवून देणार आहेत, आणि सर्व उतारूंना ठार करणार आहेत. म्हणून दोस्त, मी असं सुचवतो की राबिन यांना कळवा–जनरल राबिन, पंतप्रधान, मी त्यांना चांगले ओळखतो–ते माझे मित्र आहेत आणि जनरल दायान, सरकारमध्ये नसले तरी ते माझे मित्र आहेत; अडकलेल्या लोकांना मुक्त करण्यासाठी तुमच्या सरकारने तावडतोब शक्य ते केले पाहिजे. ही पॅलेस्टाइन लोकांची मागणी आहे. मला जेवढे करता येईल ते जास्तीत जास्त मी करत आहेच. गाद्या, पांघरूणे, जेवण, वैद्यकीय देखरेख इत्यादी. एकजण कोणीतरी रुग्णालयात आहे आणि डॉक्टरांच्या सांगण्यानंतर पॅरिसला रवाना होईल. तुम्ही शक्य ते सर्व प्रयत्न करा, असं माझं म्हणणं आहे. थोडया वेळापूर्वीच मी सर्व इस्रायली लोकांशी बोललो, आणि ते फारच खुशीत आहेत. त्यांचे शब्द टीव्हीसाठी रेकॉर्ड करण्यात आलेले आहेत. त्यांनीच मला हा संदेश सरकारला ताबडतोब पाठवण्यास सांगितले आहे.

बा. : मि. प्रेसिडेंट, तुम्ही देशाचे शासक आहात. त्या सर्व लोकांना सोडण्याची शक्ती तुमच्यात आहे. इतिहासात एक थोर व्यक्ती म्हणून तुमचा नावलौकिक होईल.

अ. : तुम्ही माझे मित्र आहात हे लक्षात घ्या... अमेरिकन वार्ताहरांना मी सांगितले की बार–लेव्ह माझे मित्र आहेत. तुमची गाठ घेण्यास मला फार आनंद होईल, कारण मी तुम्हाला चांगले ओळखतो. इस्राएल आणि अरबांमध्ये शांतता घडवून आणण्यास माझी तयारी आहे. हे तुम्ही तुमच्या सरकारला लगेच सांगा. माझ्याकडून एखादी मदत हवी असल्यास मला तसे लगेच कळवा. पॅलेस्टाईन लोकांच्या मागण्या मान्य करून इस्रायलींचे प्राण वाचले पाहिजेत. तुमच्या सरकारकडून फ्रेंचांमार्फत असे निवेदन लगेच पाठवून द्या.

बा. : त्या लोकांना ठार करण्यापासून तुम्ही परावृत्त करू शकाल काय ?

अ. : मी त्यांना थांबवू शकेन, जर तुमच्या सरकारने त्यांच्या मागण्या तावडतोब मान्य केल्या तर...आता ते मला बोलावत आहेत. त्यांचा अंतिम निर्णय पाच वाजता जाहीर करण्यात येईल. उद्या दुपारी बारा पूर्वी काहीतरी करणे जरूर आहे. नाहीतर ते विमान पेटवून देतील आणि सर्व उतारूंना ठार करतील. तुमच्या सरकारने हे थांबवले पाहिजे.

बा. : मि. प्रेसिडेंट, तुमची आई तुम्हाला आठवत असेल. मरण्यापूर्वी तिने तुम्हाला सांगितले होते की, पवित्र भूमीवरील इस्राएलच्या लोकांना तुम्ही मदत केली पाहिजे. तुम्हाला मोठे आणि पवित्र म्हणवून घ्यायचे असेल, इतिहासात नाव मिळवायचे असेल आणि काय सांगावे–नोबेल पारितोषकही प्राप्त करावयाचे असेल, तर या लोकांना वाचवा...ही महान संधी तुम्हाला मिळत आहे. ईश्वरानेच ती तुम्हाला दिली आहे. सर्वांना तसे दाखवून द्या.

अ. : कसा काय आहेस, मित्रा ? तुमची पत्नी कशी आहे ?

बा. : सर्व काही ठीक आहे. मी तुम्हाला भेटावे काय ?

अ. : तुम्हाला भेटण्यात मला आनंदच होईल.

बा. : मी तिथे येईपर्यंत त्यांना ठार करण्यापासून तुम्ही थोपवू शकाल काय ?

अ. : तुमच्या सरकारला भेटून तुम्ही उद्या मला त्याचे उत्तर कळवू शकाल काय ?

बा. : ठीक आहे, दोस्त, मी मागाहून पुन्हा तुमच्याशी बोलेन.

अ. : मला केव्हाही फोन करा. मी वाट बघतो... मी विमान तळावरूनच बोलत आहे. तीन दिवस मी झोपलेलो नाही. या लोकांचे प्राण मला वाचवायचे आहेत.

त्याच रात्री ११·०५ ला दोघांच्यात फोनवरून पुढील संभाषण सुरू झाले.

बार-लेव्ह : माझ्या एका मित्रामार्फत तुमचा सल्ला मी सरकारला कळवलेला आहे...तो म्हणतो की, तुमच्या सूचनेची त्यांनी नोंद घेतली असून त्याप्रमाणे फ्रेंच सरकारमार्फत ते पुढील व्यवस्था करतील. मी तुम्हाला समक्ष भेटण्याच्या प्रयत्नात आहे...

अ. : तुम्ही इथे याल तर, आपल्या घरी असल्यासारखे तुम्हाला वाटेल. कारण तुम्ही माझे चांगले मित्र आहात. कोणीही तुम्हाला इजा करणार नाही.

बा. : माझा तुमच्यावर आणि देवावर विश्वास आहे, बाकी कोणावरही नाही.

अ. : माझ्या मुलीने, शारोनने तुम्हाला नमस्कार कळविला आहे.

बा. : थँक यू, सरकार. मी तिथे येऊन तुमची भेट घेईपर्यंत सर्व लोकांच्या सुरक्षिततेची उपाययोजना तुम्ही घ्याल ना ?

अ. : पॅलेस्टाइन पॉप्युलर फ्रंटचा नेता सध्या माझ्याजवळच आहे. तो नुकताच इथे आलेला आहे. तोच अंतिम निर्णय घेणारा आहे. चाळीस मिनिटांपूर्वी त्याने मला सांगितले की, उद्या सकाळी युगांडा वेळेप्रमाणे दहा वाजण्यापूर्वी उत्तर न आल्यास त्याच्या निर्णयात बदल होणार नाही.

बा. : महाराज, मी तुम्हाला भेटण्याच्या प्रयत्नात आहे. मला जेव्हा सर्व समजले तेव्हा मी म्हणालो, 'आता माझे मित्र इदी अमीनदादा यांना उत्तम संधी मिळालेली आहे. काहीतरी मोठे करून दाखवण्याची सर्वश्रेष्ठ संधी. सर्वजण तुमचा गौरव करतील. कृपया, हा रक्तपात थांबवा. मी तिथे समक्ष आल्यावर आपण दुसरा काहीतरी मार्ग काढू.

अ. : पण त्यांनी १४५ ज्यूंना आता एकत्र आणलेले आहे. त्यांच्याभोवती ते स्फोटक पदार्थ ठेवणार आहेत, म्हणून उत्तर ताबडतोब दिले पाहिजे.

बा. : मी एक खाजगी माणूस आहे...तुम्हाला जर आठवत असेल तर मी तुम्हाला नेहमीच चांगला सल्ला दिलेला आहे. एकदाही वाईट सल्ला दिलेला नाही, खरं ना?...देश तुमचा आहे आणि तुम्ही अध्यक्ष आहात, सर्वसत्ताधीश आहात. काही विपरीत घडलं तर तुम्हाला दोष दिला जाईल आणि लोकांना वाचवलं तर तुम्ही पवित्र मानले जाल. सध्या परिस्थिती कशी आहे, महाराज !

अ : त्यांनी नकार दिला आहे. सगळ्यांना त्यांनी गराडा दिला आहे. विमान, सर्व उतारू आणि भोवतालच्या युगांडा सैन्याला उडवून देण्याची भाषा ते करत आहेत...

बा : होय, माझ्या ध्यानात आलं. त्यांच्याकडे एवढं स्फोटक द्रव्य असेल असं मला वाटत नाही. विमानातून एवढ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ ते कसे आणू शकतील ? आपण लक्षात घ्या की, ज्या खुनी लोकांच्या सुटकेची ते मागणी करत आहेत, त्यांनी कित्येक हत्त्या केलेल्या आहेत. त्यांनी बायकामुलांना ठार केलेले आहे. तुम्हाला ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या माणसाला तुम्हीही केव्हाच मुक्त करणार नाही. खुनी लोकांना सोडण्यासाठी इथल्या लोकांची समजूत पटवणे सोपे नाही. तुम्ही खरेखुरे सैनिक आहात, म्हणून मी एवढं बोलत आहे. तुम्ही कधीच माघार घेणार नाही. तुमच्या देशातही अशा प्रकारचा निर्णय तुम्ही कधी घेणार नाही.

अ : तुमच्या म्हणण्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. पण आता परिस्थिती फार गुंतागुंतीची झाली आहे. कारण या लोकांनी अंगावरूनही मोठ्या प्रमाणात टी. एन्. टी. स्फोटक द्रव्य आणलेले आहे—त्यामुळे परिस्थिती गंभीर आहे.

बा : तुमच्याकडे येण्यास मला आणखी एकदोन दिवसच लागतील...निदान दोन दिवस तुम्ही त्यांना थोपवू शकाल काय ?

अ : पण त्यांनी ठाम नकार दिलेला आहे. उद्या दहा ते बारा ही अखेरची वेळ. माझ्यासाठीही ते थांबणार नाहीत. सर्व लोकांसह ते आत्महत्त्या करतील, असे त्यांचे म्हणणे आहे. तशी सर्व व्यवस्था त्यांनी केलेली आहे.

बा : सर्व लोक कोठे आहेत—विमानात का हॉटेलमध्ये. ते झोपतात कुठे ?

अ : ते एन्टेबीच्या जुन्या विमानतळावर आहेत...आम्ही आधुनिक विमानतळ बांधलेला आहे...जुन्या तळावर फक्त एकच इमारत आहे. आणि तिथेच त्यांना—ओलीस असलेल्या लोकांना—ठेवलेले आहे. तिथे कोणतेही विमान नाही. सर्व विमाने हलवण्यास त्यांनी सांगितले. सर्व एअर फोर्स आता एन्टेबी बाहेर आहे. जागेच्या आजूबाजूला त्यांनी स्फोटक पदार्थ ठेवलेले आहेत. आत आणि बाहेर त्यांच्या दोन दोन ओळी आहेत. विमानातून येताना खोक्यांमधून त्यांनी हे सर्व पदार्थ आणले. मला वाटतं विशिष्ट लोकांनी, कदाचित अथेन्समधल्या असतील, ती खोकी न तपासण्यास मान्यता दिली...

बा : फ्रेंच विमान सध्या कुठे आहे ?

अ : इथे माझ्याजवळच त्यांचे खूप लोक आत स्फोटक पदार्थ घेऊन बसलेले आहेत. विमान उडवण्याची तयारी त्यांनी केलेली आहे. तुमच्या सरकारला सांगून त्या लोकांची—ज्यांना तुम्ही गुन्हेगार म्हणता—मुक्तता करून मला मदत करा...२०० हून अधिक लोकांचे प्राण वाचवणे केव्हाही चांगले...प्रत्येकाला ठार करण्याचा त्यांनी निश्चय केलेला आहे. प्रथम विमान पेटवून नंतर ते स्फोट घडवून *सर्वांना एकदम ठार करणार आहेत.* ते म्हणतात की, *युगांडा तळावर* बाहेरचे एकही विमान आले तरी, त्याक्षणी ते सर्व काही पेटवून देतील....

हे सर्व संभाषण बार—लेव्हच्या मनात ताजे असतानाच दुसऱ्या दिवशी इदी अमीनचा आवाज पुन्हा त्यांच्या कानावर पडला. या खेपेला अनावश्यक प्रास्ताविक झाले नाही. सुरुवातीलाच अमीनने सांगून टाकले की, पॅलेस्टाईन मुक्ति—आघाडीतर्फे ११ वाजता निवेदन प्रकट होणार होते. इस्राएल सरकारने ते ऐकलेच पाहिजे.

बार—लेव्ह : सर, 'आघाडी'ची अधिक माणसे युगांडामध्ये कशी काय दाखल झाली ? विमानात फक्त सहाजण होते आणि आता जास्त लोक तिथे आहेत...वीस किंवा अधिकच...ते कुठून आले ?

अमीन : ते विमानातचं होते. एकूण तीसजण जगाच्या सर्व भागातून त्या वेळी विमानात आले होते. दुसऱ्या विमानातून युगांडात एकहीजण आलेला नाही. तुमच्या माहितीसाठी सांगतो की, अडकलेल्या सर्व लोकांना बसमध्ये घालून मी दुसऱ्या दिशेला नेत होतो पण गनीमांना जुन्या विमानतळावर सर्वांना न्यायचे होते. माझी स्थिती फार कठीण झाली आहे; जेवढे मला करता आले ते मी केलेले आहे. आणि तुमचे इस्राएल सरकारच त्या सर्व लोकांच्या दुर्दैवाला जबाबदार आहे. इतर देशांचे नागरिकही निष्कारण त्यांच्या तावडीत सापडले आहेत...

बा : नॅशनल फ्रंटच्या लोकांच्या चिथावण्याला बळी पडू नका. ते लोक तुमच्या शेजारी आहेत आणि म्हणून वाट्टेल त्या कथा तुम्हाला सांगत आहेत.

अ : मुक्तिचळवळीचा माझ्यावर प्रभाव पडलेला नाही. मीच स्वतःचे निर्णय घेतो...तुम्ही माझ्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे. माझा मान अपमान तुम्ही करता कामा नये. आताच तसा तुम्ही केलेला आहे. अपहरण करणाऱ्या लोकांना, त्या गुन्हेगारांना असं तुम्ही कसं म्हणू शकता...

बा : मला तुमच्याबद्दल तीन गोष्टी माहीत आहेत—एक म्हणजे तुम्ही थोर सैनिक आहात, युगांडांचे थोर नागरिक आहात, आणि देवावर श्रद्धा ठेवणारे आहात. यामुळेच तुम्ही हत्त्या व रक्तपात थांबवू शकता. कोणीही तुम्हाला आज्ञा करू शकत नाही. तुमच्या नागरिकांच्या भल्यासाठी तुम्ही सदैव जागता आणि ईश्वराची सत्ता मानता. बाहेरच्या प्रांतातील लोकांना तुमच्या देशाच्या भूमीवर कोणतीही गोष्ट करण्याचा अधिकार नाही.

अ. : बंदिवान लोकांभोवती त्यांनी स्फोटक साठा ठेवलेला आहे. माझ्या सैनिकांना त्यांनी दूर पिटाळले आहे. आणि सर्व उतारूंचे प्राण त्यांच्याच हातात आहेत.

ब. : तुम्ही त्यांना सांगू शकता की, त्यांच्या ताब्यातील लोक तुमचे पाहुणे आहेत आणि तुमच्या देशाला त्यांनी अडचणीत आणू नये...इस्राएलमध्ये 'आघाडी'च्या लोकांना असे काहीही करण्यात यश आलेले नाही. त्यांच्याजवळ स्फोटक पदार्थ असूनही; कारण त्यांना विरोध करण्यात आला. तुम्ही आणि तुमच्या शूर सैन्याला सहा किंवा दहा लोकांवर विजय मिळवता आला नाही, असा युक्तिवाद जग कधीच मान्य करणार नाही...

अ. : तुमचं म्हणणं असं आहे की, ते लोक तुमच्या देशात यशस्वी झाले नाहीत आणि मी त्या लोकांना ठार करू शकतो. असंच ना ?

ब. : तुम्ही त्यांना निवारा देत आहात. ते युगांडामध्ये एखाद्या हॉटेलप्रमाणे राहत आहेत. पॅलेस्टाईन आणि अरबांचे तुम्ही मित्र आहात. म्हणून, त्यांनी तुम्हाला अवघड परिस्थितीत टाकून त्रास देऊ नये. युगांडामध्ये त्यांनी काहीही हालचाल करावी आणि युगांडाला त्याचे परिणाम भोगावे लागावेत, असे बेपर्वाईचे विचार त्यांनी करू नयेत. तुम्हीच फक्त त्यांचा विचार करावा आणि त्यांनी तुमच्या समस्यांकडे दुर्लक्ष करावे, हे योग्य नाही. म्हणून मला वाटतं

की ते भलतीच गोष्ट करणार नाहीत.–जर फिल्ड मार्शल जनरल इदी अमीनने त्यांना काहीही न करण्याची आज्ञा दिली, आणि एक दिवस थोपवलं तर...तोपर्यंत मी तिथे येऊ शकेन.

अ. : मी तुम्हाला एवढंच सांगतो की ते हॉटेलसारखे इथे राहत नाहीत. ते कैदीलोकांसमवेत आहेत, आणि मी काहीही कृत्य केलं तर उतारुंचे प्राण धोक्यात येतील. ते सर्वजण एकत्र जेवतात. ते माझे पाहुणे नाहीत. ते माझे मित्र आहेत हे मी मान्य करतो. मला पॅलेस्टाईनमध्ये शांतता हवी आहे. आपण शांतता कशी निर्माण करू शकू ! ती तुमच्या सरकारची जबाबदारी आहे. तुम्ही तुमचं धोरण बदललं पाहिजे. पॅलेस्टाईनमध्ये शांतता निर्माण होण्यासाठी तुम्ही सर्व प्रयत्न केले पाहिजेत.

दहशतवाद्यांनी दिलेली अंतिम मुदत अधिक वाढवून घेण्यासाठी बार-लेव्हने संभाषणातून केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. त्या विषयावर चर्चा करण्यास अमीनने नकार दिला. 'आघाडी' ने अकरा वाजता निवेदन केल्यानंतर बार-लेव्हने पुन्हा फोन करावा असे त्याने सुचविले.

रविवार, दिनांक ४ जुलै १९७६. एन्टेबी विमानतळावरून इस्राएलने अडकलेल्या आपल्या सर्व नागरिकांची साहसी सुटका घडवून आणली. सर्वजण सुरक्षितपणे आपल्या देशात परतले. देशात आनंदोत्सव सुरू झाला. त्याच वेळी बार-लेव्हने अमीनच्या घरचा फोन क्रमांक फिरवला. सुमारे दहा मिनिटांनंतर पलिकडून अध्यक्षांचा आवाज आला. बार-लेव्ह: मनःपूर्वक धन्यवाद !

अमीन : ( आश्चर्याने ) धन्यवाद ? कशाबद्दल ? मी अजून काहीही केलेले नाही. पॅलेस्टानच्या मागण्या तुम्ही मान्य केल्या पाहिजेत, नाहीतर अडकलेल्या लोकांना तुम्ही मुकाल.

बार-लेव्ह स्वताशीच हसला. एन्टेबी विमानतळावर आदल्या रात्री घडलेल्या घटनेचे वृत्त अध्यक्ष अमीन यांना कळवण्याचे धैर्य तेथील कोणातही नव्हते.

तीन तासांनंतर टेलिफोनची घंटा पुन्हा वाजली. इदी अमीन लाईनवर आला होता. थरथरत्या आवाजात तो म्हणाला, 'मैत्रीने दगा दिलेला आहे.' त्याने बार-लेव्हला सांगितले, 'तुम्ही तुमच्या सरकारला कळवलेच पाहिजे, की त्यांचे हे कृत्य लांछनास्पद आहे.'

खरे लांछनास्पद कृत्य कोणाचे होते ? □


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

# कायदा आंधळा असतो !

## पु. ल. इनामदार

जानरावबाबा पाटलांचे नाव वऱ्हाडमध्ये अकोट तालुक्यात, कुणालाही माहीत नाही असे नव्हते. सत्तरी उलटलेले, परंतु भरदार शरीराचे. श्यामल मातीच्या आखरच्या मोठ्या शेतवाडीचे पंच, गव्हाण-जवळच्या एका गावचे पाटीलबाबा. मनाचे माळकरी, विठोबाच्या उंचीचे नि शरीराचे. फरक केवळ एवढाच की, हा विठोबा जरासा आडव्या अंगाचा, पांढऱ्या झुलपांचा नि ओठांवर भरघोस केसांच्या कल्ल्यांपर्यंत पसरलेल्या मिशांचा म्हातारा. डोक्यावर मळकट रंगाचे तांबडे पागोटे, अंगात शुभ्र पैरण, कमरेला जाडसे, गुलाबी रंगावर आलेले काचा मारलेले धोतर गुडघ्याखाली उतरलेले, पायांत जाडजूड वहाणा. कमरेला एक उपरणे गुंडाळलेले, तसेच खांद्यावरही घडीचे उपरणे, हातात चांदीच्या मुठीची जाडजूड, परंतु खाकेपर्यंतच्या उंचीची काठी. चालणे कसे आखाड्यातल्या उस्ताद पैलवाना-सारखे. चावडीवर पाटीलबाबा येऊन बसले म्हणजे सावळे, राजबिंडे रूपाचे राजेसाहेब येऊन बसल्यासारखे वाटायचे. सगळ्या गावालाच काय, पण आसपासच्या कित्येक खेड्यांतून पाटीलबाबा सगळ्यांना आपल्या पाटीलकीच्या धाकाजरबेपेक्षा आजोबांच्या आपुलकीने जवळचे वाटायचे. महार वतन-दारापासून तो सधन शेतकऱ्यांपर्यंत, अगर-ख्याशी झोंबणाऱ्या लहान मुलांपासून तो आखाड्याची माती अंगावर मिरविणाऱ्या उमेदीच्या तरुणापर्यंत, निंदणे-खुरपणे इत्यादी कामे करणाऱ्या बायकांपासून तो चांगल्या घरातल्या माहेरवाशिणी – सासुरवासिणींना 'बाबा'च वाटणारे, पाटीलबाबा सगळ्या गावाला कसे भूषण झालेले, गर्वाचे नि आदराचे स्थान झालेले होते. खानदानी कुळाचा जाज्वल्य वारसा सांगणारे, परंतु स्वतःच्या वागणुकीने संत-वारकरी, माळकरी यांना मायेचा नि दानतीचा आधार वाटलेले. सगळ्या आसमंतातल्या कुणीही पाटील-बाबांच्या नावाचा उच्चार करताच हात जोडल्याखेरीज राहावयाचे नाहीत.

पाटलीणबाई केव्हाच–गोष्ट सांगतो आहे त्या काळच्या पहिल्या जागतिक युद्धाच्या काळातच–वारलेल्या. घरात कोणी इतर बाईमाणूस नाही. घरातली व्यवस्था बघायला दूरच्या नात्यातली एक म्हातारी. तीसुद्धा बाबांच्या मुलाला सांभाळायला म्हणून पाटलीणबाईंनी घरात आणलेली. म्हणूनच पाटलीणबाईनंतर आणि मुलगा मोठा झाला तरी, घरातच राहिलेली. गावातले कुटाळ लोक थट्टेने किंवा आकसाने वेडेवाकडे काहीही बोलोत, पण त्या म्हातारीच्या चारित्र्याविषयी किंवा बाबांच्या दानती-विषयी गावातच काय, पण पुऱ्या अकोट तहसिलीच्या पूर्वेच्या खोऱ्यात कुणालाही पाटील कसे शुद्ध आहेत नि त्यांच्या घरात जनी म्हातारीचे स्थान काय आहे, याविषयी काहीच शंका नव्हती. पाटलीणबाईंच्या आस्थेने घरातली व्यवस्था बघणारी जनी म्हातारी आपले आश्रित नोकराचे स्थान कधीही विसरली नव्हती, की रात्रीच्या वेळी गड्यामाणसाच्याबरोबर मागल्या दारी गोठ्याजवळच्या उघड्या पडवीत जमिनीवर पसरलेल्या गोधडीच्या अंथरुणावर झोपायचे तिने कधी चुकवले नव्हते.

परंतु पाटीलबाबांवर सर्वांगीण यशाचा शुभ्र चांदण्याचा वर्षाव करणाऱ्या त्यांच्या भाग्यचंद्रावर एकच लांच्छन होते ते म्हणजे त्यांच्या वयाने पठ्ठा झालेल्या मुलाचा अर्ध-वटपणा. अर्धवटपणा कसला, लहानपणापासून ज्ञानू वेडसरच होता. वयाने मोठा झाला तरी, मनाने–शहाणपणाने मोठा होत नव्हता. कोणीही त्याची थट्टा करावी, त्याला लुबाडावे, त्याचा गैरवाजवी फायदा घ्यावा, त्याला आपल्या नादी लावावे, नको त्या ठिकाणी त्याला न्यावे. विडी–तंबाखूपासून इतरही व्यसनांच्या मोहात त्याला गुंतवावे व त्यात स्वतःचा फायदा करून घ्यावा. पण हे सर्व पाटीलबाबांना न कळवता, त्यांच्या लक्षात याचा आभाससुद्धा होऊ न देता. बाबांच्या कोणी इमानदार चाकराने बाबां-जवळ विठोबा कुलकर्णी पटवाऱ्याच्या नावाने तक्रार केली तरी, बाबांचा विठोबा कुलकर्णी पटवाऱ्यावर एवढा विश्वास की, पाटीलबाबा चुगलखोरावर कवडीचा विश्वास ठेवायचे नाहीत. विठोबा पटवारी वयाने पस्तीशीच्या सुमाराचा तरुण होता. आपल्या कामात हुशार. शेतकरी काहीही तक्रार घेऊन पाटील बाबांच्याकडे आले तरी, विठोबाचे, सरकारी कागदोपत्रीचे उतारे, लेख, रसीद, पावत्या इतक्या चोख असावयाच्या, अगदी शेतकऱ्यांच्या अंगठे उठवलेल्या, एखाददुसऱ्याची साक्ष असलेल्या, की विठो-बाच्या पुराव्यावर निःशंकपणे विश्वास ठेवून पाटीलबाबा बिनघोरपणे त्या शेतकऱ्यालाच दोष देत व त्याला खोटारडा समजत. पाटील-बाबांच्या कपाळावर गोपीचंदनाचा एकच टिळा नि गळ्यात एकच तुळशीची माळ. पण वयाने पाटीलबाबांचा मुलगा शोभणाऱ्या विठोबाच्या कपाळावरच काय पण कानशिलावरही मुद्रांचे नि नामांचे ठसे, भुवईमध्ये शेंदुराचा टिळा, हातात कसल्या तरी ताईताचा गंडा नि तोंडामध्ये ओठातल्या ओठात, कसले तरी, जणू देवाचे नाव पुटपुटलेले ऐकू नाही आले तरी दिसायचे. तेव्हा पाटीलबाबांनी अशा विठोबावर पूर्ण विश्वास ठेवावा यात काही नवल नव्हते. विठोबाने गेल्या पंधरा वर्षांत आपल्या तेल्हाऱ्याजवळच्या गावी चाळीस एकराची शेती केली आहे हे पाटीलबाबांना कोणी सांगितले, तर त्यावर पाटीलबाबांनी विश्वास ठेवला, पण विठोबाला एका अक्ष-राने विचारले नाही की, ही एवढी माया तू कुठून मिळवलीस म्हणून. की कधी विठोबाच्या विरुद्ध ऐकायला मिळणाऱ्या कागाळ्यांवर

कधी विश्वास ठेवला नाही.

या सगळ्यात भर म्हणून की काय, विठोबाने पाटीलबाबांवर आणखी एक जादूची कांडी फिरवली होती. पाटीलबाबांच्या वेडसर ज्ञानूसाठी विठोबाने तेल्हाऱ्याकडल्या एका गरीब परंतु जातकुळीने पाटीलबाबांच्या जातकुळीच्या शेतकऱ्याची मुलगी शोधून काढली होती. वाढत्या वयाच्या ज्ञानूला शोभणारी, उफाड्याची, गौर वर्णाची, तरतरीत चेहऱ्याची, भिरभिरत्या पण भेदक नजरेची मुलगी पाटीलबाबांनी पाहिली. त्यांना मुलीच्या बापाची– साहेबरावची– जातकुळी पटली. त्याच्या गळ्यातल्या तुळशीच्या माळेचा विश्वास वाटला नि गरीब झाला म्हणून काय जातकुळीच्या सालस माणसाशी सोयरीक का न करावी ? नि देखणी, आपल्या ज्ञानूला कह्यात ठेवू शकणारी व त्याच्या वाढत्या वयाला शोभणारी मुलगी सून म्हणून घरात का न आणावी याबद्दल पाटीलबाबांना काहीच शंका वाटली नाही. इतरांचे कुणाचे काही न ऐकता, मुलीच्या चाल चालणुकीबद्दल जास्ती चिकित्सा न करता, हुंडा मानपान तर दूरच राहो, मुलीच्या बापाला विठोबाच्या सांगण्यावरून पाच हजाराचा तोडा गुप्तपणे विठोबाच्या हाती पोचवला नि साहेबरावाला पाच हजार रुपये पोचले की नाही याची चौकशीसुद्धा न करता पाटीलबाबांनी सोयरीक ठरवली नि विठोबाच्या मार्फत सांगून आलेल्या जानकीच्या बापाला साहेबरावाला– आपले व्याहीबुवा बनवून पाटीलबाबांनी जानकीला घरातली लक्ष्मी म्हणून सून आणली व तिचे सासरचे नावही लक्ष्मीच ठेविले.

सून लक्ष्मी शरीराने, सौंदर्याने, व्यवहाराने बोलण्याचालण्यात गुणाचीच वाटली पाटीलबाबांना. आणि विठोबाला माहेरचा मानणारी सून म्हणून विठोबाचे वळण घरात दिवसेंदिवस वाढू लागले, याचेही पाटीलबाबांना काही वावगे वाटले नाही. थोड्याच दिवसात लक्ष्मीला न्हाण आल्याची बातमी जानी म्हातारीच्या तोंडूनच पाटीलबाबांना कळले व रीतसर पाटीलबाबांच्या घराण्याच्या इतमामाने ओटीभरणाचे समारंभ वगैरे होऊन लक्ष्मीचे ज्ञानूच्या घरातले निराळे, वेगळे उठणे, बसणे, झोपणे चालू झाले. सूनबाईला रीतसर दिवसही गेल्याचे पाटीलबाबांनी ऐकले नि त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

पण पुन्हा पाटीलबाबांना आपल्या सुखात काही उणे पडते आहे असे वाटायला लागले त्यांच्या लक्षात यायला लागले की, सूनबाईचा नटवेपणा, उच्छृंखलपणा, स्वतःच्या गर्भारपणाचे कौतुक अधिकच–फाजीलच वाटायला लागले नि घरातल्या ज्ञानूचा वावर पुन्हा उनाडपणाचा, घराबाहेर राहण्याचा, वेडेचार करण्याचा वाढलेला दिसू लागला. त्याचे वेड वाढते आहे असे पाटीलबाबांचे हितचिंतक पाटीलबाबांना सुचवू लागले तरी, पाटीलबाबा घरात जन्म घेऊ पाहणाऱ्या नातवाची वाट पाहण्यात रमून गेले होते–अधीर होत होते. ज्ञानूची वेडेचाराची वागणूक चालत राहिली. सूनबाई लक्ष्मीचे गर्भारपणाचे कौतुक वाढल्या अनौचित्याने घरात चालू राहिले व त्याचा पत्कर विठोबानेच जणू घेतला आहे आणि तोसुद्धा पाटीलबाबांच्या संमतीने, असे सगळ्यांना दिसत राहिले. माळकरी पाटील नातवाच्या सुखरूप जन्मोत्सवासाठी अधीर झालेले. सूनबाईचे विठोबाशीच काय पण विठोबाच्या इतर टोळभैरव मित्रांशीदेखील अघळपघळ बोलणे पाटीलबाबांच्या कानावर यायला लागले. वेडसर ज्ञानू दिवसभर कुठे असतो, घरी आला तरी बायकोवर, बापावर का चिडचिड करतो याचे कारण पाटीलबाबांना उमगेना. इकडे सुनेचे दिवस भरत आले नि पाटीलबाबांना नातवाच्या जन्माचा ध्यास लागला. त्यासाठी पाटीलबाबा रात्रंदिवस देवाधर्माच्या संतवाणीच्या श्रवण मननात वेळ घालवू लागले.

पाटीलबाबांच्या भाग्याचा, सोनियाचा दिवस उजाडला. सुलक्षणी दिवसा मुहूर्तावर सुनेने एका मुलाला जन्म दिला. नातवाचे मुख पाहून पाटीलबाबा धन्यधन्य होऊन गेले. त्यांनी 'ईश्वरीकृपेचे देणे, इष्टमित्रांचे आशीर्वाद, गरीबगुरीबांचे दान, सवाईने, समारंभाने फेडले. पाटीलबाबांच्या घरी नातवाच्या बारशापासून चालू झालेली गावजेवणे महिनाभर चालू राहिली. किती गोरगरीब नातवाच्या नावाने कपडा, पैसा दान घेऊन गेले. इकडे पाटीलबाबांनी दीड-दोन महिन्यांच्या नातवाचा ताबाच स्वतःच्या अखत्यारात घेतला. आईच्या अंगावर पिण्यापुरते नातवाला आईकडे पाठवायचे, पण बाकी सारा वेळ नातवाचे अंथरूण-पाळणा पाटीलबाबांच्या बैठकीशेजारच्या खोलीतच जनी म्हातारीच्या देखरेखीखाली राहायचा. बाळाचे रडणे जरासे ऐकू येताच जनी म्हातारी वाड्यातल्या कुणबिणीबरोबरच पाटीलबाबाही बाळाच्या पाळण्याजवळ लगबगीने येताना दिसायचे. बाळाला रडायला काय कारण झाले याची पाटीलबाबा कसोशीने चौकशी करायचे. बाळाचे दुपटे ओले होणे, बाळाच्या भुकेची वेळ होणे, बाळाला उकडण्याने त्रास होणे हीदेखील कारणे होऊ शकतात याचे भान पाटीलबाबांना न राहून साऱ्या कुणबिणीसकट जनी म्हातारीवरही पाटीलबाबांचा राग बसायला निमित्त पुरायचे.

या सगळ्या बनावाला मुख्य कारणे अर्थातच दोन. पहिले म्हणजे वेडसर ज्ञानूचा पाय घरात न टिकणे आणि नटवेखोर सुनेचे स्वतःच्या गोतावळ्याबरोबर हिंडणे, फिरणे चालू राहणे हेही तितकेच खरे. दिवसेंदिवस दोन्ही गोष्टी अशा थराला पोचल्या होत्या की, गावात उघडपणे चर्चा होऊ लागून पाटीलबाबांच्या सौजन्याबद्दल, नातवाच्या प्रेमापायी होणाऱ्या व्यवधानाबद्दल नि विशेषतः सुनेच्या आपत्तीपूर्ण वागणुकी-चलचलणुकीबद्दल जी टीका व्हायची त्याला पाटीलबाबांचा टीकेला उत्तर देण्याचा ठेका दोन तऱ्हेचा. ज्ञानूवर ताबा ठेवायला त्याला वेड्याच्या इस्पितळात पाठविण्याची माझी तयारी नाही. मरीमायदेवीची कृपा झाली म्हणजे सगळे ठीक होईल. तोपर्यंत वाट पाहत नातवाला सांभाळायला मी खंबीर आहे, असा पहिला ठेका नि दुसरा म्हणजे लक्ष्मीला घरात आणताना मी मागून आणली. पण तिला माझ्या घरात नांदायचे नसले तर, मी त्याला आडकाठी करणार नाही. तिने आपल्या आईबापाकडे जावे नाहीतर मसणात जावे. मला तिच्या निर्णयाची पर्वा नाही. सुनेच्या किंवा तिच्या आईबापाच्या इच्छेची पर्वा नाही. त्यांनी काय वाटेल ते ठरवावे. पंचायतीसमोर जावे पण स्वतः होऊन मी पंचायतीसमोर काय पण कोर्टदरबारातसुद्धा जाणार नाही. माझ्या घराण्याची मान कुणापुढेही वाकणार नाही. पाटीलबाबांच्या हा ताठरपणा बाबांच्या हितचिंतकांना वेडेपणाचा, आगामी संकटांचा सूचक वाटायचा. पण हे सारे पाटीलबाबांना समजुतीने सांगणे, पटवणे, कुणाला शक्य होईना, कित्येकांची तर हिंमतच होईना. पाटीलबाबांचा नातू 'अमृता' दिवसेंदिवस वाढू लागला होता.

बाबांचे बोट धरून चावडीवर बाबांच्या बरोबर येऊन, त्यांच्या बैठकीवर नि स्वत:च्या सिंहासनावर म्हणजे पाटीलबाबांच्या मांडीवर बसलेला दिसू लागला होता. पाटीलांची बलुतेदार मंडळी व इतर चावडीवर येणारे अर्जदार शेतकरी, खंडकरी मंडळी त्याचे कौतुकही पाटीलबाबांच्या समोर तोंड भरून करीत. बाबांच्या पाठीमागे तीच मंडळी काय बोलतात हे ऐकण्याची पाटीलबाबा तयारीसुद्धा दाखवीनातसे झाले होते. शेवटी पाळी आली ती इथंपर्यंत की, एके दिवशी सून लक्ष्मीबाई आपले दागदागिने, कपडेलत्ते काही जवळचे पैसे घेऊन पाटीलबाबांच्या घरातून पळून गेल्याचे व आपल्या बापाकडे जाऊन राहिल्याचे वर्तमान पाटीलबाबांना कळले, पण पाटीलबाबांनी आपल्या मांडीवर बसलेल्या, आपल्या हाताने भरवलेला अन्नाचा घास खाणाऱ्या अमृताच्या आधारावर हिंमत करून चवचाल सुनेपुढे अथवा तिच्या आईबापापुढे अथवा तिचा पाठपुरावा–पक्षपात करणाऱ्या चंगीभंगी मंडळींपुढे मान वाकविण्याचे साफ नाकारले. पाटलांचा नातू दोन वर्षांचा झाला.

याच सुमारास अकस्मात एक भयकर, विलक्षण, कुणालाही हादरवून टाकणारी घटना झाली! गावच्या नदीकाठी एके दिवशी सकाळी पाटीलबाबांच्या ज्ञानूचे प्रेत खांडोळी केलेल्या स्थितीत पण त्यावर बादल्याच्या बादल्या पाणी ओतून रक्ताच्या थारोळ्याऐवजी चिखलाच्या खातेऱ्यात पडलेले गावकऱ्यांना पाहायला मिळाले. गावची सगळी मंडळी पायाच्या तळव्यापासून तो पागोट्याच्या शेवटापर्यन्त हादरली. पण पाटीलबाबांनी मुलाच्या प्रेताच्या खांडोळ्यावर नजर टाकण्याचेसुद्धा नाकारले. रीतसर तालुक्याचे पोलीस आले. रावसाहेब मॅजिस्ट्रेट आले. डॉक्टर आले. मयताचा, हत्येचा, घटना स्थळांचा पंचनामा साक्षीदारासमोर झाला. प्रेताच्या तुकड्यांना सरकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली गावकरी मंडळींनी अग्निसंस्कारही केला. तो पाटीलबाबांच्या दिवाणजीकडून पैसे घेऊन पण पाटीलबाबांनी कशातच काही भाग घेतला नाही, की चार अश्रूदेखील ढाळले नाहीत. क्रियाकर्माच्या दहा दिवसांनंतर वाड्यात ब्राह्मणांनी काही गावकरी मंडळी श्राद्धकर्माचे जेवण जेऊन तृप्त होऊन गेली. पाटीलबाबा आपल्या अमृताला घेऊन दहाव्या दिवशी आंघोळ करून सुतकातून मोकळे झाले. मुलाच्या अस्थीची राख दूरच्या नातेवाईकानी नदीवर पाठवली आणि पाटीलबाबानी अमृताला सांभाळण्याचा आपला कार्यक्रम अधिक कसोशीने चालू ठेवला. सून लक्ष्मी कुठे आहे, कुणाजवळ राहते, काय करते, हे पाहण्याचीच काय पण चौकशी करण्याचीसुद्धा पर्वा केली नाही! पाटीलबाबांचे बोट धरून चालू लागलेल्या पण पाटीलबाबांच्या कडेवर बसून फिरण्याचा हट्ट करणाऱ्या अमृताचा हट्ट पुरविण्यात पाटीलबाबा स्वर्गसुखाचा आनंद मानीत दिवस जगू लागले. आपल्या पाटीलकीच्या वतनाकडे, भावी पाटील अमृताचा विश्वस्त पालक स्वत:ला समजण्यातच भूषण मानू लागले!

ज्ञानूच्या खुनाच्या तपासात पटवारी विठोबाला पोलिसांनी पकडले, त्याच्या दोनचार चंगीभंगी मित्रांना पकडले, सूनबाई लक्ष्मीलाही पोलिसांनी छळले. त्यापायी सूनबाईच्या जवळच्या पैशांची दागदागिन्यांची विल्हेवाट लागली असल्याचे पाटीलबाबांना कळले. विठोबा पटवाऱ्याला आपल्या बचावाच्या खर्चापायी पंधरा वीस एकर शेती विकावी लागली असेही पाटीलबाबांना कळले पण पाटीलबाबानी या कसल्याच बातम्यामधे रस किंवा काळजी दाखवली नाही. एव्हढेच नव्हे तर, पोलिसासमोर कोणा संशयीत खुन्याचे नाव बोलून दाखविण्याचेही नाकारले. आवश्यक तो रीतसर पोलिसतपास, कायदेशीर कोर्ट कार्यवाही होऊन ज्ञानू मयताच्या खुनाचा खटला 'आरोपीचा पत्ता लागत नाही' म्हणून निकालात निघाला. परिणाम दिसायला एवढाच दिसला की, पटवारी विठोबा सरकारी नोकरीतून डिसमिस झाला, लक्ष्मीचा बाप पूर्ववत गरीब कर्जदार शेतकरी म्हणून राबू लागला, नि त्याच्या घरी राहणारी लक्ष्मी मोलमजुरीने काम करायला दुसऱ्याच्या शेतावर जाऊ लागली. गावच्या शेजारच्या खेड्यातून चंगीभंगी म्हणून नावाजलेल्या मंडळींच्याबरोबर हिंडताना दिसू लागली. ती अन्नाला मोताद आहे, कष्टाने दोन वेळची भाकरी मिळवते आहे वगैरे बातम्या पाटीलबाबांच्या कानावर येऊ लागल्या. पण या बातम्या सांगणाऱ्यांना पाटीलबाबांचे उत्तर एकच-सूनबाईला मी पोटगी द्यायला तयार आहे, पण तिच्या बापाने सूनबाईच्या चांगल्या वर्तणुकीची जामिनकी मला द्यावी. सूनबाई कोर्ट दरबारकडून पोटगीचा हक्क मागणार आहे असेही कळले. पण त्यालाही पाटीलबाबांचे उत्तर असेच. "मागेना क पोटगी कोर्ट म्हणेल ती पोटगी मी देईन. पण कोर्टात आपल्या तोंडाने माझी सून वाईट चालीची आहे म्हणून तिला पोटगी मागण्याचा अधिकार नाही असा जबाब देऊन माझ्या खानदानी घराण्याचा अपमान मी स्वत:च्या तोंडाने–हाताने करून घेणार नाही. कोर्ट जी पोटगीची डिक्री देईल तिची तामीळ मी बिनतक्रार करीन. सुनबाईने स्वत:ची नि माझी इज्जत राखावी."

पोटगीच्या प्रश्नाच्या या वाटाघाटी मध्यस्थाकरवी चालत राहिल्या. परंतु न सून लक्ष्मी पाटीलबाबांचे पाय धरायला वाड्यावर आली न लक्ष्मीचा बाप साहेबराव अथवा 'मानलेला भाऊ' विठोबा पटवारी वाड्यावर कधी आले. काही दिवसांनी एक माणूस जरूर पाटीलबाबांच्या वाड्यावर आला. तो होता जिल्ह्याच्या 'अॅडीशनल डिस्टिक्ट अॅण्ड सेशन्सजज्जांच्या कोर्टातला. विधवा लक्ष्मीबाई ज्ञानू पाटील वादी विरूद्ध जानराव पाटील यांच्या नावाचे पोटगीच्या दाव्याचे समन्स घेऊन. त्याचेबरोबर काही वरकरणी सभ्य म्हणवणारी पण चुपचापपणे विठोबा पटवाऱ्याचे मित्र असलेली दोन चार मंडळीही आली होती. त्या सर्वांनी पाटील बाबांना कोर्टाचा पिवळा कागद दिला व समजाविले की त्यांच्या सुनेने मासिक पन्नास रुपये पोटगी मिळण्याचा दावा केला आहे. अकोल्याच्या कोर्टात त्यांच्या तारखेचे समन्स आहे. ते पाटीलबाबांनी घ्यावे व तारखेवर कोर्टात हजर रहावे, व समन्स पावल्याची सही करून द्यावी. बाबांना लिहता वाचता, जितक्यास तितकेच येत होते. आणि आपल्या सुनेने आपल्या नावाने कोर्टाच्या बेलिफा मार्फत पोटगीच्या दाव्याचा कागद, पाठवावा, याने पाटीलबाबांच्या मनाला अपमानाच्या इंगळ्या डसल्यागत त्याच्या रागास पारावार राहिला नव्हता आणि अशा मन:स्थितीत पाटीलबाबांनी दाव्याच्या कागदात इतर काय काय लिहिले आहे याची माहिती करून घेण्याची पर्वासुद्धा न करता

समन्साच्या प्रतिलिपीवर दाव्याचे कागद पावल्याचे लिहविले. एवढेच नव्हे तर, मला दावा कबूल आहे हेही लिहविण्याचा हट्ट धरला. अर्थातच याचा पूर्ण फायदा घेऊन बेलिफाबरोबर आलेल्या मंडळींनी दोन्ही वाक्ये तिऱ्हाईत पंचाकरवी निरनिराळी लिहवून त्या दोन्ही वाक्यावर 'जानराव पाटील' या अक्षरांच्या सह्या करवून घेतल्या. कारण पाटीलबाबांना तेवढेच काय ते साक्षरतेचे प्रमाण देता येत होते. रटफ करीत पुसणाच्या पोथीची तोंडपाठ झालेली जाड-जाड टाईपातली अक्षरे वाचण्यापलीकडे एरवी हाताने नकलून लिहिलेल्या दाव्याची प्रत व त्यावर सुनेची लक्षुमी ज्ञानू पाटील सहीची अक्षरे पाहून पाटीलबाबांनी त्या कागदांना हातात घेऊन वाचण्याचे दूरच राहो त्या कागदांना हातसूद्धा न लावता ते कागद उचलून चुलीत घालण्यासाठी जनी म्हातारीला आज्ञा केली व बेलीफाच्याबरोबर आलेल्या पंचमंडळींनी साक्षीच्या सह्या समन्साच्या कागदावर करून दाव्याच्या नकलेचे कागद परस्पर जनी म्हातारीच्या हातात दिले होते. हा सर्व खेळ पाहत त्यावेळी तीन वर्षाचा अमृता पाटील बाबांच्या मांडीवर *त्यांच्या अंगरख्याला* घट्ट धरून बसलेला होताच. रीतसर दाव्याच्या समन्साची बजावणी करून बेलीफ व पंचमंडळी निघून गेली. जाताना पाटीलबाबांनी पानाचे तबक पुढे सरकवताच त्यातून बचक बचक-भर पानसूपारी तंबाखू घेऊनही गेली !

तारखेनंतर पाटील बाबांना कळले की, पोटगीचा दावा त्यांनी कबूल केल्याप्रमाणे डिक्री झाला आहे. ते कळताच पाटील-बाबांनी पुढील वर्षभराच्या पोटगीचे सहाशे रुपये कोर्टात जाऊन जमा करून टाकण्याचा हुकूम दिवाणजीस दिला नी हात झाडून मोकळे-स्वच्छ-झाल्याच्या आविर्भावाने पाटील-*बाबा* अमृताला मांडीवर बसवून लोडाशी टेकले नि समाधानाचा सुस्कारा त्यांनी सोडला व आपल्या नित्याच्या व्यवहाराकडे लक्ष पुरवायला मोकळे झाले.

पण एवढ्याने काय झाले होते ? पाटील-बाबांच्या साडेसातीची दुसरी अडीचकीच संपली होती. शेवटची अडीचकी अजून आपला फटका राखून उरली होती. पाच–सहा महिन्यांनी पाटीलबाबांना पुन्हा कोर्टाचे समन्स आले. पुन्हा बेलीफ व पंचमंडळी त्यांच्याकडे समन्साचे पिवळे कागद घेऊन त्यांच्या बैठकीवर आले. एव्हाना अमृता चांमला साडेतीन वर्षाचा झाला होता. पंच-मंडळींनी अमृताची तारीफ करीत, त्याच्या हुशारीचे कौतुक करीत, 'बरं का छोटे पाटील ! आता तुम्हालासुद्धा कोर्टाने बोलावलं आहे. मोठ्या बाबांबरोबर तुम्ही-सुद्धा कोर्टात यायचं बरं का. कोर्ट तुम्हाला मिठाई देणार आहे.' वगैरे मानभावी गोष्टी बोलून त्यांनी अमृतालाच नव्हे, तर त्याच्या मोठ्या बाबांनाही खूष करून टाकले नि पाटीलबाबांच्या प्रश्नाला 'मला नि अमृताला कशाला बोलावले आहे कोर्टात ? मी तर वर्षभराची पोटगी जमा करून दिली आहे आधीच !' याला उत्तर असे दिले गेले की, 'पाटीलबाबा ! भावी पाटलाचे अज्ञानपालन करणार तुम्ही. तुमचे नावसुद्धां कोर्टाच्या समन्सात तसे लिहिले आहे. तुम्ही अज्ञानाचे पालनपोषण कसे करीत आहात, ते कोर्टाला प्रत्यक्ष बघायचे आहे. म्हणून कोर्टसाहेबांनी तुम्हाला छोट्या पाटलांना घेऊन कोर्टात बोलावले आहे. हे जबाबदारीचे समन्स त्याकरिता आहे. बघा ! यावर जबाबदारीची नोटीस असे लिहिले आहे.' वगैरे ऐकून व बजावणीची नोटीस ही मोठ्या टाइपातली अक्षरे वाचून पाटीलबाबांनी खुशीने समन्सा-वर सही करून दिली व अज्ञान भावी पाटलाला घेऊन तारखेवर कोर्टात येईन म्हणून घवघवीत आश्वासन पाटीलबाबांनी बेलिफाला व पंचांना दिले नि तारखेवर पाटीलबाबा स्वतःचे नेहमीचेच अंगरखा–पागोटे लेवून व हातात चांदीच्या मुठीची काठी घेऊन परंतु त्यांच्या अज्ञान पाल्याला–अमृताला–नवीन कोरे कपडे व जरीची टोपी घालून कोर्टात जायचा विचार करू लागले !

परंतु पाटीलबाबांच्या शनिदेवाची शेवटची अडीचकी सुरु झाली होती हे त्यांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. म्हाताऱ्या जनीनेच त्यांना सांगितले, 'हा थाट कायले करतासा? तुम्हाला म्हाइत वी हाये ? ती रांड अमृताला घेऊन जाण्यासाठी कोर्टात बलावती तुमाले. कालच तो इटोबाचा पठ्ठ्या बोलत व्हता ते म्या ऐकला. तो म्हने कसा ? कोरट अमृताला तुमच्यापासनं वढून तिच्या ओटीत घेणार हाये. तुम्ही नाई देल्ला तर, तुमालेच जेलात घाडत्याल म्हन्तो !'

पाटीलबाबा थक्कच झाले ! पाटील-बाबांनी त्यांच्याकडे येणाऱ्या सगळ्या लोकांना ह्या बातमीचा खरेखोटेपणा विचारून खात्री करून घेण्यास सुरुवात केली. पण कोणीच धड काही सांगेतात. सगळीजणं गुळ-मुळीत उत्तरे देत, एक दुसऱ्याचा हवाला देत नि म्हणत, 'आनिक काय तर ! कोरट त्याकरताच तर तुमाले अमृताला घेऊन बलावत्यात. इनसपेकशन बिनसपेकशन खटं हाय, माझिर न पाठवता कोरटच अमृताचा कबजा तुमच्याहून त्या रांडला घेणार हायेत!' ते ऐकून पाटीलबाबांचा सगळा उत्साह तर कोठच्या कोठे गेला. एवढेच नाही तर निराशेने पाटीलबाबा गंभीर झाले. आपल्या-इज्जतीचा, घराण्याच्या लौकिकाचा, आपल्याविषयींच्या 'साह्येब लोगांच्या इस्वासाचा' विचार करू लागले. आपला मान आपणच कसा राखायचा याचा विचार करता करता पाटीलबाबा अमृताच्या पाय-गुणांचा विचार मनात येऊन ह्या पोरट्या-मुळे आपलं काहीच भलं झालं नाही. ह्या पोरा-पायी ती रांड आपल्या घरात आणली, विठोबाच्या नावाचं ते पोरटं हाये असे लोग म्हणत्यात ते खरंच हाये का ? हे पोरटं जनमलं नि आपला ज्ञानू मारला गेल्ला. आता ती रांड आपल्याले पुरतं लुटणार. अमृतासुद्धा न्येनार ! जाऊ दे, ल्येक खऱ्या रक्ताचा असंल, तर पुन्हा वाड्यात येईल नि खानदानचं नाव करंल. साडेसातीचा फ्येरा संपला की सगळं 'ठीक व्हईल !' असं म्हणून पाटीलबाबानी आपल्या अप-मानाची आग आपल्या डोळ्यांतल्या अश्रूंनी विझवायला सुरुवात केली. पांडुरंगाचे नाव घेत पाटीलबाबा अमृताला साध्या कुडत्या टोपीनेच कोर्टात घेऊन जायला तयार झाले, नि अकोल्याला जाण्या-साठी दमणी गवताने भरून त्यावर अल-वणाची गादी लोड ठेवून त्यावर पांढरे शुभ्र अभ्रे घालून तीन दिवसांच्या प्रवासाला लागणाऱ्या वस्तूंनी भरलेली पेटी दमणीत ठेवून पाटीलबाबा सिद्ध झाले. जाताना वाटेत पूर्णामायच्या काठावर रात्र काढायची, दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच निघून ११ वाजेपर्यंत कोर्टांत पोचायचे असे ठरवले व आपल्या गावाहून अकोल्याला जायला दुपारच्या वेळीच सिद्ध झाले. बरोबर गाडी हाकायला गडी तेवढा घेतला. जनी म्हातारी येते म्हणत होती तर तिला रागावून गप्प बसवले, नि एकटेच अमृताला घेऊन देवाच्या पुढे डोके टेकून घरातून बाहेर पडले. पाटीलबाबा लाकडाच्या पुतळीसारखे 'काठ' झाल्या-सारखे दिसत होते, अमृता दमणीतून दूर प्रवासाला– जत्रेला जायच्या आनंदात होता. तेथे बाबा आपल्याला खेळणी घेऊन देतील,

पृष्ठ २३ वर

पॅरिस, आय लव्ह् यू । लेखांक नऊ

# शात्रंचे प्रार्थनामंदिर ( Cathedral of Chartres )

शांताराम पारपिल्लेवार

'With all your brag and boasting where has your christianity succeeded without the sword? Yours is the religion preached in the name of luxury. All this prosperity, all this from christ? Those who call upon christ care nothing but to amass riches. Christ would not find a stone on which to lay his head among you. You are not christians. Return to christ!'

—स्वामी विवेकानंद (त्यांच्या बोस्टन-मधील भाषणातून)

...मध्यरात्र.

मारी थेरेस मला ऑपेराला सोडते. तिथून ती तिच्या घरी जाणार असते. अन् मी मेट्रोने अनातोले फ्रान्सला. दिव्यांच्या प्रकाशात रस्ते चमकत असतात. रेस्टॉरंटमधून अजूनही काही स्त्री-पुरुष मद्य पीत बसलेली असतात. तशी रस्त्यावर वर्दळ मात्र एरवीच्या पेक्षा कमी झाली असते. पेव्हमेंटवर मेट्रोचा कठडा असतो. मी रेलिंगला टेकून उभा आहे. मारी थेरेसही कारच्या बाहेर येते.

'आय ॲम सॉरी यू हॅव्ह् टू गो अलोन फ्रॉम हीयर.' तिच्या स्वरात अगतिकता स्पष्ट आहे. 'आय होप यू कॅन गो अलोन.'

'सर्टनली. आय कॅन.' पॅरिस माझ्यासाठी अनोळखी शहर राहत नाही. 'नाहीतरी मला एकट्याला पॅरिस एक्स्प्लोअर करायला आवडतं.'

ती खवचटपणे हसते.—'उगाच इकडे-तिकडे आता हिंडू नकोस. नाहीतर शेवटची मेट्रो तुला मिळायची नाही हं!'

'एवढ्या मध्यरात्री मी एकटा हिंडणार तरी कुठे?' मी काळजी व्यक्त करतो.

'ऑपेरा तसं रात्रीसाठी फार नटोरियस प्लेस आहे. चुकून त्यांच्या जाळ्यात सापडलास तर मुष्कील.'

मी तिच्या डोळ्यात पाहत म्हणतो,—'म्हणजे?'

'व्होअर्स आर इन् सर्च ऑफ क्लाएन्टस् हीयर इथं त्या नुसताच ओव्हरकोट घालतात. ॲन्ड ओव्हरकोट इज दी ओन्ली गारमेंट दे वेअर. आत काही नसतंच. कुणी आडवा आला की, त्या सगळा कोट उघडा करून आतलं वैभव दाखवतात. टेक केअर. हं!' तिच्या खवचट हसण्याचा अर्थ आता लक्षात येतो. 'बॉन् वी S' म्हणून ती निरोप घेते. जाताना म्हणते,—'ग्रँड पलाईसला एक फॅंटस्टिक एक्सपोझिशन आहे. रॅम्सेस (टू) चं. तिथल्याच दुसऱ्या गॅलरीत सिम्बॉलिस्टांचं एक्सपोझिशन आहे. आय वुड लाईक टू बी वीथ यू. कसं जमले ते आताच काही सांगता यायचं नाही. मी तसा तुला फोन करीन.' एक्झिबिशन हा शब्द फ्रेंच भाषेत नसावा. समानार्थी एक्सपोझिशन हा शब्दच वापरात असतो.

कार माझ्यापासून पुढे सरकते. खिडकीतून तिचा हात बाहेर येतो. अन् मी बराच वेळ कारच्या टेललॅम्पकडे पाहत राहतो. लांबून पेव्हमेंटवरून एक आकृती येताना दिसते. अंगात ओव्हरकोट असतो. माझी द्विधा मन:स्थिती होते. एक मन म्हणतं—चल उतर खाली. गाडी धर. दुसरं म्हणतं—थांब ना! थोडा वेळ. वैभव पाहून घे. पाहायचे पैसे लागत नाहीत, काही? थोडं थ्रिल!

उसनं अवसान आणायला म्हणून मी सिगरेट काढतो. पेटवून दीर्घ कश घेतो. आकृती जवळजवळ येते. माझ्या हृदयाची टिक्टिक् वाढलेली असते. पुढे काय होणार? विचारानंच मला दरदरून घाम येतो. मी रुमालानं कपाळ पुसतो. चेहरा पुसतो. पायात क्षणभर कंप जाणवतो. अंगावरचे केस ताठ झाल्यागत वाटतात. आकृती थेट जवळ येते. तिचाही चालायचा वेग कमी झाला असतो.

थँक गॉड! ती बाई नसते. मला हिम्मत येते. तो मध्यम वयाचा माणूस असतो. त्याच्या भरीव केसाळ मिशा. गुबरे गाल. चष्म्यातून माझ्याकडे पाहणारे हसरे डोळे. तोही मला पाहून हसायला लागतो. मग त्याचं हसू किळसवाणं वाटायला लागतं. वाटतं, हा जात का नाही? त्याचे पुढचे सोन्याचे दात चमकतात. ओळखपाळख नसताना तो जुन्या परिचिताला भेटावं तसा हात गळ्यात टाकतो. त्याची बोटं माझं अंग कुरवाळीत असतात. तो विचारतो...यस्...त्याच्या शब्दात लाघव आहे. आर्जव आहे. अन् माझ्या पाठीवरून एक घामाचा थेंब स्पाईनल कॉर्डवरून खाली खाली थेट खाली सरकतोय...यस्... त्याचा पुन: आवाज... किळसवाणं हसू. दाण्दाण् पावलं टाकीत मी पायऱ्याहून खाली धावत उतरतो. मेट्रोच्या सबवेमधे आल्यावर मागं वळून पाहतो. कुठं पाठलाग तर करीत नाही तो? दूरवर कुणीच दिसत नाही. जीवात जीव येतो. रुमालानं पुन: चेहरा पुसतो.

तेवढ्यात प्लॅटफॉर्मवर गाडी आल्याचा आवाज येतो, वारा अंगात भरल्यासारखा मी धावत सुटतो. गाडी थांबते. दार आपोआप उघडलं जातं. मीही आपोआपच आत शिरतो. आपोआपच दार लागतं. अरुंद्या डब्यात मी एकटा असतो. दिव्याच्या झगमगाटात डबा उजळून निघालेला असतो. सोनेरी दातांचा चेहरा नको तरी स्मृतीतून डोळ्यापुढे येतोच. ते विसरता यावं म्हणून मी आज कुणाकुणाला भेटलो त्याची उजळणी करतो...मरोल... त्याची बायको... मिस् रिपर्ट... मॅडम शांतल... मारी थेरेस... तिचं खवचट हसू

आठवतं. तिनं अशा माणासंविषयी का सांगितलं नाही?... कदाचित तिलाही ते ज्ञान नसावं... अन् एक चेहरा आणखी डोळ्यापुढे येतो... मोठे डोळे... माया लॅविशेचा गोड चेहरा अन् तितकाच गूढ तिचा परिचय. ...स्टेशन्स येतात जातात. गाडी थांबते... चालू लागते. माया पुन: भेटली पाहिजे. तिच्यात काहीतरी आपल्या मातीतलं आहे. ओरिएन्टल आहे...

खोलीवर परततो तेव्हा दोन वाजले असतात. मी येतो तेव्हा फादर डिलाहूय झोपले असतात. स्पेअर चावीनं कुलूप उघडतो. माझ्या बेडरूममधे फुलदाणीखाली सकाळी होती तशीच एक चिठ्ठी आहे. मी वाचतो. 'उद्या मॅडमोझेल लिझा अन् तिच्या मॉमनं आपल्याला कारनं लिफ्ट द्यायचं आश्वासन दिलंय. ते शार्त्रे आणि व्हर्साई पॅलेस बघायला आपल्याला नेतील. सकाळी आठला त्यांच्याकडे नेशनला पोचायला हवं. सातला तू तयार राहावेस.'

चला! झोपावं. सकाळी परत लवकर उठायचंय.

पाणी पिऊन मी अंग बिछान्यावर झोकतो वाटतं, अंधारात दोन सोनेरी दात चमकत आहेत. अन् किळसवाणं हसू... ओह! गॉड!... मी झोपेसाठी मनोमन प्रार्थना करतो.

फादर डिलाहूय फारसे बोलत नाहीत. मेट्रोतून बाहेर येतो तेव्हाही चालताना ते कसल्यातरी विचारात असल्यासारखे वाटतात. हा भाग मला अगदीच नवीन आहे. प्रशस्त रुंद रस्ते. दोहोबाजूला समांतर वृक्षांची रांग. बाजूची जुनी दोनमजली घरं. विशाल चौक पुढं दिसतो. चौकात मधोमध ब्राँझचं भव्य शिल्प. नजरेत खिळून राहील असं. अवतीभोवती हिरवं लॉन अन् रंगीबेरंगी फुलांचे ताटवे. मी फादर डिलाहूयला बोलकं करतो. शिल्पाकडे अंगुलीनिर्देश करीत विचारतो,–'कुणाचं शिल्प हे? किती सुंदर आहे नाही?'

ते चालताचालताच थांबतात. नजर उचलून स्थितप्रज्ञासारखे शिल्पाकडे पाहतात. त्यांचाही पिंड कलावंतांचा आहे. ते स्वत: चांगले शिल्पकार अन् चित्रकारही आहेत. पुढचं शिल्प अतिशय भव्य आहे–एक मानवसमूह आनंदातिशयात वाटचाल करीत आहे. पुरुष, स्त्रिया, मुलं. प्रत्येकानं खांद्यावर, हातात काही ना काही घेतलेलं आहे. शेतात तोडलेली ताजी कणसं, मद्याची सुरई, द्राक्षांचे घोस. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर तृप्ती आहे. आनंद आहे. त्यांच्या माना गर्वोन्नत आहेत. शरीरातील प्रत्येक अवयवात लय आहे. वाटतं, सगळा समूह जणू वैपुल्याचं गीत गात आहे.

फादर शांत आवाजात सांगतात, 'हा भाग म्हणजे प्लेस डिला नेशन आहे! अन ते शिल्प प्रख्यात चित्रकार दलाऊचं आहे. ब्राँझचं. ह्याला तो ट्रम्फ ऑफ रिपब्लिक् म्हणतो. त्यातली ओंबी, कणसं, द्राक्षाचे घोस–सारंसारं काही प्रतिकात्म आहे. ह्या साऱ्यातून कलावंताला वैपुल्य दाखवायचं आहे. एक्स्टसी (आनंद) व्यक्त करायची आहे.'

'मास्टरपीस–मार्व्हलस!' माझा आश्चर्योद्गार.

'ह्या सुंदर कृतीवर जाऊ नकोस हं! ह्या प्रसन्न आसमंतावर जावू नकोस. दी होल स्क्वेअर, रॉंदर ऑल दी सराउंडिंग हॅज ए घोस्टली हिस्टरी. इथं कधी चौदावा लूई अन मारिया थेरेसा ह्यांचं लग्नानंतर स्वागत झालं. राजासाठी भर चौकात सिंहासन उभारलं गेलं. चौदाव्या लुईला इथं सूर्यासमान मानलं जायचं. त्याची कारकीर्द सूर्यप्रकाशासारखी तळपून गेली. पण काळाची पावलं बदललीत. ह्याच चौकात सिंहासनाची उचलबांगडी करण्यात आली...' बोलताबोलताच ते थांबतात, 'आणि १७९३ मधे गिलोटीन बसवलं गेलं. इथं आलो की मला वाटतं अजूनही त्या दुर्दैवी जीवांचा आक्रांत आसमंतात भरून आहे. १३०६ लोकांच्या माना गिलोटीनच्या पात्याखाली धडावेगळ्या करण्यात आल्या होत्या. त्यात सोळा बिचाऱ्या नन्स होत्या. कितीतरी दिवस रक्ताचे पाट इथं सारखे वाहात राहिले. ही लाल फुलं पाहिली की मला रक्ताची धार दिसायला लागते...' बोलताना त्यांना इतकं भरून आलेलं नव्हतं. पुढं म्हणतात, 'चल आपल्याला लवकर गेलं पाहिजे. मॅडमोझेल लिझा आपली वाट पाहत असेल.'

'लांब जायचंय् का आपल्याला?' मी विचारतो.

'नाही! जवळच आहे त्यांचा फ्लॅट.' ते अंगुलीनिर्देश करतात.

मी माझा कॅमेरा क्लिक् करतो आणि फादर डिलाहूयसोबत चालायला लागतो. विस्तीर्ण रस्त्याच्या दुतर्फा सारखी झाडं आहेत. त्यांच्या बुंध्यांशी लोखंडी जाळ्या. शहरं ही शहरं वाटू नयेत म्हणून फ्रेंच माणूस जागरूक आहे. शहरांचं डिअर्बनायझेशन सुरू आहे. इकॉलाजी हा प्रत्येकानंच समजून घ्यायचा विषय झाला आहे. पेव्हमेंटवरसुद्धा मोठमोठ्या कुंड्यांतून रंगीबेरंगी फुलांची रोपटी लावली आहेत.

तीनमजली बिल्डिंगशेजारी आम्ही थांबतो. बिल्डिंग जुन्या डिझाईनची. तिथला लिफ्टही जुन्या पद्धतीचा आहे. ऑर्नमेंटल टाईपचा.

दुसऱ्या मजल्यावरच्या बंद दाराची बेल फादर वाजवतात. दार उघडून एक म्हातारी स्वागत करते–बोन्झू...

तिचे केस पांढरे शुभ्रआहेत. चेहरा सुरकुत्यात गुरफटलेला. डोळे खोल खोबणीत बसवल्यासारखे. कपडे तिनं नीटनेटके घातले आहेत. टोंघळ्याखाली उतरणारा जाड दाट पिवळ्या रंगाचा लोकरी फ्रॉक. मोठ्यामोठ्या कॉलरचा. तिच्या हातात ग्लोव्हज आहेत.

ती आम्हाला सोफ्यात बसायला विनवते. ड्रॉइंगरूम छोटीच पण सुबकपणे सजवली आहे. भिंतींना आल्हादक हिरव्या रंगाचा वॉलपेपर आहे. फायरप्लेसच्या दोन्हीही बाजूस उंचावर भिंतीला कलात्मक लॅम्पशेडस् आहेत. मधोमध जुन्या तसबिरीत फोटो–मध्यम वय. अर्ध्याधिक डोक्याला टक्कल पडलेलं. धारदार मिशा. मोठे डोळे. रुबाबदार व्यक्तिमत्त्व. अंगावर मिलिट्रीचा गणवेश.

फादर म्हातारीला माझी ओळख करून देतात. मी भारतातून आलोय् ऐकून तिला आश्चर्य वाटतं. ती माझं कौतुक करते. म्हातारीला इंग्रजी बोलता येतं. ती बोलते खूपच गडबडीत असल्यासारखी अन् बऱ्याच वरच्या पट्टीत.

ड्रॉइंगरूममध्ये तीसपस्तीसची बाई प्रवेश करते. फादर तिच्या गालाचं चुंबन घेतात. ती माझ्याशी हात मिळवते. फादर सांगतात, 'ही मॅडमोझेल लिझा.' म्हातारीकडे बोट

दाखवीत म्हणतात, 'मॅडम बर्नस्टेनशी कन्या. ही स्टेन्ड ग्लास आर्टिस्ट आहे.' मग माझी ओळख करून देतात.

लिझाला मोडकंतोडकं इंग्रजी बोलता येतं. तिच्या मानानं तिच्या मॉमला चांगलं बोलता येतं. मी म्हातारीची इंग्रजीबद्दल प्रशंसा करतो. ती म्हणते, 'नो...नो... मिस्टर शांताराम, आय ॲम फर्गेटिंग ऑल दी इंग्लिश आय न्यू. यू नो इट इज मोअर दॅन थर्टिफाईव्ह ईयर्स दॅट आय लेफ्ट अमेरिका. आय् न्यू देन इट व्हेरी वेल. हीअर नो वडी स्पीक्स इंग्लिश.' ती अटकत अटकत बोलत असते. तिच्या बोलण्यावरून वाटतं, बरेच दिवसापासून तिला इंग्रजी बोलायचा सराव नाही.

मी फादरना विचारतो-'इज मॅडम अमेरिकन?'

मॅडम मधेच म्हणते,-'वन्स अपॉन ए टाईम आय् वॉज अमेरिकन. आता मी फ्रेंच नागरिक आहे.'

'मॉम, अमेरिका का सोडलास्?' माझ्या मॉम् शब्दावर मॉम् खुष दिसते. पहिल्याच भेटीत मी जवळीक साधतो.

'मी अन् माझी आई दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी इथं आलो. माझे वडील अमेरिकन आर्मीत अधिकाराच्या पदावर होते. ही वॉज स्पेशल मिलिट्री एन्वॉय टू फ्रेंच गव्हर्नमेंट. दुसऱ्या महायुद्धानंतर, फ्रान्स लिबरेट झाल्यानंतरही बरीच वर्षे अमेरिकन फौजा इथं होत्या. पन्नास साली मॉम् अन् डॅड परत अमेरिकेला गेलेत. मी मागेच राहिले.'

'का?' माझा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

मॅडमोझेल लिझा मध्येच आपली चित्रं आणते. मला म्हणते,-'तुला स्टेन्ड ग्लास आर्ट काय आहे बघायचं ना?' माझ्या हातात फोटोग्राफ्स् देते. 'कन्ट्रीचर्चमधील काही ग्लासवर्क रिपेरिंगचं असाईनमेंट माझ्यावर सोपवल्या गेलंय्. सी-धिस इज हाऊ वुई वर्क?'

'वंडरफुल! धिस इज ऑल यू डिड?' मी.

'ती तिच्या फिल्डमधे जाणकार समजली जाते.' फादर मधेच बोलतात. मॉम म्हणते,-'लिझा, मी सामान घेऊन खाली चलते. तुम्ही लवकर या.' मॉम् अन् फादर जायला निघतात. लिझा गळ्यात बॉयनॉक्युलर लटकावते. बास्केट बॅग घेते. दारातून बाहेर जायच्या आधी दबक्या आवाजात म्हणते, 'प्लीज डोन्ट क्वश्चेन मॉम् अबाऊट हर पास्ट. शी इज व्हेरी इमोशनल ॲन्ड सेंटीमेंटल...प्लीज...' काहीतरी आठवल्यासारखं करते. म्हणते-'आय् ॲम सॉरी आय डिड नॉट आस्क यू फॉर एनी ड्रिंक.'

'इफ् यू कॅन, प्लीज गेट मी ए ग्लास ऑफ़ वॉटर.'

'वुड यू लाईक ऑरेंजिना?'

'सर्टनली नॉट...'

ती मला ऑरेंजिना देते. मी तिला विचारतो, 'नाऊ मॉम इज नॉट देअर! यू कॅन टेल मी व्हाय शी डिडन्ट गो टू अमेरिका?'

'ती पॅरिसच्याच प्रेमात पडली.' भिंतीवरच्या फोटोकडे पाहात म्हणते, 'ते माझे डॅड आहेत, पण त्यांनी मला पाहिलंच नाही. ते आर्मीत होते. ॲन्ड ही वाज प्रिझनर ऑफ वार व्हेन आय् वाज इन वुम्ब. ही वॉज इन फ्रेंच आर्मी. मॉमच्या वडिलांना हे प्रेमप्रकरण अजीबात आवडत नव्हतं. पण मॉम ॲडॅमन्ट होती. नाझीज टॉर्चर्ड हिम टू डेथ. मॉमच्या वडिलांना वाटलं हे प्रकरण संपलं. पोरीच्या आयुष्यात दुसरा अध्याय सुरू होईल. वडिलांना तिनं स्पष्ट सांगितलं-बर्नस्टेन गेव्ह हिज लाईफ फॉर हिज लॅंड इट इज ऑनर ॲन्ड मॅटर ऑफ प्राईड टू बिलॉंग टू दी लॅन्ड ऑफ दी ब्रेव्ह बिलव्हेड...दॅट इज ऑल!'

खांद्यावर पर्स लटकावून लिझा बाहेर पडते. मी सोबत होतो.

जुन्या सित्रोएनच्या स्टियरिंगवर लिझा आहे. तिच्या बाजूला मी बसतो. मागे फादर डिलाहूथ आणि मॉम आहेत. फादर निवांतपणे बसता आलं की पाईप काढवात.

लिझाचं ड्रायव्हिंग अतिशय काळजीपूर्वक आहे. पॅरिसच्या मर्यादेपर्यंत तिचं लक्ष ड्रायव्हिंगवर केंद्रित होतं. पॅरिस मर्यादा ओलांडताच ती जरा रिलॅक्स झाल्यासारखी वाटते. 'माहिताय् किती लांब जायचं आहे आपल्याला?' ती विचारते.

'नाही!'

'शार्त्र जवळ जवळ नव्वद किलोमीटर लांब आहे. आपण सरळ शार्त्रला जाऊ.'

'शार्त्रला जायला किती वेळ लागणार?'

'फार तर आणखी चाळीस मिनिटं. तशी मी फार कॉशस आहे. आय हेट स्पीड.' हिची प्रवृत्ती इतरांच्या तुलनेत वेगळी वाटते.

'असं काय आहे तिथं?'

'प्रार्थनामंदिर-ए कॅथेड्रल! पण हे प्रार्थनामंदिरं अगदी वेगळंच आहे. धिस इज ए पिलग्रिमेज. श्रद्धाळू मंडळी कुठून-कुठून येतात. मदरमेरी नवसाला पावते, मागाल ते देते असा विश्वास आहे. म्हणून बहुतेक मंडळी पायी चालत येतात. मला आठवतं-मी शाळेत असताना काही मित्रांसोबत पायी आले होते. तब्बल सतत तीन दिवस चालत होते.'

'नंतर चक्क महिनाभर आजारी पडली होतीस ना?' मॉम मधेच बोलते, 'दॅट वाज दी हॅंगओव्हर ऑफ पिलग्रिमेज.'

'पण काही म्हण मॉम, त्या दिवसात श्रद्धा होत्या. विश्वास होता. वाटायचं मदरमेरी आमची दुःखं, आमचे कष्ट, सारंसारं निवारणार आहे. आम्हाला शाळेत अभ्यास करायची जरूरी नाही. जणू मेरी स्वतःच आमचा पेपर लिहून देणार आहे.'

मी दिलखुलास हसतो-'आताही तसंच वाटतं का?'

'नाही-त्या वयात सारासार विचारच नव्हता. तारतम्य नव्हतं. नुसताच विश्वास होता. तू त्याला अंधविश्वासही म्हणू शकतोस. आताशी शार्त्रला मी प्रिलग्रिमेजला (यात्रेला) जात नाही, तर पिकनिकला म्हणून जाते.'

मागून फादर डिलाहूथ आमचं बोलणं कान देऊन ऐकत आहेत. म्हणतात,-'यू नो शांताराम, व्हॉट आईन्स्टीन हॅड वन्स स्टेटेड? रिलिजन स्टार्टस् व्हेअर रिझन एण्डस्.'

'कॉन्व्हर्स इज ऑल्सो ट्रू!'

'ते मान्य केलं तरी एक गोष्ट निर्विवाद आहे, शांताराम, सगळ्या प्रगतीची परिणती प्रार्थनेतच होणार आहे. जसजशा माणसांच्या ज्ञानशाखा वाढतील, तो भौतिक होत जाईल. जीवनमूल्यांचं कमर्शियलायझेशन होत जाईल. कुठंतरी माणसाचं कॉन्शस तेव्हा त्याला सत्याची कास धरायला बाध्य करील. सगळ्या गदारोळात, गर्दीत, भणंगतेत त्याला

# CENPULP दि सेंट्रल पल्प मिल्स लि.

(कंपनीची स्थापना १४ जुलै १९६०)

रजिस्टर्ड ऑफीस : ११८३, शिवाजीनगर, पुणे ५,

## ठेवी स्वीकारणे आहेत

| मुदत वर्षे | व्याजाचा दर द. द. शे. |
|---|---|
| १ | ११ |
| २ | १२ |
| ३ | १३ |
| ५ | १३½ |

**व्यवस्थापन :**
संचालक मंडळाच्या सर्वसाधारण नियंत्रण व निर्देशनाखाली कार्यकारी संचालक कंपनीचे व्यवस्थापन पहातात.

**व्यवहार :**
बांबूपासून कागद तयार करण्यासाठी लागणाऱ्या लगद्याचे उत्पादन, तसेच छपाईसाठी व लिखाणासाठी उपयुक्त अशा विविध प्रकारच्या कागदाचे उत्पादन.

**विनीयोग :**
कंपनीच्या दैनंदिन खेळत्या भांडवला-साठी व भांडवली खर्चासाठी.

व्याज दर सहामाहीस १ एप्रील व १ ऑक्टोबरला देण्यात येईल.

अर्जाचा नमुना व नियम यासाठी कृपया वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ठेवीची किमान रक्कम रु. ५०० व त्यापुढील रक्कम रु. ५००च्या पटीत स्वीकारली जाईल.

ठेव कमीत कमी १ वर्ष मुदतीने स्वीकारण्यात येईल.

ठेवीसंबंधी इतर अटी कंपनीकडून प्राप्त करावयाच्या छापील अर्जावर दिल्या आहेत.

संचालक मंडळ :

| नांव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. एस्. एल्. किर्लोस्कर, चेअरमन | 'लकाकि', शिवाजीनगर, पुणे १६ | उद्योगपती |
| श्री. एम्. एस् पारखे, कार्यकारी संचालक | 'विद्याविलास', ११८३, शिवाजीनगर, पुणे ५. | उद्योगपती |
| श्री. आर्. बी. अमीन, | इलेक्ट्रिक कॉलनी, बडोदे ३. | उद्योगपती |
| श्री. जी. जी. टकले, | 'वनश्री', ९४/२०, एरंडवणा, पुणे ४ | आय् एफ् एस्. (रिटायर्ड) |
| श्री. अकबर हैदरी, | विमको लि. इंडियन मर्कंटाईल चेंबर्स. बॅलर्ड इस्टेट, निकोल रोड, मुंबई ४०० ००१ | उद्योगपती |
| श्री. डी. पी. मेहता, | मोती मॅन्शन, ५वी खेतवाडी लेन, मुंबई ४. | उद्योगपती |
| श्री. के. पी. मेहता, | मोती मॅन्शन, ५वी खेतवाडी लेन, मुंबई ४ | उद्योगपती |
| श्री. ए. पी पदमजी, | दरभंगा मॅन्शन, कार मायकेलरोड, मुंबई २६. | उद्योगपती |
| श्री. डी. डी. पदमजी, | ७२, कोरेगाव पार्क, पुणे १ | उद्योगपती |
| श्री. व्ही. एस. वैद्य, | 'लौकिक', मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे १६ | उद्योगपती |
| श्री. पी जे. पटेल, | ४७०, जेठाभाई स्ट्रीट, वाडिया अहमदाबाद | उद्योगपती |
| श्री. एन्. एस् सदावर्ते, एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर | १९२२, सदाशिव पेठ, पुणे ३०. | बिझिनेस एक्झिक्यूटिव्ह |
| डॉ. एन् डी. जोशी, (नियुक्त आय् डी बी. आय्.) | इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया, रीफायनॅन्स डिपार्टमेंट, सिटी आय सी ई बिल्डिंग, २९८, पेरिन नरिमन स्ट्रीट, मुंबई ४०० ००१. | नोकरी |
| श्री. पी. एस्. गुरु, (नियुक्त आय्. एफ्. सी. आय्.) | मेहता महाल, १५ मॅथ्यू रोड, पोस्ट बॅग नं. ३९२८, मुंबई – ४०० ००४. | नोकरी |
| रिअर अॅडमिरल बी. एन्. लेले, (रिटायर्ड) (नियुक्त आय् सी आय् सी आय्) | 'नौका', आर्मामेंट पोस्ट ऑफीस, पुणे–४११ ०२१ | नेव्हल ऑफिसर (रिटायर्ड) |
| श्री. एम्. पी. पारेख, (नियुक्त गुजरात सरकार) | अॅडिशनल इंडस्ट्रीज कमिशनर, डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीज, गुजरात राज्य, अहमदाबाद १ | नोकरी |
| श्री. विजय कुमार (नियुक्त सिकॉम) | निर्मल, १ला माळा, नरिमन पॉईंट मुंबई–४०० ००१ | नोकरी |

मागील तीन वर्षांचा आढावा.

| वर्ष अखेर : | ३०-९-१९७३ रु. | ३०-९-१९७४ रु. | ३०-९-१९७५ रु. |
|---|---|---|---|
| करपूर्व निव्वळ नफा : | तोटा ५४,७६,५२१ | ९६,३१,७२७ | ११,५०,०६६ |
| करानंतर निव्वळ नफा . | तोटा ५४,७६,५२१ | ९६,३१,७२७ | ११,५०,०६६ |
| लाभांश : | नाही | नाही | नाही |

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | २,८०,६२,५०० |
| फ्री रिझर्व्हज | २,४८,२२,८०० |
| मुदत ठेवी | ५४,७०,००२ |
| भागधारकाकडून कर्ज | ४०,०५,८०० |
| तारणावरील कर्ज | ८,७४,३६,४२५ |
| इतर कर्जे | ७०,००,००० |
| मागील घसाऱ्यापोटी करावयाची उर्वरित बाकी | ४,१६,२६,६६८ |

या जाहिरातीचा मसुदा संचालक मंडळाने दि २१ फेब्रुवारी १९७६ रोजी संमत केला असून दिनांक १९ जून १९७६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत वाढीव व्याजाचे दरांस संमती दिली असून त्यांच्या आदेशानुसार ही जाहिरात प्रसिद्ध केली जात आहे.

एम् एस् पारखे,
कार्यकारी संचालक

सूचना : मूळ इंग्रजी जाहिरातीची खरी नक्कल रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई यांचेकडे दि. ११ मे १९७६ रोजी नोंदविलेली आहे. तसेच वाढीव व्याजाचे दराची नोंद दिनांक २२।६।७६ रोजी दाखल केली आहे.

आधुनिक विचार टांगायलाही एक खुंटी लागेल. आत्म्याशी एकाकार व्हावंसं वाटेल. तेव्हा त्याच्या ओठावर फक्त प्रार्थनाच येईल. त्याचे हात अपाप जुळून येतील. तेव्हा कदाचित धर्माची परिभाषा बदलेल, पण माणसाचं कॉन्शस, सत्याची कास ह्या चिरंतन गोष्टी आहेत. त्या बदलणार नाहीत.'

मी फादर डिलाहूयना म्हणतो, 'शेवटी काय तर विचाराला मर्यादा आहे. विश्वासाला नाही. म्हणून विचार त्यागणे उचित ठरत नाही.' माझं मत पुढे फारसं मी बोलून दाखवीत नाही. आपली मतं कुणावर थोपवता येत नाहीत. काढता येत नाहीत. लिझा मला मात्र माझ्या विचारांची वाटते.

लांबवर सरळ आडव्या रेखेसारखी क्षितिजरेखा दिसते. नजर पोचते तिथेवर हिरवा गालिचा अंथरलाय. हा सगळा भूप्रदेश सपाट आहे. डोंगरदऱ्या नाहीत. नदीनाले नाहीत.

आडव्या क्षितिजरेखेला काटकोनात विभागणारा रस्ता अन् त्यावर ताशी शंभरच्या वेगाने जाणारी सित्रोएन.

आकाश हलकं निळ्या रंगाचं. मधूनच एखादा ढगांचा पुंजका अल्लाद तरंगताना दिसतो.

'थँक गॉड! टुडे देअर इज नो रेन!' लिझा म्हणते.

'मी निघायच्या आधी मदर मेरीची प्रार्थना केली होती. तिनं माझं ऐकलं हं!' मॉम म्हणते. मॉम मला आपल्या इकडच्याच एखाद्या म्हातारीसारखी भाविक वाटते.

लिझा आणि मी मॉमच्या वाक्यावर एकदुसऱ्याकडे पाहत हसतो.

लांब, हिरव्या शेतांच्या पलीकडे, क्षितिजरेखेने वर उचलून धरलेले रॉकेटसारखे उंच दोन कळस दिसतात.

'कितीतरी किलोमीटर अंतरावरून शार्त्र दिसायला लागतं. प्रार्थनामंदिर तिथं पोचायच्या आधीच डोळ्यात उतरायला लागतं.' लिझा म्हणते.

प्रार्थनामंदिराचा आकार आम्ही जसजसे जवळ जातो तसा स्पष्ट व्हायला लागतो. अख्खं प्रार्थनामंदिर समुद्रात नांगरून ठेवल्या बोटीसारखं दिसायला लागतं. लांबून चित्रागत वाटणारं कॅथेड्रल जवळ येताच किती भव्य वाटतं.

प्रवेशद्वाराजवळ पायरीवर उभा राहून मी वर बघतो. कमानीचं दार. त्यात गुहेत कोरल्यागत ख्रिस्ती संतांची कोरलेली शिल्पे, गोलाकार स्तंभ, गोलाकार गुलाबाच्या आकाराची वर विशाल खिडकी. बघावं तिकडे शिल्प आहेत. अन् ह्या प्रार्थनामंदिरात अशी शिल्पं बरीच आहेत. अनाम कलावंतांनी निर्मिलेली सृष्टी.

कॅथेड्रलच्या पुढेच विसाव्या शतकात (सुरुवात) पेहरल्या जायच्या वेषात खुर्च्याटेबलं टाकून चार बाया बसल्या आहेत. त्यांनी झगे (लेहंग्यासारखे) घातलेले आहेत. मानेपर्यंत अंग झाकलं जाईल असे ब्लाऊज. त्यांच्या बाह्या मनगटापर्यंत लांब. त्यांच्या तिथे बसण्याने मलाच भूतकाळात प्रवेश केल्यागत होतं. त्या हातानं विणलेले रुमाल, हातमोजे, कलात्मक सुती दोऱ्यानं विणलेले फुलांचे आकार (नॅपकिन्स) विकायला बसल्या आहेत. फादर डिलाहूथ म्हणतात,–' दॅट वॉज दी लोकल आर्ट ऑफ शार्त्र.'

'ह्यांना पाहून वाटतं गतकाळ पुनः जिवंत झालाय. वातावरणाला त्यांच्या अस्तित्वानं ॲनशियंट लुक आलाय–' मी

'हे प्रार्थनामंदिर तसं फार पुरातन आहे. आज आहे ह्या आकारात हे बाराव्या शतकात बांधलं गेलंय. कमानीच्या दाराच्या बाजूला उभ्या संतांच्या चेहऱ्यावरचे भाव आजही जिवंत वाटतात. ही माणसंसुद्धा एरव्हीच्या माणसांपेक्षा वेगळी आहेत. त्यांचे चेहरे कसे शांत आहेत. वाटतं, त्यांनी सृष्टीची निर्मिती जणू आपल्या डोळ्यांनी पाहिलीय. इथं बायबल दगडात कोरलं गेलंय.' ते बायबलमधील एकेक कथा सांगतात–अब्राहामची, मोझेसची, सॅम्युएलची, डेव्हिडची. आणखी कितीतरी संतांची.

'तुम्ही शार्त्रला कितीदाही या. बायबलची एकेक कथा पाहत चला. आयुष्य उणं पडतं. दरवेळेस मला वेगळंच काहीतरी गवसतं. साक्षात्कारासारखं.' लिझा म्हणते.

माझ्या पिढीची वाटणारी लिझा माझ्यापासून विचारांनी पृथक् माझ्यासारखी वाटते. फादर अन् मॉम कॅथेड्रलच्या आत जातात.

'प्रार्थनामंदिराची कलात्मक निर्मितीच मला साक्षात्कारासारखी वाटते. इट इज ए पोअेम इन स्टोन.'–मी.

'ॲन्ड इट बिकम्स प्रेयर व्हेन इट हॅज टच ऑफ डिव्हिनिटी... बघ. इथं कलावंतानं येशूला देवाच्या जागी कल्पिलं आहे. कल्पिलं तरी कसं म्हणावं. सेंट जॉन त्याच्या गॉस्पेल मध्ये म्हणतो ना? ऑल थिंग्ज वेअर मेड बाय हिम-दी ओन्ली बिगाटन सन. इथं दगडात सृष्टिचा इतिहास कोरलाय, स्वर्ग-पृथ्वी, दिवस-रात्र, पाणी-झाडं, सूर्य-चंद्र, पक्षी-मासे साऱ्यांची निर्मिती झालीय. एकेका शिल्पात ते स्पष्ट आहे. नंतर त्यानं स्वत: निर्मिलेल्या वस्तूकडे पाहिलं. अन् त्याला वाटलं, नाही! अजून निर्मिती पूर्णत्वाला पोचली नाही. त्याच्या डोक्यात मानवनिर्मितीचा घोळ चाललाय.' ती बोटांनी खुणावते, 'ते शिल्प बघ. तिथं पलीकडे. मनात माणसाची प्रतिमा तयार झालीय. एकाच शरीराला दुसरं तोंड लागलंय. येशू अन् त्याच्या मनात घोळणारं माणसाचं रूप. ॲन्ड ही क्रिएटेड मॅन इन हिज ओन् इमेज. येशू वाकलाय. आपल्या हाताच्या बोटांनी निर्मितिक्षम माणसाचा चेहरा कुरवाळतो आहे. बसलेल्या येशूच्या पायाशी माणूस बसला आहे. त्याचं डोकं त्यानं येशूच्या मांडीवर ठेवलं आहे. येशूचा स्पर्श जणू कुंभारानं नुकतच घडवलेलं ओलं मृत्तिकापात्र बोटांनी हळुवार स्पर्शावं तसा. नंतर ईव्हची निर्मिती...'

ॲडम ईव्हची सगळी कथा पुढं दगडात साकार आहे. टेम्प्टेशन् आणि पुढची कथा माणसाने केलेल्या निर्मितीची. येशू हात दाखवीत जणू आशीर्वाद देतोय. मान्यता देतोय, ह्यापुढे हातात हात घालून जाणाऱ्या पापपुण्याला.

मी म्हणतो–' लिझा, तुला पटतं की नाही माहीत नाही? तसा मीही धर्मावर फारसा विश्वास ठेवत नाही. पण ख्रिश्चियन आयडियॉलाजीशी माझे विचार विसंगत आहेत. म्हणजे काय? सगळा धर्माचा डोलाराच एका पापाच्या कल्पनेवर आधारला आहे! मुळातच माणसाला 'सिनर' ठरवून टाकलंय्. ॲन्ड बिकॉज यू आर ए नीड सॉल्व्हेशन हे मूल तत्व. माणूस जे काही करतो त्याला पापपुण्य म्हणणं म्हणजे मूळावरच प्रहार केला गेलाय. आणि पापपुण्याच्या कल्पनाच मुळी काळस्थितीनुरूप बदलत्या आहेत.'

'तू खूप खोलात जातोस. जगताना एवढा विचार करणं बरं नसतं. माझ्या कल्पनेत माणूस वेगळाच आहे. गॉड क्रिएटेड मॅन ॲन्ड वुमन ॲन्ड दे वेअर डूम्ड टू लिव्ह!' ती म्हणते. आत जायला लागते. मी सोबत असतो.

आत एकदमच शांतता आहे. सृष्टीच्या निर्मितीच्याही आधी राहिली असावी अशी. धड उजेड नाही, धड अंधार नाही. काळ पेंगल्यासारखा. जमिनीपासून छत तितकंच उंच वाटतं जितकं पृथ्वीपासून आकाश. लांबच लांब मोकळी जागा. मोकळा अवकाश. ज्या कुणी प्रार्थनामंदिराच्या बांधणीची कल्पना प्रथम प्रसवली असेल त्याच्या कल्पनाशक्तीला दाद द्यायलाच हवी. काळ (Time) आणि (Space) अवकाश यांचा समन्वय सुंदर साधला जातो. वातावरण निर्माण केलं जातं ते असं. जिथं माणसाचा सारा अहंभाव (ego) मोठंपण समर्पित होतं.

रिकामे बेंच, दूरवर तेवत्या मेणबत्त्या, उंच गोलाकार स्तंभ, कमानी, भितींना खालून वरपर्यंत चित्रांकित काचेच्या खिडक्या. (खिडकी शब्द तसा प्रस्तुत नाही पण दुसरा पर्यायवाची शब्द मलाही माहीत नाही.) कितीतरी. भवतीभोवती. काचेवरील रंगही वेगवेगळे. निळा, लाल, करडा, पिवळा... आणि त्यातून झिरपणारा सूर्यप्रकाश म्हणजे आभासांची. रंगांची वेगळी सृष्टी.

लिझा माझ्या हातात बॉयनाक्युलर देते. म्हणते, 'उंचावरच्या खिडकीच्या काचांवरची चित्रं इथून दिसायची नाहीत. ह्यातून बघ.' *बायबलमधील कथा* काचांवर चित्रांकित आहेत. ही कलानिर्मिती (स्टेन्ड ग्लास आर्ट) तेराव्या शतकातील. आता अस्तंगत झालीय्. दुसऱ्या महायुद्धात काही खिडक्यांच्या काचा तडकल्यात, तुटल्यात, फुटल्यात. त्यांच्या दुरुस्तीचं आणि नवीनीकरणाचं काम सुरू आहे. त्याकाळी वापरल्या गेल्या रंगाचं वैभव आता मात्र नाही. आकारांची सृष्टी आता नाही. प्रयत्न करूनही त्या कृतींच्या समांतर कृती आता निर्माण करता येत नाहीत. लिझाही अशीच ग्लासवर्क आर्टिस्ट आहे. त्या तोडीची कामं आता करता येत नाहीत म्हणून ती हळहळते.

'आधी इथं मी यायची ना, तेव्हा फारसं काही समजत नसे. भक्तिभावात चिंब होऊन येत असे. पुढेपुढे मी इथल्या काचेच्या रंगात दंग झाले. रेखा, आकार, रंग ही माझ्या आविष्काराची माध्यमं झालीत आणि इथल्या कलाकृतीत मला वेगळा साक्षात्कार झाला. वाटलं. कलेचं हे क्षेत्र कमालीचं रितं आहे. इथल्या एकशेसदुसष्ट खिडक्यांत बायबलमधील कितीतरी कथा आहेत. मी प्रत्येकाचा अभ्यास केला. माझ्या आत्माविष्काराला बळकटी यावी म्हणून.'

'कला आणि अभ्यास हे खरं तर धर्म आणि भक्ती ह्यांचे पॅरलल.'

'तसंही म्हण हवं तर! मला तर अजूनही माणूस, नियती, धर्म, देव ह्यांचा अन्योन्य संबंध उलगडत नाही. ज्या गावी जायचं नाही, त्याचा विचार तरी कशाला करायचा? तत्त्वज्ञ बरेच आहेत की? त्यांनी संशोधन करावं ह्या गोष्टीचं.'

'ही कुणालाही न उलगडणारी कोडी आहेत, लिझा. जो म्हणतो मला सारं समजलं आहे, तो त्याचा दंभ आहे, किंवा अज्ञानही म्हण हवं तर! प्रत्येकानं कुणीतरी आधीच आखून ठेवलेला मार्ग आक्रमायचा. तेही जगायचं म्हणून. तुझ्यापुरते जगायचे संदर्भ तू कलेत शोधलेस. एरवी तू म्हणालीस तेच खरं. एव्हरीवन इज डुम्ड टू लिव्ह. अस्तित्वाचा तेवढाच अर्थ.'

ती वरच्या काचांकडे पाहत म्हणते, 'तिथून झिरपणारा प्रकाश पाहिलास? दिवसभर छायाप्रकाशाचा खेळ चालला असतो. वेगळ्याच रंगाविष्कारात. तासातासागणिक अन् ऋतुमानानुसार. प्रकाशही कसा तर निरागस बालकाच्या निष्पाप हसूसारखा, तर कधी नवोढेसारखा चंचल, तर कधी अनुभवानं दगड झाल्या प्रौढेसारखा, कधी लोण्यासारखा मुलायम, तर कधी पेटत्या वडवानलासारखा. सायंकाळी सूर्यकिरणं जगाचा निरोप घेऊ पाहतात तेव्हा तर रंगांची आगळीच आरास उभी होत असते. प्रकाशाचे दूत भिंतीवर, स्तंभावर, कमानीवर जणू सोन्याचा मुलामा चढवून ठेवतात. रात्रभर प्रार्थनामंदिर सोन्यागत चमकत राहावं ह्या ईर्षेपोटी. इट इज ए साईट टू एक्सपिरियन्स! सूर्य जाताना मेरीला सुवर्णवस्त्र भेट करतो आहेसं वाटतं.'

'लिझा! यू हॅव्ह बिकम पोएटिक!'—मी.

ती दबावाखाली हसल्यात म्हणते, 'आय् ॲम ह्यूमन. इट्‌ इज लक्झुरी टू बी पोएटिक ॲट ह्यूमन लेव्हल.'

इथलं सगळं वातावरण भारल्यागत आहे. *काळ इथं गुलाम आहे. बंदिस्त कैद्यासारखा* दबा धरून बसलाय्. अन् पोकळीत व्याप्त अवकाश—महापुरात तुडुंब भरल्या नदीसारखं. आतून एका पोकळीतून वाटतं आवाज येतो आहे. प्रार्थनेचे सूर कानात घुमताहेत. अस्तित्व समर्पित होत आहे.

At the hour when we are trembling with tenderness lips form *prayers to broken stones...*

कदाचित अशाच एखाद्या ठिकाणी आल्यानंतर टी. एस. इलियटच्या ओठावर वरील ओळी आल्या असतील.

पुढे मेरीचा संगमरवरी पुतळा आहे. तिच्या मांड्यावर येशूचा क्रूसावरून काढलेला विगलित देह अस्ताव्यस्त पडला आहे. तिनं त्याला सावरून धरलं आहे. तिचा चेहरा वात्सल्यात-आर्द्र करुणेत चिंब.

प्रार्थनामंदिरातून परततो तेव्हा डोळे भरून यावेत तशी पूजा ओठावर येऊ पाहते. अन् मला मर्ढेकर आठवतात.

—ओठावर आली पूजा, भरे मनात कापरे. □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तक परिचय.

# Inside The Company CIA Diary-

By Philip Agee,
(Pages 640, Penguine Books)

CIA बद्दल नियतकालिकातून व पुस्तकातून एवढी माहिती येते की, ती कात्रणे कुठे लावावी हा आमच्या वाचनालयाचा एक प्रश्नच बनला आहे. माझ्या वाचनालयात CIA वर फक्त तीन पुस्तके आहेत. अॅजीचे एक, मार्चेटी व जॉन मार्क्सचे CIA And The Cult of Intelligence दुसरे व मंगेश पदकींनी अनुवादित केलेले सी. आय. ए. चे अंतरंग हे मराठी तिसरे. बऱ्याच कात्रणांपैकी काही amusing कात्रणे मी या पुस्तकाला लावून टाकली आहेत. त्यांतली थोडी उद्धृत करतो. CIA च्या कारवायांना Dirty Tricks म्हणतात ते किती औचित्यपूर्ण आहे त्याची यावरून कल्पना येते !

एका मनुष्याची शरीरयष्टी लांबून साधारण प्रेसिडेंट सुकार्नोसारखी दिसायची. त्याला CIA ने 'कामावर' घेतले व प्लॅस्टिक सर्जरी करून त्याला अधिकच सुकार्नोसारखे केले. नंतर काही स्त्रियांबरोबर त्या गृहस्थाची blue film घेतली गेली व त्याला Happy Days असे नाव दिले ! नंतर ती फिल्म KGB ने (रशियाचे सिक्रेट पोलिस) इंडोनेशियात स्मगल केली अशा बातम्या CIA ने पसरविल्या. (म्हणजे Dirry Trick within a Dirty Trick !) नंतर मात्र काही कारणास्तव निर्णय बदलला व CIA ने माघार घेतली.

अमेरिकेचा प्रसिद्ध इनव्हेस्टिगेटिव्ह रिपोर्टर जॅक अँडरसन यांनी एकदा असे जाहीर केले की, जेव्हा सन १९५९ मध्ये क्रुश्चेव्ह अमेरिकेस गेले होते तेव्हा क्रुश्चेव्हला नकळत त्याचे solid waste CIA ने गोळा केले होते. (आता ते solid waste होते का श्रीमंतांचा आहार घेऊन diarrhoeal waste होते हा एक KGB साठी संशोधनाचा विषय ठरावा.)

एकदा सौदी अरेबियाचा राजा मांटे कार्लोमध्ये कॅसीनो खेळायला गेला होता तेव्हा बाथरूममधल्या पाईप्सला मूत्र गोळा करण्यासाठी CIA ने पात्र लावले होते. आता या पॅथॉलॉजिकल सँपल्स गोळा करण्याच्या कारवायांना अगदी Real, super, dirty tricks म्हणावे लागेल !

इजिप्तचा प्रेसिडेंट नासेर म्हणजे एक मासलेवाईक नमुनाच ! CIA ने एकदा त्याला ३० लक्ष डॉलर्स देऊन भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. नासेरने ते पैसे स्वीकारले व नंतर जाहीरसभेत ते पैसे स्वीकारल्याचे त्याच्या लोकांना सांगून टाकले. म्हणजे आहे की नाही अभ्रष्ट भ्रष्टाचारी !

एका पाकिस्तानी वृत्तपत्राने एकदा छापले होते की, CIA प्रेसिडेंट आयूबखान याला दरमहा ७० हजार डॉलर्स १४ वर्षेपर्यंत देत होती ! कारण पेशावर येथून रशियावर हेरगिरी करण्यासाठी आयूबखानने USA ला मुभा दिली होती आणि गाजलेले U-2 विमान (फ्रॅन्सीस गॅरी पॉवर्स वैमानिक) 'पाडले' होते. त्यांनी पेशावर येथूनच उड्डाण केले होते.

आत्तापर्यंत CIA ने अक्षरश: हजारो लोकांना देशोधडीला तरी लावले किंवा निजधामास तरी पाठवले. माझ्या वाचनालयातल्या १५ जानेवारी १९७६ च्या कात्रणात तर अशी बातमी आहे की, कित्येक लोकांचा खून करण्यासाठी CIA ने कोब्रा नागाचे विष वापरले आहे.

डॉ. नो मध्ये जेम्स बॉंड म्हणतो की, त्याला एकदा फूगू नावाचे विष दिले होते. हे विष जपानच्या ग्लोब जातीच्या माशाच्या जननेंद्रियापासून बनवले जाते. त्याचा असर फारच लवकर होतो व ते जालीम असते. एकदा निक्सननी असा हुकूम काढला होता की, CIA कडे असलेल्या सर्व प्रकारच्या विषाच्या साठयाचा नाश करावा. तरीही वरील फूगू प्रकारचे एक विष (ज्याचे नाव सेक्सीटोक्सीन आहे) CIA ने दडवून ठेवले. ते अवघे १०.९ ग्रॅम होते. त्याच्या जोडीला ८ मी. ग्रॅम कोब्रापासून बनविलेल्या वीषाचे होते. पण एवढे विष हजारो लोकांना मारायला पुरेल एवढे आहे.

आणखी एक टाईम्स ऑफ इंडियाची (दि. ८-१-७५) ची बातमी बघा. वॉशिंग्टन येथे एका ५ मजली इमारतीत CIA ने एक यांत्रिक राक्षस ठेवला आहे. हा राक्षस सर्व पृथ्वीवरची मौल्यवान माहिती गोळा करतो. त्या राक्षसाला 'N-Pic' असे नाव दिले आहे. त्याचे डोळे अवकाशात आहेत व कान जगभर विखुरले आहेत. त्या राक्षसाची किंमत कोटयवधी डॉलर्समध्ये आहे. हा राक्षस CIA ची ७० टक्के माहिती गोळा करतो. २५ टक्के माहिती परस्पर वकीलातीच्या संपर्कातून मिळते. फक्त राहिलेली ५ टक्के माहिती घरफोडी, bugging वगैरे प्रकारांतून मिळते.

CIA चे एजंटस् जगभर या ना त्या स्वरूपात वावरत असतात. एकदा हॉवर्ड हंट या वॉटरगेटमधील पात्रांनी असे जाहीर केले होते की, बरेच लेखक 'प्रवासवर्णन' लिहिण्यासाठी परदेशी जातात. पण खरोखरच ते CIA चे एजंटस् असतात. ही पुस्तके जी कंपनी प्रकाशित करते त्याच्या चालकाचे नाव युजीन फॉडॉर असे आहे. फॉडॉर स्वत: ऑस्ट्रियामध्ये CIA एजंट होता.

मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय व्यापारी कंपन्यासुद्धा मोबदला घेऊन CIA एजंटस्ना थारा देतात. म्हणजे एखाद्या आंतरराष्ट्रीय कंपनीचा बडा executive सुद्धा CIA एजंट असू शकतो.

थोड्या महिन्यांपूर्वी डेबोनेअर मासिकात अॅजीची मुलाखत आली होती. ती मुलाखत Brad Darrach या इसमाने घेतली होती. इतकी सुरेख व मुद्देसूद मुलाखत मी बऱ्याच दिवसांत वाचली नव्हती.

अॅजीनी १२ वर्षे CIA मध्ये नोकरी करून हे पुस्तक का लिहिले असे त्यांना विचारण्यात आले असता त्यांनी उत्तर दिले, CIA ने लक्षावधी लोकांना मारले किंवा त्यांच्या आयुष्याचा सर्वनाश केला.. माझ्याने ते पाहवले नाही म्हणून शक्य तेवढ्या CIA च्या कारवाया मी उघडकीस आणल्या. CIA हे नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलला जबाबदार असते व ही कौन्सिल प्रेसिडेंटने निवडलेली असते. एकंदर CIA म्हणजे प्रेसिडेंटची एक सेनाच. आपले उद्दिष्ट साधण्यासाठी परदेशात CIA अफवा पसरवते, खोट्या सह्यांची कागदपत्रे तयार करते, कामगारांना संप करावयास चिथावते, जाहीर सभेत अडथळे

आणणारे श्रोते पाठवते. एक ना अनेक !

सन १९६५ मध्ये इंडोनेशियात CIA नी घोर कृत्ये केली. प्रेसिडेन्ट सुकार्नोला तर CIA ने उडविलेच, परंतु ५,००,००० ते १,००,०००० लोक त्या सरकारला उलथून पाडण्यात मारले गेले.

आता CIA चे एजंटस् परदेशांत जाऊन त्यांची उद्दिष्टे कशी साध्य करतात ते पाहू. समजा, CIA ला एखाद्या डाव्या गटातील पार्टीच्या आत foothold पाहिजे आहे. मग त्या पार्टीचा एखादा weak point शोधून काढायचा. पार्टीच्या नेत्याचा टेलिफोन 'बग' करायचा. कदाचित तो नेता पार्टीचे पैसे इकडे तिकडे करीत असेल किंवा त्याच्या खाजगी जीवनात अशा काही घटना घडल्या असतील की त्याचा जर गौप्यस्फोट झाला तर त्याचे चारित्र्यहनन होईल. एकदा अशी बातमी हातात आली की, त्या पार्टीवर CIA वरचष्मा ठेवू शकते. श्रीमंत देशात ideology खाली बऱ्याच लोकांना CIA त्यांच्या बाजूला करून घेते. विकसनशील देशात पैशाची लाच देऊन त्याला हेर करण्यात येते.

जगात हजारो पोलिस नकळत CIA ची कामे करतात. कारण त्या पोलिसांचा वरिष्ठ CIA ने आपल्या बाजूने केलेला असतो. आणि हे पोलिस जणू आपण आपले कर्तव्यच करीत आहोत या भ्रमाखाली कित्येक माहिती मिळवून देतात ! कधी कधी परिस्थितीवर अवलंबून CIA विकसनशील देशामधील 'हेराला' ८०० रु. दरमहा पगार देते. मंत्र्याची किंमत लॅटिन अमेरिकेत ६००० पर्यंत आहे.

ॲजीला CIA चे पहिले काम क्विटो, युकेडोर, इथले मिळाले. क्यूबा अगदी डावीकडे झुकला होता व वंड निर्यात करीत होता. त्याचा संसर्ग युकेडोर व इतर देशांनाही लागेल अशी धास्ती स्टेट डिपार्टमेंटमध्ये होती. म्हणून युकेडोरचे सरकार उलथून पाडायचे असा बेत CIA ने आखला. त्यासाठी CIA ने २०,००,००० डॉलर्स खर्च केले. युकेडोरच्या vice president रिनाल्डॉ वारी याला दरमहा रु. ८००० देऊन क्विटोमधल्या सर्वोत्कृष्ट हॉटेलात त्याला रतिक्रीडा करण्यासाठी कायमचे ठिकाण करून दिले. प्रेसिडेंटचा खाजगी डॉक्टर फॅलीप आव्हेल यालासुद्धा CIA च्या payroll वर घेतले ! इतर अनेक लहानमोठे लोक CIA ने आपल्या बाजूने करून घेतले, आणि CIA हे जणू युकेडॉरचे गुप्त सरकारच बनले !

ॲन्टॉनीऑ फ्लॉर्स वेनीटेझ नावाचा युकेडॉरमध्ये एक मंत्री होता. त्याला काही 'विकत घेण्याची' सोय नव्हती. कारण तो, त्यातला नव्हता. त्याला CIA ने कसा डावलला त्याचे वर्णन फार मजेशीर आहे. या मंत्र्याची बायको फार वावदूक होती. तिच्याकडून CIA ने थोडी माहिती गोळा केली व तो हेवानाला कधी जाणार आहे ते काढून घेतले. नंतर ॲजीने एक 'रिपोर्ट' तयार केला. तो रिपोर्ट फ्लॉर्स या मंत्र्याने क्युबन लोकांसाठी तयार केला असे भासविण्यात आले. रिपोर्टमध्ये असे होते की फ्लार्सला क्यूबाकडून बरीच आर्थिक मदत मिळाली होती व आणखीन पैसे हवे होते ! हा 'रिपोर्ट' ॲजीने स्वतःच्या बॉसला दाखवला. बॉस एकदम खूष ! लागलीच त्याने तो रिपोर्ट जुना दिसावा म्हणून बुटाखाली (न फाडता) चुरगाळला. नंतर त्याने तीन तास खर्च करून एका टूथ पेस्टमधली सर्व पेस्ट काढून तो रिपोर्ट त्यात टाकला व ॲजीला सांगितले, फ्लॉर्स क्यूबाहून थोड्याच दिवसात परतणार आहे. तू ही टूथ पेस्ट अर्थमंत्र्याला दे. नंतर तो अर्थमंत्री ती कस्टम इन्स्पेक्टरला देईल. फ्लॉर्स विमानतळावर आला की कस्टम इन्स्पेक्टर फ्लॉर्सचे सामान तपासल्यासारखे करील व हळूच टूथपेस्ट त्याच्या बॅगेत टाकून देईल. नंतर ती टूथपेस्ट त्याला तिकडेच सापडली असा भास दाखवील. म्हणजे देशोधडीला जातीलच आपले फ्लॉर्स साहेब ! आणि झाले पण तसेच ! अर्थात त्या अर्थमंत्र्याला व कस्टम इन्स्पेक्टरला CIA ने विकत घेऊन ठेवले होते !

CIA मध्ये भरती होताना किती कठीण चाचणी होते याची ॲजी याने या पुस्तकात माहिती दिली आहे. CIA ज्यांची भरती करते त्यात ओठाच्या हालचालींवरून कोण काय बोलत आहे हे जाणणारे तज्ज्ञही असतात पुस्तकाच्या शेवटी ॲजी असे म्हणतो की त्याची ही 'डायरी' आर्थिकदृष्ट्या यशस्वी झाली तर तो इतर अनेक CIA एजंटस्ना CIA च्या कारवाया वेशीवर टांगण्यास मदत करील. त्याचे पुस्तक निश्चितच यशस्वी झाले आहे. पण पुढे त्याच्या निर्धाराला काय झाले ते कळलेच नाही.

भारतात जेव्हा अणुस्फोट केला गेला त्याची माहिती सी. आय्. ए. ला आधी नव्हती अशी बातमी २१–१–७६ च्या टाईम्स ऑफ इंडियात आली होती. CIA सारख्या एका अवाढव्य व कार्यक्षम संघटनेला आपल्या नेत्यांनी अणुस्फोटाचा थांगपत्ता लागू दिला नाही, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे.

जे. एन्. पोंडा,
फिनिक्स लायब्ररी


**NEW TITLES RECEIVED**

1) Pandoro's Box– ( Bestseller–Thriller ) Thomas Chastain — Rs. 10/–
2) Looking For Mr. Goodbar– ( Bestseller–Novel ) Judith Rossner — Rs. 18-90
3) The Other Side of Midnight–( Bestseller–Novel ) Sidney Sheldon. — Rs. 13·00
4) King Ral–( Bestseller–Novel )–James Clavell — Rs. 8/–
5) The Glass Inferno–( Bestseller–Partly Picturised in Towering Inferno ) Thomas N. Scortia & Ferank M. Robinson. — Rs. 16-95
6) The Tragedy of The Moon–( About The Moon, Earth & Fiuture)–Isaoc Asimor — Rs. 12/–

- आपणास पाहिजे असलेली पुस्तके आम्ही परगावीही पुरवतो. ( V. P. नाही. )
- आपल्या पुस्तकांना प्लॅस्टिक कव्हर्स घालून देऊ.
- नॉन–मेंबसंना डेलि बेसीसवर पुस्तके वाचावयास मिळतात.
- दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०,**

पुस्तकें

# एरिअल आणि पोरकं पाखरू

अशोक प्रभाकर डांगे

पासष्टनंतरच्या दशकात सत्यकथेच्या माध्यमातून काही नवे कथाकार पुढे आले. *अनिल डांगे, श्याम मनोहर, आनंद विनायक* जातेगावकर, ही त्यांतली काही ठळक नावे. हे सर्वच कथाकार आपल्या वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वातून घडत गेले. जातेगावकर मानवी भावनांच्या नाजूक संवेदनाच चित्रण करत गेले, तर श्याम मनोहर आणि अनिल डांगे दोघंही कथाक्षेत्रात काहीशा विज्ञाननिष्ठ जीवनानुभवांचा वेगळा आविष्कार घडवत राहिले. 'मौजे 'ने प्रसिद्ध केलेला 'एरिअल आणि पोरकं पाखरू ' हा अनिल डांगे यांचा पहिलाच कथासंग्रह. त्यांच्या चौदा कथा त्यात संग्रहित झाल्या आहेत. अनिल डांगे यांच्या कथाविश्वाची तीन ठळक प्रकारात विभागणी करता येईल. एक म्हणजे अनुभवात्मक कथा. एका ओल्या रात्री, पांघरूण, रस्ता, डबकं ह्यांसारख्या त्यांच्या कथांचा ह्यात अंतर्भाव करावा लागेल. डबकं ह्या कथेत फार्मसीचा डिप्लोमा घेऊन मेडिकल स्टोअरमध्ये पावत्या फाडणाऱ्या तरुणाच्या मनःस्थितीचं आणि त्याच्याकडून कोकेन गोळ्या घेऊन मग त्याला *त्याच्या इच्छेविरुद्ध कठोरपणे* घराबाहेर काढणाऱ्या एका प्रौढ मास्तरणीचं मोजकं वर्णन करतात, तर पांगळा होऊन, रस्त्याला पारख्या होऊन बसलेल्या तरुणाच्या रस्त्यासंबंधीच्या आठवणींचं वेधक चित्रण ते रस्ता ह्या कथेत करताना दिसतात. ह्या साऱ्याच कथा वास्तववादी जीवनाचा वेध घेताना दिसतात. डांगे यांचे अनुभव बऱ्याचदा तरल असतात. त्यांचं नेटकं चित्रण ते घडवतात. पुष्कळदा हे अनुभव एक धडपडतं तरुण मन आणि त्यावरील पूर्वायुष्यातल्या आठवणींची प्रतिबिंबं यांच्याशीच निगडित होताना दिसतात. त्यात तरुण मनाचे कल्पनाविलास असतात, शरीराची अनावर आकर्षणे असतात, ह्यात आपलं घर असत. घरातल्या आठवणी असतात. रस्त्यावर नग्न होऊन नाचणारी प्रौढ वृंदा असते. तिच्यावर मुकेपणीच प्रेम करणारा भाई असतो. एखाद्या दंगलीतला त्याचा मृत्यू असतो, त्याच्या मृत्यूची भरपाई हळूच घेऊन येणारे दादा असतात, आपल्या रखेलीला इतरांना देऊ करणारा लॉज मालक बाबूशेट असतो, सत्तर रुपयांच्या मोबदल्यात त्याला शरीर देणारी एका रात्रीची एक पॅसेंजर स्त्रीही असते. मनाचा अढळ असा ओलावा डांग्यांच्या ह्याच कथांतून जाणवतो. डांगे आपल्या शब्दांची मांडणी अगदी सुटसुटीत करत असले तरी, भावनात्मक अनुभवाच्या विस्तृत चित्रणात ते अपुरे पडतात. मनोगत संघर्षाच्या मांडणीतल्या उणेपणामुळेच डांगे यांच्या डबकं किंवा एका ओल्या रात्रीसारख्या कथा हळुवार असूनही अपुऱ्याच वाटतात.

कारखाना, सूर्यकाच आणि यंत्र यांसारख्या कथांत डांगे एका निराळ्याच अनुभवविश्वाचा आविष्कार करताना दिसतात. सारे अनुभव एखाद्या तरुण, धडपडत्या ट्रेनी इंजिनीअराचे असतात. सूर्यकाच आणि यंत्र या कथेत ते एका कोसळू पाहणाऱ्या *कारखान्याच्या छताला कथाविषय बनवतात*, तर कारखान्यात नव्यानंच दाखल झालेल्या एका ट्रेनी इंजिनीअरची होलपट 'कारखाना'-सारख्या कथेत ते प्रभावीपणे रंगवताना दिसतात. डांगे यांच्या या कारखान्यात मालकांचे पुतळे असतात, त्यावर हगणारे कावळे असतात. कळकट टीनची कँटिनं असतात. मटक्यांचे आकडे, सोन्याची बिस्किटं असतात. प्रकृती आणि विकृतीचे संदर्भ असतात आणि ह्या साऱ्यांवर उठून दिसणाऱ्या तरुण मनातल्या अगतिक हालचालीही असतात. डांगे यांच्या सर्वच कथा परिस्थितीतला उपरोध; विलक्षण प्रभावीपणे चित्रित करतात. ह्या उपरोधासाठी ते घटनाचं माध्यम वापरतात. शब्दांऐवजी त्यांच्या घटनाच बोलक्या ठरतात. सूर्यकाच आणि यंत्र हीदेखील एक उपरोधिकच कथा आहे. ओघळणारं छत दिसू नये म्हणून कामगारांना गॉगल्सची सक्ती, ते वापरण्यासाठी धर्मप्रचारक, मग यंत्राविरुद्ध *भावड्या माणसाची करणी, त्याच्या* दुष्परिणामासारखे त्याच कामगारांचे मृत्यू, मग प्रत्यक्षात कोसळणारं छत. कामगार आणि मॅनेजमेंटमधला संघर्ष ते अचूकपणे रंगवतात. कामगारांची सुरक्षितता व त्यांच्या वाजवी मागण्या दडपणारे क्रूर मालक, मानवी दोषांचं हे विडंबन विलक्षण प्रभावी ठरतं.

डांगे यांचं अनुभवविश्व एका अर्थानं तसं मर्यादितच आहे. त्यांच्या बऱ्याच कथा त्यामुळे ठराविक अनुभवाभोवती फेर धरताना दिसतात शिवाय त्यांच्या सर्वच कथांचा शेवट डांगे नाट्यपूर्णरीतीने करतात—इतका की कथेच्या परिणामाच्या दृष्टीने असा शेवट बाधकही ठरण्याची शक्यता असते. पण याशिवाय डांगे काही उत्कृष्ट रूपकात्मक कथा लिहितात. अस्तित्वाचा शब्द, अंतरिक्षातील रॉबिन्सन क्रूसो ह्याच प्रकारात मोडते. कधी कधी डांगे वास्तव आणि कल्पना यांचा उत्कृष्ट वापर करून अंधक : फॉसिल्ससारख्या कथा प्रभावी करून सोडतात. अमीबा ही अशीच एक उत्कृष्ट कल्पनात्मक कथा. परमाणुमिश्रित धुळीपासून स्वतःला वाचवण्यासाठी ड्रेनेजमध्ये वर्षानुवर्षे दडून-झडून-सडून गेलेल्या माणसाला उभा करते, आणि अखेर परिस्थिती त्याचाच बळी घेते. डांगे यांच्या शैलीतली विज्ञाननिष्ठता अमीबा ही कथा ठळकपणे दाखवून देते.

एरिअल आणि पोरकं पाखरू हा डांग्यांचा तसा पहिलाच कथासंग्रह. डांगे यांचं सारंच कथाविश्व वेगळं जरी असलं तरी मनावर खोलवर प्रत्ययकारी ठसा उमटवण्यात डांगे यांचा आशय कोठेतरी अपुरा ठरतो. पण तरीही एक नवा कथालेखक ह्या दृष्टीने डांगे हे फारच प्रभावी ठरतात. 'मौजे 'चं हे आणखी एक नवप्रकाशन नव्या कथेच्या संदर्भात निश्चितच एक लक्षणीय दुवा ठरेल. ◻

एरिअल आणि पोरकं पाखरू
अनिल डांगे
मौज प्रकाशन
पंधरा रुपये



मुद्दाम हौसेने बांधलेल्या व्हरांड्याची
फिरून बंदिस्त जाळीदार सोय
हात आत जाऊ नये इतपत शंकरपाळी डिझाइन
गच्चीच्या कठड्यावर
उगाच अधिक रेललेली सायंकाळ
कुत्र्याच्या भरोशावर अर्धवट उघडे
रिटायर्ड फाटक
चकचकीत वस्तीतल्या टापटिपी गॅरेजचं सरकतं दार
नागनवेलीनं झाकलेल्या खिडकीच्या गच्च सळ्या
कारखान्याच्या छपरात हरवलेल्या झुळ्या
लोखंडाचं जग,
तसं अनिवार्य,
थंड नि अवजड,
पण रंगवल्यानं जरा सलगी साधणारं, असं
NEROLAC
NEROLAC
SOLDIER
आणि त्यासाठी फक्त
नेरोलॅक


U-GNM-27

# कायदा आंधळा असतो ! : पृष्ठ १२ वरून

साखरफुटाणे पेढे, मिठाई घेऊन देतील, नवे कपडे देतील या कल्पनात तो रंगला होता.

या कहाणीची माझी येथवरची हकीकत मी मामाहून पुष्कळांनी बोललेली ऐकून, कित्येकांना विचारून व त्यावरून कल्पना करून लिहिलेली आहे. या कहाणीतला माझा संबंध आला तो ज्यावेळी मी वकिलीची सनद नुकतीच काढून अकोल्यास वकिलीची सुरुवात करण्याची तयारी करीत होतो, काळा कोट घालून रोज कोर्टात जात होतो, कोणी वडील–सीनियर वकिलांनी– सांगितलेली कामे नीट रीतीने करून दाखविण्यात कसूर होऊ नये याकडे लक्ष देत होतो, पण फुरसतीच्या वेळी निरनिराळ्या कोर्टात जाऊन तेथे चाललेल्या केसेस बघण्याऐकण्यात रस घेत होतो, काही बघून–ऐकून शिकत होतो, त्या दिवसातला आहे. त्या दिवशी मला फुरसतच होती. इकडे तिकडे मन रमविण्याच्या– काही शिकण्याच्या– शोधात मी अॅडीशनल डिस्ट्रिक्ट अॅण्ड सेशन्स जज्जसाहेब यांच्या कोर्टाजवळ जाताच, बाहेर व्हरांड्यात मी एकाददोन बायका व त्यांच्याबरोबर दहापाच बाप्ये लोकांची गर्दी बघितली. लोकांची कुजबुज चाललेली ऐकून तिकडे पाय वळविले. बाहेर एका बेंचावर एक म्हातारे पाटीलबाबा, सुरवातीला वर्णन केलेल्या पांढऱ्या झुलपावर घातलेल्या तांबड्या पागोट्यावर उपरण्याचे फेरे टाकलेले, अंगात शुभ्र पैरण नुकतीच धूळ झटकलेली, धोतर काच्या मारून घट्ट नेसलेले, हातात चांदीच्या मुठीची काठी घेऊन बसलेले होते व त्यांच्या मांडीवर एक गुबगुबीत चेहऱ्याचे साडेतीन चार वर्षांचे मूल बसले होते. पाटीलबाबा उजव्या हाताने त्याला घट्ट धरून बसले होते. मुलगा चळवळ करीत होता. 'बाबा, बाबा' म्हणत पाटीलबाबांना बोबड्या भाषेत काही काही प्रश्न विचारीत होता. 'आपण केव्हा परत जायचे, बाजारात मला खेळणे, गाडी घेणार ना, म्हणून विचारीत होता.' कसल्या कसल्या उत्सुकतेने त्याचे तोंड उजळत होते. पण पाटीलबाबांचा चेहरा धुळीने मळकट झालेला, पण डोळे नि गाल पुन्हा पुन्हा पुसल्यामुळे तेवढा भाग स्वच्छ दिसणारा असा होता. 'बाबा' मुलाच्या प्रश्नाला एखादादुसरे उत्तर देत होते. परंतु भकास चेहऱ्याने इकडे तिकडे बघत होते. दरवाज्यावरचा शिपाई बाबांना 'हे हवे का? विडीकाडी मागवून देऊ का?' अशी अगत्याने चौकशी करीत होता. संभवतः त्यांना पूर्वीपासून ओळखीत असावा. पलीकडच्या घोळक्यातली आकर्षणाचे केंद्र झालेली तरुण पोरसवदा बाई तोंडात रंगलेला विडा चघळीत तिच्याकडे बघणाऱ्या माणसाच्या दृष्टीला नजर देऊन स्मित करण्याचा प्रयत्न करीत होती. कपाळावर कुंकू नव्हते, पण डोळ्यांत काजळ घातलेले, केस तेल लावून नीट विंचरलेले, कानावर फुगे काढून सईलसर वेणीचे चक्र तिने बांधलेले होते. हातात नुसत्या साध्या बांगड्या कचकड्याच्या असाव्यात, हाताने पदर सावरीत अंग झाकण्यापेक्षा अंग उघडे करून दाखविण्याचा अधिक प्रयत्न करीत असल्यासारखे तिचे हावभाव होते. ती तोंडातला विडा चघळत बरोबरच्या तिच्यापेक्षा थोड्या मोठ्या बाईशी हसत बोलत होती. मोठी बाई भलतीच छटेल नखऱ्याची होती तिच्या हातात मळकट कपड्यात गुंडाळलेल्या वाळक्या पानाचा द्रोण असावा असे काहीतरी होते. दोघीही बरोबरीच्याच सहा बाप्ये मंडळींशी हसत खिदळत होत्या. सर्वजण पलीकडच्या बाकावर बसलेल्या पाटीलबाबांकडे बघून त्यांची काहीतरी थट्टामस्करी केल्यासारखे बोलत असावेत असे त्यांच्या फिदीफिदी हसण्यावरून दिसत होते. दुपारच्या सुटीची वेळ संपून डिस्ट्रिक्ट जज्जसाहेब कोर्टात आले व थोड्याच वेळात 'लक्ष्मबाई पाटील हाजिर है, जानराव पाटील हाजिर है' असा पुकारा झाला. प्रथम पाटीलबाबा उठून मुलाला कडेवर घेऊन काठी टेकीत कोर्टात शिरले. दरवाजावरच्या शिपायाने बाबांच्या हातातली काठी काढून घेतली पण जज्जसाहेबांच्या हुकुमावरून पुन्हा बाबांच्या हातात दिली व बाबांना कोर्टात डाव्या बाजूला–ज्या बाजूला आरोपीसाठी पिंजरा असतो तेथे पिंजऱ्याबाहेरच पण कठड्याजवळ नेऊन उभे केले. पाटीलबाबांनी काठी पिंजऱ्याच्या कठड्याला टेकवून साहेबांना रीतसर तीनदा मुजरा केला व पुन्हा मुलाला कडेवर घट्ट धरून कठड्याला टेकून उभे राहिले. उजव्या बाजूला लक्ष्मबाईने समोर उभे राहून न वाकता जज्जसाहेबांना नमस्कार केला नि पुन्हा तोंडातला रंगलेला विडा चघळीत उभी राहिली. डोक्यावरचा पदर पुन्हा सावरीत आपले केसांचे नटवेपण, अंगाप्रत्यंगाचे तरुण सौष्ठव उघडे करून दाखवीत मधून मधून पाटीलबाबांच्या कडेवरच्या मुलाकडे लटके हसत बघत उभी राहिली. जज्जसाहेबांनी दोघा पक्षकाराकडे बघितले, टेबलावरच्या फायलीकडे बघितले. टेबलाशी बजावरी कारकून उभा होता. पलीकडे रीडर कारकून आडव्या बाजूला बसलेला होता. जज्जसाहेबांनी सभोवार समोर बघून बोलायला सुरवात केली.

'आपणच...गावचे जानराव पाटील ना?'

'होय साहेब.'

'आपल्या कडेवर असलेला मुलगा अमृता ज्ञानू पाटील, वय वर्षे ३।। आपला नातू ना?'

'होय साहेब. हा माझ्या मयत मुलाचा–ज्ञानूचा मुलगा. माझाच नातू आहे साहेब.' पाटीलबाबा अदबीने पण करड्या स्वरात बोलले.

'ही समोर उभी असलेली बाई लक्ष्मीबाई ही तुमची सून, मयत ज्ञानूची बायको, या अमृताची आई ना?'

'हे सगळे मला कबूल आहे साहेब' पाटीलबाबा पुन्हा करड्या स्वरात पण नाराजीने बोलले.

'हा मुलगा अज्ञान आहे नि तुम्ही त्याला आपल्याजवळ ठेवले आहे. तुम्ही त्याला त्याच्या आईजवळ पाठवीत नाही हे खरे ना?'

'होय साहेब! हा अमृता जन्मापासून माझ्या अंगा-खांद्यावरच वाढला. चार महिन्यांपेक्षा ज़ास्ती दिवस आईच्या अंगावरचे दूध जेमतेम प्यायला. पण तेव्हापासून नंतर त्याचा सारा प्रतिपाळ मीच केला साहेब.' पाटीलबाबा अमृताला घट्ट मिठीत घेत मायेच्या आर्जवी स्वरात म्हणाले.

'वर्षा दीड वर्षाने तुम्ही लक्ष्मीला तिच्या बापाकडे पाठवून दिलीत, पण मुलाला अमृताला तिच्याबरोबर पाठवले नाहीत, हे खरे का?'

'साहेब सारं खरं नव्हे. ही बाई आपण होऊन मला न कळवता आपली सारी चीज वस्त दागदागिने घेऊन घरातून निघून पळून

गेली. बापाकडे गेली असे सांगते पण ती कोठे असते याचा नेहमीच पत्ता लागत नाही. तिनेच मुलाला नेले नाही. मी न पाठविण्याचा प्रश्नच नव्हता. तिने माझ्या घरी—सासरी—मुलाजवळ राहणे तिचे काम होते साहेब !'

'तिने तुमच्याविरुद्ध मुलाच्या कब्जाचा व पोटगीचा दावा केला. त्याचे समन्स तुम्हाला मिळाले पण तुम्ही जवाब दिला नाही म्हणून एक पक्षी डिक्री झाली हे खरे ना ?'

'साहेब माझ्यावर तिने ५० रुपये महिना पोटगीचा दावा केला. तो मला नाकबूल नव्हता म्हणून मी जवाब दिला नाही. उलट वर्षभराची पोटगी तावडतोब कोर्टात जमा करून दिल. आहे साहेब ! मुलाच्या कब्जाच्या दाव्याचे मला सांगितले नाही कोणी, कधीच !'

'असे कसे म्हणता ? तुम्हाला समन्स मिळाले ना ? त्यांत सगळे लिहिले आहे. ते तुम्ही वाचले नाहीत ?'

'नाही साहेब. मला स्वतःला केवळ सही करता येते. मी मोठी मोठी अक्षरे ओळखतो पण मला वाचता येत नाही. मला दिलेला दावा पोटगीबद्दलचा आहे असे मला कोर्टाच्या बेलिफाने सांगितले. ते मी खरे मानले साहेब ! माझा पोटगी देण्याला इन्कार नव्हता. म्हणून त्याचा जवाब न देता वर्षाची पोटगी तावडतोब भरली. यापुढेसुद्धा भरत जाईन.'

'तुम्ही कोर्टात का आला नाहीत ?

'मला पोटगीचा दावा कबूल होता म्हणून.'

'या वादी लक्ष्मीबाई तुमच्या सुनेबद्दल अमृताच्या आईबद्दल तिच्याविरुद्ध तुम्हाला काही सांगायचे आहे का ?

पाटील क्षणभर थांबले. त्यांचा चेहरा लाल झालेला दिसला. पण लगेच कपाळावर हात फिरवून म्हणाले,

'आपल्या तोंडाने माझ्या मुलाच्या लग्नाच्या बायकोबद्दल माझ्या नातवाच्या आईबद्दल काही अवाक्षर बोलून माझी जीभ मी विटाळणार नाही. माझी सून कशी आहे हे पाहण्याचे, ठरविण्याचे काम कोर्टाचे आहे !'

'पण तुम्ही तर जबाबसुद्धा दिला नाहीत ?

'मला कुणी विचारले—कोर्ट जरी विचारते तरी मी आपल्या तोंडाने माझ्या घरच्या लक्ष्मीबद्दल काही विपरीत बोलणार नाही. माझ्या नातवाची आई कशी आहे हे कोर्ट ठरवील व ते मी कबूल करीन साहेब. 'कोर्टाने स्वतःच पहावे साहेब !' पाटील बाबा हात जोडून अदबीने पण मान उंच करून अभिमानाने म्हणाले.

'हे पहा ! तुमच्याविरुद्ध मुलाला आईच्या ताब्यात देण्याची डिक्री, एकपक्षी माझ्या पूर्वीच्या साहेबांनी दिली आहे. त्याचे अपीलसुद्धा तुम्ही केले नाही. त्या डिक्रीच्या पाठीमागे जाण्याचा मला अधिकार नाही. तुमच्यावर डिक्रीच्या बजावणीची तामील झाली आहे. आज तुम्हाला या मुलाला अमृताला वादी लक्ष्मीबाईच्या ताब्यात दिले पाहिजे. त्याकरता तुम्हाला येथे अमृताला घेऊन बोलावले आहे. तर तुम्ही आमच्या समोर अमृताला त्याच्या आईच्या ताब्यात द्यावे.' साहेब जरा त्रासल्या स्वराने पण करड्या आवाजात म्हणाले.

'पाटीलबाबांनी इकडे तिकडे बघितले. गळ्यातल्या माळेला हात लावला, तोंडाने काही पुटपुटले नि मोठ्याने म्हटले, नाही ! मी आपल्या हाताने माझ्या या जिवाच्या काळजाला माझ्यापासून तोडून दुसऱ्यास त्याच्या आईलासुद्धा देणार नाही. नि कोर्टाने स्वतःच द्यावे किंवा कोणा सरकारी माणसाकरवी द्यावे. त्याच्या आईनेसुद्धा स्वतः येऊन घेऊन जावे. मी मुळीच अडवणार नाही कुणालाही—अमृतालाही.' असे म्हणून पाटीलबाबा डाव्या कडेवर,अमृताला मोकळ्या हातावर घेऊन ताठ उभे राहिले नि स्वतःला चांदीच्या मुठीच्या काठीचा आधार उजव्या हाताने घेतला. सगळे कोर्ट—न्यायासनावर बसलेल्या डिस्ट्रिक्ट-साहेबांपासून तो कारकून शिपाई प्यादे खुर्च्यांवर बसलेले पाच—सहा, आम्ही वकील व वादी लक्ष्मीबाईचे संगी-सोबती व इतरही काही बघे लोक स्तिमित होऊन पाहतच राहिलो ! वादिनीच्या बाजूला विठोबा पटवारीदेखील तोंड लपवून उभा होता म्हणे. वादिनी लक्ष्मीबाई पदर सावरून जवळच्या सोबतिणीने पुढे केलेला द्रोण घेऊन तो पुढे करीत पाटीलबाबांकडे येत म्हणाली, 'घे, खाऊ घे, बाळा ! मजजवळ ये. मी देईन तुला आणखी खाऊ !' असे म्हणत, तोंडाने विडा चघळत, आईचे हावभाव करीत समोर आली नि पाटीलबाबांना म्हणाली, 'म्हातार-बाबा, मोकळा कर त्याला' आणि उजव्या हाताने काळसर झालेला अदपाव पेढ्यांचा द्रोण अमृतापुढे करून आली नि डाव्या हाताने त्याला बाबांच्या हातावरून ओढू लागली. तशी अमृताने डाव्या हाताने पेढ्यांच्या द्रोणावर असा जोराचा फटकारा मारला की, लक्ष्मीबाईच्या तळहातावर ठेवलेला द्रोण तिच्या हातातून उंच उडाला. दोन-चार पेढे जमिनीवर सांडले, दोन पेढे जज्जसाहेबांच्या टेबलावरही उडून पडले. आणि जवळ आलेल्या लक्ष्मीच्या तोंडावर उजव्या हाताने बुक्की मारल्यागत हात मारला. लक्ष्मीबाई चटदिशी मागे सरली व म्हणाली, 'दळभद्री कारटं, माझी चार आण्याची मिठाई मातीत टाकली मेल्यानं नि मला मारतो आहे बघा, साहेब ! कसं शिकवलं हाय म्हाताऱ्यानं !' असे म्हणत आपल्या जागेवर जाऊन उभी राहिली. तिच्या बाजूने तिची सोबतीण म्हणाली, 'नाजिरसाहेबच घेतील अरमत्याला, नि देतील तुझ्याजवळ. मग आपण पाहून घेऊ. करू देत नाही ते !' इकडे अमृता पाटीलबाबांच्या गळ्याला घट्ट मिठी मारून,


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा .......

## ॥ मॅक्झिम गॉर्की ॥

। सुमती देवस्थळे ।

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

मूल्य दहा रुपये

'मी नाही, मी नाही जाणार, नाही जाणार बाबा. मला धरून ठेवा. ते बघा कसे ओढतात. त्यांना काठीने मारा ना?' असे हातपाय झाडून ओरडत राहिले. नाजिरसाहेब नि एक बेलीफ पुढे होऊन त्यांनी अमृताला घट्ट धरून बाबांच्या हातावरून खसकन ओढले नि दोघांनी त्याचे हातपाय धरून अमृताला लक्ष्मीबाईच्या कवटाळीत दिले. तिची सोबतीण पुढे झाली. एक-दोन बापेही पुढे झाले. सोबतिणीने अमृताचा कान पिरगळला, तसा अमृताने टाहो फोडला. इकडे हातात काठी धरून उभे असलेले पाटीलबाबा थरथरू लागले. घेरी येऊन खाली पडणार असे वाटून दोन शिपायी पुढे झाले नि त्यांनी बाबांना बखोटीला धरले. परंतु बाबांनी पुन्हा ताठ होऊन 'खबरदार, माझ्या अंगाला हात लावू नकोस' म्हणून त्यांना दरडावले नि साहेबांकडे बघत, 'माझे काम झाले. मी घेऊ रजा. बाळाला सांभाळा साहेब.' म्हणून वाकून तीनदा साहेबांना मुजरा केला नि सरळ कोर्टाबाहेर चालते झाले. पाटीलबाबांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू गळत होते. त्यांना काही दिसत होते की नाही कोण जाणे! पण त्यांचा चेहरा सारा त्यांच्या सुनेच्या अंगाशी झोंबाझोंबी करणाऱ्या, तिला लाथाबुक्क्या मारणाऱ्या नि तारस्वरात बाबांच्या नावाने आकांत करणाऱ्या अमृताच्या बाजूला वळत होता. नाजिरसाहेबाने धावत जाऊन तेवढ्यात पाटीलबाबांची फायलीच्या कागदावर सही घेतली नि पाटीलबाबा दमणीमधे एकटेच चढून गादीवर बसले—बसले कसले? लोडावर डोके टेकून त्यांनी स्वतःशीच धुमसत तोंड लपवले नि गड्याला दमणी हाकण्यास इशारा केला. दमणी निघून गेली! तेच मी पाहिलेले जानरावबाबा पाटलांचे शेवटचे दर्शन! तिकडे आकांत करीत असलेल्या अमृताला मारझोड करीत लक्ष्मीबाईने एका मोटारीत ढोसले नि त्याच्या पाठीमागे स्वतः तिच्या सोबतिणीला घेऊन नि विठोबाला घेऊन ती भाड्याची मोटर कोठे नेली ते मला कधीच कळले नाही!

माझ्या गोष्टीतल्या कथानायकाचे निरनिराळे वाचक कसे कसे दोष दाखवितील याची मला कल्पना नाही असे नाही. सुरुवातीच्या शिकाऊ वकिलाच्या तार्किकी उत्साहात जानरावबाबांच्या पुष्कळ चुका मलाही दिसल्या. अशा अशिलाचे वकीलपत्र घेऊन, त्याची बाजू मांडण्याची फी घेऊन, स्वतःच्या ज्ञानाची विक्री करणाऱ्या वकिलासाठी पक्षकाराला यशाचे आमिष, स्वतःच्या कर्तृत्वाच्या पताका नि शेवटी पक्षकाराच्या नशिबाला कौल लावण्यासाठी पुष्कळ वाव होता. परंतु जानरावबाबांचा निरपेक्ष कुलाभिमान, सच्छील दानत आणि असत्य अमंगल पापी विचारा-आचारांविषयी सोवळ्याचा तिरस्कार कुठे नि किती पाहायला मिळतो? अशी माणसे अपमानाच्या इंगळ्यांनी, कायद्याच्या अंधळेपणाने, सात्त्विक भावनांच्या निष्क्रियतेने सोवळ्याच्या तिरस्कारापायी झालेल्या पलायनवादी वृत्तीने कशी अपयशी ठरतात हे आपण नेहमी पाहतो नि त्यात

जर त्या माणसाच्या हातून निष्पाप, अव्याज स्वार्थाची जर कधी चूक झाली, तर अपयशाविरुद्ध लढा देण्याची त्याची जिद्द नाहीशी होते नि मनुष्य एक तर स्वतःच आत्मघात करून घेतो, अथवा आपला आत्मघात होत असलेला उघड्या डोळ्यांनी पाहायला तयार होतो. जानरावबाबांनी चूक अशी केली, ती एकच आणि तीही बापाच्या मनाच्या निर्मळपणाने. स्वतःच्या वेडसर ज्ञानूचा वेडसरपणा नित्याचा नाही, लग्न करून दिले तर सुधारण्याच्या योग्यतेचा आहे अशा अव्याज विश्वासाने त्यांनी साहेबरावला पाच हजाराचे आमिष देऊन त्याची देखणी तरतरीत मुलगी, जास्ती चिकित्सा न करता आपल्या ज्ञानूसाठी सून म्हणून, घरात लक्ष्मी आणण्याच्या भावनेने पत्करली. पण तिच्याबरोबर येणाऱ्या अशिव अमंगळ संकटाची भुतावळ आपल्या पाठीमागे लागणार आहे याचा विचार करण्याचे त्यांना भान राहिले नाही. कुलाभिमानाच्या विश्वासात, सच्छीलतेच्या आधाराने, नि सोवळेपणाच्या पलायनवादी भीतीची आड घेऊन ते आपल्या निर्णयाच्या यशाबद्दल गाफील झाले नि एकदा संकटाचे आवर्त सुरू होताच, त्यात जिद्दीपणाने आणखीच गुरफटत गेले—येथपर्यंत गुरफटले की, त्यांनी निराशेने आत्मघात केला नाही, तरी पण आपले सर्वांगीण अपयश पाहण्याचे आत्मघाती जीवन जगले. त्यांनी आयुष्याचा शेवट गाठला असेल!

मला वकिलाला आता राहून राहून वाटते वकिली आयुष्याचा सगळा अनुभव घेतल्यानंतर की कायदा डोळस असता, निष्पक्ष न्यायाधीश अधिक चिकित्सेखोर असता, पैशाचा लोभ न धरता कायद्याचा सल्ला देणारी यंत्रणा अधिक धार्मिक असती, तर न जाणे, जानरावबाबांच्या पदरी अपयश येते ना, निष्पाप अमृताच्या जीवनाचा विषवृक्ष होता ना! कायदा काय, न्यायाधीश काय, न्यायदानाला मदत करणारी यंत्रणा काय ह्यांपैकी एकही बाब अंधळी नसावी. एवढेच नव्हे तर, मानवी सौहार्दविरहीत स्वार्थलिप्सितही नसावी. मानवी जीवनाशी निरीच्छपणे प्रामाणिक असावी! नाहीतर, घटस्फोटाचा कायदा अज्ञानपालनकर्त्याच्या योग्यतेविषयीचा कायदा, मुलामुलींच्या लग्नाला योग्य होण्यासंबंधीचा कायदा अशासारख्या मानवी जीवनाच्या मूलग्राही विषयासंबंधीचे कितीतरी कायदे पालन करवणारी न्यायालयीन यंत्रणा—तिचे कोणतेही अंग प्रामाणिक—निरीच्छ नसेल तर ती यंत्रणा किती राक्षसी ठरते, किती हास्यास्पद—कुचकामी ठरू शकते, मानवामधला तामसी अंश त्याचा किती दुरुपयोग करू शकतो याला काही अंत नाही! महाकवीने कल्पना केलेल्या रामराज्यात तरी अशी निरीच्छ, प्रामाणिक नि डोळस न्याययंत्रणा होती का? आम्ही तर विसाव्या शतकाच्या शेवटच्या तिशीतदेखील 'अंधळ्या न्यायदेवतेचीच' पूजा करीत आहोत!

□

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

कौटुंबिक जिव्हाळ्याचे, खळबळजनक, भावनात्मक, रहस्यमय, हृदयस्पर्शी, विनोदी, अभिरुचिसंपन्न, संस्कृतिसंरक्षक वगैरे ए वन् नटसंचातील नाटक

# न्यायाघरी अन्याय

नाटकसिनेमांच्या जाहिरातीविषयी खरं तर माझं मत फारसं चांगलं नाही. म्हणजे त्यांचा व्यावहारिक उपयोग काय असेल तो असो असला तर, पण त्या तयार करायचं लिहायचं–काम; सदभिरूचीशी वाकडं आणि कॉमनसेन्सचं वावडं असणाऱ्या महाभागांनाच बहुधा का दिलं जात असावं याचं उत्तर मला सापडलेलं नाही. वर उपशीर्षकात उल्लेखिलेली सर्व विशेषणं ही ज्या जातीच्या निरनिराळ्या नाटकांच्या जाहिरातीतून घेतलेली आहेत त्याच जातीत 'न्यायाघरी अन्याय' हे नाटक किंवा न नाटक बसतं. या सर्व विशेषणांसकट आधी जाहिराती तयार करून मग त्याबरहुकूम अशी नाटकं लिहिली जात असावीत अशी माझी आपली एक प्रामाणिक शंका आहे. अर्थात अशा जाहिरातींचा जन्म अगदीच वाया असतो असं नाही. एक तर त्या, खऱ्या प्रगल्भ–प्रौढ डोळस नाट्यरसिकांना अगोदरच red signal दाखवून असली नाटकं पाहण्याच्या संभाव्य अपघातातून वाचवतात. दुसरं म्हणजे 'न्यायाघरी अन्याय' च्या एका जाहिरातीत मला चक्क ते नाटक लिहिण्यामागची भूमिका–बैठक–उद्देश वगैरे लक्षात आली. कुटुंबातल्या सर्व माणसांना बरोबर घेऊन बघता येतील अशी नाटके सध्या फारशी निर्माण होत नाहीत याबद्दल खंत करून ती उणीव भरून काढायला हे नाटक लिहिलं आहे, असा काहीसा ह्या जाहिरातीचा (बे–) सूर होता. हे पाहूनवाचून मी संतोष-प्रेमादरानं थक्क–दिङ्मूढ–हतबुद्ध वगैरे झालो. सर्व थरातल्या प्रेक्षकांची इतकी काळजी करणारे नाटककार आणि कलावंत मिळाले तर मराठी रंगभूमीचाच काय पण तमाम प्रेक्षकवर्गाचाही उद्धारच उद्धार होऊन जाईल, अशी माझी पक्की खात्री पटली. मुख्य म्हणजे, हे असलं नाटक का लिहिलं आणि केलं असावं, याचा जो थांगपत्ता नाटक पाहूनही मला लागला नव्हता, तो या जाहिरातींमुळे झाला, हे काय कमी आहे?

तर सामान्य माणसावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडायला जाणाऱ्या या नाटकाची कथा मोठी गुंतागुंतीची आहे. न्यायाधीश मकरंद (शशिकांत निकते) आणि त्याची अल्ट्रामॉडर्न पत्नी (शोभा आर्य) यांच्या प्रतिष्ठेला–पोझिशन वगैरेला–त्यांच्या पिताजींच्या–आबांच्या (चंद्रकात गोखले) वैद्यकीच्या व्यवसायामुळे कमीपणा येणार. कारण हे आबासाहेब धन्वंतरी दवाखाना वगैरे न खोलता, लोकांच्या घरोघर हिंडूनच पैपैशाला औषधाच्या पुड्या विकणारे. साहजिकच भावनात्मक संघर्ष वगैरे. मकरंदने एक गुन्हा दडपून टाकायचा प्रयत्न करताच न्यायदेवतेच्या तराजूतल्या काट्यासारखे आबाजी घराबाहेर पडतात आणि 'सामान्य माणसाला न्याय मिळायला हवा' असा कंठशोष सुरू करतात. दरम्यान सूनबाई अत्यवस्थ म्हणून आबा परत येऊन तिला खडखडीत बरी करायची जादू करून दाखवतात की लगेच मिस्टर आणि मिसेस जज्जसाहेबांची उलटी काळजं सरळसोट व्हायची किमया घडते. पुन्हा मकरंद त्यांची माफी मागायच्या निश्चयानं उठतो त्याआधीच आणखी एक जादू झाल्यासारखे आबा स्वर्गाचा रस्ता धरतात, आणि प्रेक्षक जागे होऊन घरचा रस्ता पकडतात.

लेखक श्री. बा. गो. कानेटकर यांचा नाट्यलेखनातला हा पहिलाच प्रयत्न आहे, आणि तो नवथरपणा वेळोवेळी जाणवतो. तथापि हे एकमेव कारण वगळता या नाटकाबद्दल सहानुभूतीनं लिहावं–बोलावं अशी कोणतीच सबब मला दिसत नाही. आणि लेखक नवा असल्याचं संवादात कमीच जाणवतं, कारण बहुसंख्य संवादांचा Pattern पारंपरिक फॅमिली ड्रामाचाच आहे; त्यामुळे 'पाठीवर मारा, पोटावर नको', 'जळण्यातली गंमत कळायला बायकांच्या जन्माला यावं लागतं', 'जिथं तुम्ही तिथं मी', असल्या छापाच्या जुनाट वासाच्या गुळगुळीत वाक्यांची रेलचेल. नाटकाच्या Plot construction मध्ये मात्र लेखक–दिग्दर्शक दोघेही साफ घसरले आहेत. पहिला अंक: पात्रपरिचयासाठी राखीव. दुसरा अंक: संघर्षाची मांडणी आणि तिसरा अंक: क्लायमॅक्स+ॲन्टिक्लायमॅक्स अशी ढोबळ आणि हास्यास्पद श्रमविभागणी करून लेखक मोकळे झाले असले तरी, नाटकात त्यामुळे सुसंगती, एकलय राहिलेली नाही. आबा हे प्रतिपरमेश्वर वाटावेत इतकी त्यांची भलावण लेखकानं प्रारंभापासूनच केली असली, तरी त्यातल्या बऱ्याच गुणांचा–विशेषतः समजुतदारपणाचा काडीमात्र प्रत्यय पुढे येत नाही. स्वतः हेकटपणाचा अर्क असलेल्या आबांनी मकरंदला दुराग्रही ठरवून मोकळं व्हावं, हाच बहुधा या न्यायाधरचा सगळ्यात मोठा अन्याय असावा. विशेषतः आबाजींचं तिसरं अंकातल्या कोर्टसीनमधलं वागणं हा त्यांच्या अडाणी आणि अनाठायी गर्विष्ठ हेकटपणाचा उत्तम नमुना आहे. आबांच्या पत्नीच्या (माई भिडे) अस्सल स्वदेशी सोज्वळपणात तळलेल्या व्यक्तिरेखेला उठाव आणण्यासाठी मकरंदच्या पत्नीच्या व्यक्तिचित्रात वाजवीपेक्षा जास्त भडक, थोडेसे खलनायिकेच्या वळणाचेच, रंग भरले आहेत. ते खरे मानले तर, तिसऱ्या अंकातल्या तिच्या खाडकन् होणाऱ्या आमूलाग्र हृदयपरिवर्तनाचं समर्थन करता येणार नाही. पहिल्या दोन अंकात डोक्याच्या केसापासून पायाच्या नखापर्यंत 'मॉड्' असणारी ही बाई तिसऱ्या अंकात एकदम नऊवारीमध्ये दिसावी? भावनाप्रधान नाटकाचं आणि अकलेचं इतकं जालिम खडाष्टक असतं हे ठाऊक नसलेले माझ्यासारखे प्रेक्षक, तिच्या त्या बदललेल्या तुपट साजुकनाजुक सस्कृतिविहीन बोलण्या–खिदळण्यानं खुर्चीतून खाली पडायच्या बेतात आले. मकरंदमिलॉर्डांना तर आपली गाढव चूक इतक्या झटपट आणि निष्कारणच उमजते, की पहिल्या दोन अंकातच हे केव्हाही उरकून घेता आलं असतं, असं वाटलं. गेनबा (नंदू लोंढे) ही व्यक्तिरेखा निव्वळ आबामहाराजांना *glorify* करण्यासाठीच आणि भटजीबुवा (शरद तळवलकर) हे पात्र केवळ शरद तळवलकरांना glorify करण्यासाठीच कृत्रिम पैदासपद्धतीनं जन्माला

घातल्यामुळे त्यांचा विशेष आगळा विचार करायचं कारणच नाही. आबाहुजुरांची 'पडशी' या प्रकरणाला नाटकात अकारण एवढं महत्त्व आलंय् की नाटयाचं नावच 'पडशीमाहात्म्य' असं ठेवायला हवं होतं अशी माझ्या एका मित्राची नम्र सूचना आहे. नाटकाचा शोकान्त तर निखालस कृत्रिम आहे.

दिग्दर्शक शरद तळवलकरांनी नाटक मोठ्या थाटात आणि उत्तम नटसंचात सादर केलं होतं. दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून त्यांनी यात काय नवीनिराळी तरवार मारली आहे, त्याचं निवेदन त्यांनीच प्रयोगापूर्वी करत गेल्यास सोयीचं होईल. माई भिडे आणि शशिकांत निकते ही तालेवार मंडळी, पण त्यांच्याही भूमिकेत जीव नव्हता. नंदू लोंढे ठीक. चंद्रकांत गोखले यांनी मात्र आबांच्या भूमिकेत आपला ठसा संपूर्ण नाटकावरच अढळ ठेवला आहे. त्यांच्या अभिनयकारकीर्दीतल्या काही संस्मरणीय यशांमध्ये या भूमिकेची नोंद व्हायला हरकत नाही. शोभा आर्य यांनी पहिल्या दोन अंकात इंग्लिश स्टाइलनं आणि तिसऱ्या अंकात (वेदोक्त) संस्कृतपद्धतीनं काम केलं. 'त्या मराठी ढंगावर कधी येतील का' अशी आशा करणंच आपल्या हातात आहे. माई भिडे आणि शशिकांत निकत्यांच्या कामात निदान ती कृत्रिमता तरी नव्हती. पार्श्वगायनामध्ये सुधीर फडक्यांसारखा नामवंत आणि गुणी गायक वाया दवडला आहे. दिग्दर्शक म्हणून तळवलकरांचं अपयश दुसऱ्या (की दिसऱ्या?) अंकातल्या ठिगळवजा दरिद्री कोर्टसीनमध्ये उठून दिसतं, तर अभिनयातलं त्यांचं साचेबंद अपयश नाटकभर विखुरलंय.

धंदेवाईक हिंदी चित्रपट काढताना प्रेक्षकांचं सरासरी वय सोळा असल्याचं धरतात असं ऐकलंय्. धंदेवाईक मराठी नाटकात ते बाराच धरत असावेत! *

---

# एक शून्य बाजीराव

## एक स्वागतार्ह प्रयत्न

---

कै. चिं. त्र्यं. खानोलकरांची ही पहिलीच नाटयकृती–प्रायोगिक मूल्यापेक्षा आंतरिक सांकेतिक मूल्यांना महत्त्व असणारी– आणि म्हणूनच आकलनासह उभी करायला कठीण. आठ-दहा वर्षांपूर्वी 'रंगायन' तर्फे माधव वाटवे आणि विजया मेहता (खोटे) यांनी त्याचे काही प्रयोग सादर केले. व्यावसायिक यशाची शक्यता नव्हतीच. त्यानंतर प्रथमच भरत नाटय संशोधन मंदिराने जवळजवळ नवोदित अननुभवी नाटयसंचात हे नाटक 'स्टेज' करण्याचे धाडस केलं. 'रंगायन'चा मूळ प्रयोग मी पाहिलेला नाही, त्यामुळे दोहोंचं तुलनात्मक परीक्षण मी करू शकणार नाही. अर्थात केलं असतं, तरीही ते अप्रस्तुत, अवांच्छित आणि अन्यायकारक झालं असतं, हा मुद्दा अलाहिदा. विशेषत: नाटकाचा अमर्याद आवाका ध्यानात घेता भरत नाटय मंदिराच्या कलाकारांचं त्यांच्या या प्रयत्नाबद्दल स्वागत–अभिनंदनच केलं पाहिजे.

अगदी सोप्या शब्दांत सांगायचं तर, 'एक शून्य बाजीराव' ही एका विदुषकाच्या अपयशी आयुष्याची शोकान्तिका आहे, तथापि या विधानात, खास करून त्यातल्या विदुषकाच्या कल्पनेत–over simplification चा दोष पदरी येण्याची शक्यता जास्त. स्वत: खानोलकरांनीही, त्याच्या शून्य दिशेला चाललेल्या प्रवासापेक्षा अधिक काही अधिकारवाणीनं त्या त्याच्या कॅरॅक्टरबद्दल सांगितलेलं नाही. तेव्हा 'दिग्दर्शक श्रीधर कानिटकर किंवा बाजीरावच्या भूमिकेतले अनंत कुलकर्णी यांना 'बाजीराव' Conceive झालाच नाही, साहजिक साकारही करता आला नाही,' अशी टीका करण्यापूर्वी, बाजीराव ही व्यक्तिरेखा पिकल्या फळासारखी संबंधच हाताला लागेल अशी नव्हे हे लक्षात ठेवायला हवं. तीनही अंक चढत्या श्रेणीनं dominate करणारा बाजीराव उभा करण्यात अनंत कुलकर्णी यांनी बाह्यत: तरी काही कसूर केल्याचं जाणवलं नाही. त्यांनी हालचालीतला, शारीरिक बावदूकपणा प्रमाणाबाहेर वाढू दिला असा एक आक्षेप घेण्यात आला. रंगायनचा प्रयोग जमेस धरता तो खरा असणे शक्य आहे. तथापि बाजीरावाच्या व्यथेचं सम्यक्‌दर्शन ते घडवू शकले की नाही हा प्रश्न माझ्या दृष्टीनं अधिक महत्त्वाचा आहे; आणि त्यात त्यांना उल्लेखनीय यश मिळाल्याचं नमूद करायला हवं. त्याचबरोबर मोहन जोशी (भूमिका : इनामदार अप्पाराव), विजय राजापुरे (सख्या), श्री. श्रीकृष्ण ओक (दंडवते) अजित वाकनीस (विठ्ठल) आणि सुधीर आळेकर (दाभाडे) या सफल कलाकारांचं अभिनंदन; त्यांनी समजदारीनं भूमिका निभावल्याबद्दल. महत्त्वाच्या पात्रांपैकी संजय गर्गे (नाटकातील दिग्दर्शक) वगळता कोणीही संपूर्ण निराशा केलेली नाही. अर्थात या सगळ्याचा अर्थ नाटक निर्दोष होतं, असा होत नाही. विस्कळित पसरटपणा हा यातला प्रकर्षानं खटकलेला दोष. ह्या दोषात अर्थातच खानोलकरांचाही वाटा आहेच. मुळात हे संथ नाटक त्यांनी लांबण लावल्यासारख्या पसरटपणानं लिहिलंय, त्यातले दर्जाचे चढउतार जाणवल्याशिवाय राहत नाहीत. तिसऱ्या अंकातील नाटकातलं नाटक, विशेषतः रावसाहेबांच्या भुताचा आगमन–प्रसंग, पहिल्या अंकाच्या सुरुवातीचा प्रसंग हे अशा सदोष लेखनाचे आणि प्रयोगाचे नमुने. प्रयोगातला विस्कळितपणा हा कलाकारांच्या टीमवर्कला किंवा आत्मविश्वासाच्या अभावामुळेही निर्माण झाला असणे सहज शक्य आहे. अंतर्नाटयातील प्रेक्षागृह दिग्दर्शकानं सुरेख मांडलं. तथापि स्टेजवरची डाव्या कोपऱ्यातली चौकट हा एक निरर्थक अडथळा ठरला. खानोलकरांनी नाटकात वारंवार वापरलेली imagery—विशेषत: animal imagery/ inanimate imagery stress करण्यात दिग्दर्शक कलाकारांनी यश मिळविले; तथापि बाजीरावाचं नाटक चोरलं जाणं यासारख्या काही महत्त्वाच्या गोष्टी व्यवस्थित 'रजिस्टर' होऊ शकल्या नाहीत. Any way, उणीवा दाखवणं अशक्य नाही, पण सामान्य अभिरुचीला झेपणारंच काहीतरी मांडायचा हव्यास न धरता असलं सांदीकोपऱ्यातलं पण महागामोलाचं स्क्रिप्ट हाती घेण्याचा या बहुसंख्य तरुण कलाकारांचा प्रयत्नच मला जास्त भावला. ☐


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

हिंदी चित्रपट

तुम्हाआम्हाला अनोळखी वाटणारा

# संकोच

संकोची स्वभाव हा कोणे एकेकाळी सद्‌गुण वगैरे समजला जात असे असं ऐकतो. चालू जमान्यात ही वस्तू पाळणं शहाणपणाचं नव्हे; तो दोषच ठरायची शक्यता अधिक. आणि म्हणून शरदबाबूंच्या 'परिणिता'वर आधारलेला 'संकोच'सारखा नवा हिंदी चित्रपट (परिणितावरचा दुसरा की तिसरा?) मुख्यत: त्यातल्या काहीशा legendary आणि classical qualities साठीच पहायचा असतो. जितेन्द्र–सुलक्षणा पंडितचा 'संकोच' चालू सामाजिक संदर्भात न बसविता वरील-प्रमाणे पहिला, तरच काहीतरी पदरी पडल्या-सारखं वाटतं. एरवी सर्वस्व हरपण्याची वेळ आली तरी, निव्वळ संकोचामुळे आपलं प्रगाढ उभयपक्षी प्रेम प्रकट न करणारे प्रेमिक चालू पिढीतल्या प्रेमिकांच्या थट्टेचाच विषय व्हायची भीती.

अर्थात हा सगळा विचार बाजूला ठेवला तरी एक सरळ साफ मनोरंजन म्हणूनही संकोचचा विचार करता येईल. सरळसाफ याचा अर्थ Family size entertainment असाच घेतला पाहिजे असं नाही, पण प्रेमाच्या नावाखाली सर्कसमधल्या शारीरिक कसरतींपासून डोंबाऱ्याचे खेळ आणि फ्रीस्टा-इलपर्यंत (आठवा : 'शंकरदादा'मधलं शशी–नीतूचं ड्युएट.) काय वाट्टेल ते खपत असताना, शरत्‌कालाशी प्रामाणिक राहून प्रेमाचं जे शांत, सौम्य, सहजरम्य स्वरूप दिग्दर्शक उलगडत जातो, ते रेशमी रसिकां-बरोबरच फ्रीस्टाइलच्या चाहत्यांनाही–निदान रुचिपालट म्हणून–मानवायला हरकत नाही.

जितेंद्रच्या खास 'फॅन्स्'ची घनघोर निराशा त्यानं या चित्रपटात केली आहे. त्याच्या 'परिचय–खुशबू'सारख्या दुर्मिळ चित्रपटांप्रमाणेच इथेही तो संपूर्ण वेळ दोन्ही पाय जमिनीवर टेकवूनच वावरला आहे. त्याचं हे मानवी रूप आता अनोखं नसलं तरी अतिशय सुखद आहे. मुलगी पहायला जाण्यासारख्या एखाद्या प्रसंगात त्यानं सुरेख Comic Shades दिल्या आहेत. सुलक्षणा पंडितच्या संयमित आणि सुरेल अदाकारीची तारीफ करायला हवी. सुरेल दोन अर्थांनी–एक तर तिचा एरवीचा आवाज आणि संवाद-फेकही छान कर्णप्रिय जमून गेल्येय् आणि दुसरं तिचं पार्श्वगायनही सफल ठरण्यायोग्य आहे. संगीत ही चित्राची आणखी एक महत्त्वाची जमेची बाजू. मात्र मध्यंतरानंतर काहीसा अधिक घटनाप्रधान आणि किंचित गतिमान झालेला चित्रपट काहीसा फिल्मी वळणावर जाऊ पाहतो. दोघा शेजाऱ्यांचा (ओम शिवपुरी–ए. के. हनगल) अकस्मात मृत्यू व त्या आसपासच्या घटना काहीशा अविश्वसनीय वाटतात. या दोघा म्हातारबाबांसह साहाय्यक कला-कारांनीही दुय्यम भूमिका समजदारीनं वठवल्या आहेत. जमेची बाजू अशी बऱ्यापैकी जड असतानाही, संथ गती, कालबाह्य कथा-नक आणि सामान्य निर्मितिमूल्ये+मसाल्याचा अभाव यामुळे 'पब्लिक'ला हा संकोच कितपत मानवेल कुणास ठाऊक ! ¤

# सज्जो रानी

मृगजळ नव्हे, ओॲसिस !

रखरखीत वाळवंटातून चालताना ओॲसिस दिसल्यानंतर होणारा...वगैरे वापरून गुळगुळीत नाण्यासारखं निरुपयोगी झालेलं रूपकच मला इथं पुन्हा वापरावं लागलं हे खरं, पण *त्याला अर्थाचा आणखी एक पापुद्रा* आहे—गेल्या आणि चालू सालचे हिंदी सिनेमे पाहताना आपण अकलेच्या वाळवंटा-तनं चाललोय, साध्यासुध्या नव्हे, असं वाटत होतं. अनुभव आणि कलात्मकता या दोन्हींचा खणखणाट असलेल्या अशा अकलेच्या वाळ-वंटातनं जाताना 'अंकुर' किंवा 'निशांत' सारखी वास्तववादाची कडवी ग्रामीण धार असणारी चित्रं सापडल्यानंतर *'हरवले ते गवसले का' च्या जातीचा जो आनंद लाभला*, तसाच काहीसा आनंद 'सज्जो रानी' मुळे मिळाला. याबद्दल निर्माते–दिग्दर्शक गोविंद सरैय्या यांना द्यावेत तितके धन्यवाद थोडेच होतील. अर्थात 'अंकुर / निशांत' आणि 'सज्जो रानी' यांची तुलना मी केली ती केवळ दुर्मिळतेच्या संदर्भात. एरवी कोणत्याच क्षेत्रात त्यांच्यात तुलना उद्‌भवू शकत नाही. 'सज्जो रानी' बराचसा शहरी थाटाचा आणि बऱ्याचशा परिचित प्रश्नालाच हात घालणारा कलात्मक चित्रपट आहे. गरतीचं आयुष्य जगायचा प्रयत्न करणारी एक कोठीवाल्या तवायफची मुलगी आणि तिच्या त्या हौसे-मुळे तिच्यापुढे आणि तिच्या सासरी-माहेरी कुटुंबांपुढे उभ्या ठाकणाऱ्या समस्या ही कथा-वस्तू हिंदी पडद्याला बिलकुल अनोळखी नाही. त्यामुळे सज्जो रानीच्या बाबतीत प्रथम इंट-रेस्टचा आणि नंतर कौतुकाचा मुद्दा आहे तो art of presentation चा. 'आर्ट' हा शब्द मी सहेतुकरीत्या वापरला आहे. चित्रपटकले-वर धंदा स्वार होत असताना, तवायफ–कोठीचा विषय निवडणाऱ्यानं त्याचा धंदा करायला जावं हे अगदी स्वाभाविक आहे–नायिकाच तवायफकी लडकी म्हटल्यानंतर गेला बाजार दोन-तीन कव्वाल्या/मुजरानृत्ये आणि सभ्यतेच्या बुरख्याआडची नग्नता एवढं तरी परमिट सहज सुटलं असतं. गोविंद सरैय्या (नूतनच्या सरस्वतीचंद्र या गाजलेल्या आणि चांगल्याही चित्राचे दिग्दर्शक) यांनी कलाकाराच्या इमानानं हा मोह टाळला आहे. कलात्मक चित्रपट बनविताना त्याचं भान ठेवून बॉक्स ऑफिसशी कमीतकमी तडजोड करायचं धाडस त्यांनी केलं आहे. त्याचं प्रायश्चित्तही त्यांना भोगावं लागेलसं दिसतं. कारण ज्यासाठी अनेक प्रेक्षक सज्जो रानी (तीही पुन्हा रेहाना सुलतान) कडे वळतात, ते न दिसल्यामुळेच बहुधा बकवास पिक्चर म्हणून दोन-तीन आठवड्यांतच तो अनेक ठिकाणांहून 'आऊट' होतोय. एनी वे, दिग्दर्शक गोविंद सरैय्या, नायिका रेहाना आणि संगीतकार, सपन-जगमोहन यांनी आपापली बाजी जिंकली आहे. दिग्दर्शक आणि संगीतकार, विशेषत: त्याचं पार्श्वसंगीत, याचं स्वतंत्र अस्तित्व चित्रपटात जाणवावं असे प्रसंग अलीकडे आनंद बक्षींच्या अर्थपूर्ण गीता-इतकेच दुर्मिळ झाले आहेत. 'सज्जो रानी' इथेही आपल्याला सुखद धक्का देईल. सपन-जगमोहन ही संगीतकार जोडी, नव्या लाटे-तल्या (अर्थात बी. आर. इशारा लाट) चित्रपटांशी संबंधित राहिल्याच्या गुन्ह्या-मुळेच की काय, पण इंडस्ट्रीच्या फार मोठ्या परिघाबाहेरच राहिली आहे. तथापि सज्जो रानीसारखी सुरेल संधी त्यांनी वाया दवड-लेली नाही. तीनही गाण्यांना तर त्यांनी आकर्षक, चपळ ठेक्याचे स्वरसाज चढवले

आहेतच, पण टायटल् म्युझिक्पासूनच पार्श्व-संगीताची भली चैन केली आहे. चित्रपटाचं वातावरण, प्रकृती आणि विविध प्रसंगांचे moods, संबंधित व्यक्तिरेखांच्या भावच्छटा ही सारी प्रकरणं लक्षात घेऊन पार्श्वसंगीताची योजना करणं याला आर. डी. एल. पी. आणि कल्याणजींच्या दरबारात मध्ययुगीन मागासलेपणाची लक्षणं समजत असतील, पण सपन-जगमोहन यांनी हा दोष पत्करला आहे, आणि चित्रपटाच्या एकत्रित परिणामात संगीताचा मोलाचा वाटा आहे, याची प्रचीती आणून दिली आहे. हाच अनुभव दिग्दर्शनाच्या क्षेत्रात गोविंद सरैय्यांनी दिला आहे. या प्रगल्भ प्रतिभेच्या गृहस्थाला कथावस्तूबद्दल आणि तिच्यातल्या व्यक्तिरेखांबद्दल आत्मीयता आणि insight दोन्ही आहे,याचा प्रत्यय चित्राच्या टायटल्सपासूनच येतो.

रेहाना सुलतानवर हिंदी चित्रसृष्टीनं घोर अन्याय केलेला आहे–तिच्या talent कडे दुर्लक्ष करून-असं माझं मत आहे.सज्जो रानीच्या भूमिकेत ती वावरते तेव्हा तिच्या या टॅलन्टची खूणगाठ निश्चितपणे बांधता येते. घराच्या खिडकीतून एक सुखी संसार ओढीनं निरखणारी सज्जो, तशाच जीवनाची स्वप्नं रंगवणारी सज्जो, स्वप्न पूर्ण झाल्यावर हरखणारी आणि ते क्षणिक होतं हे कळल्यानंतर पाठ फिरवणारी सज्जो, अशी तिची नाना रंगरूपं–या भूमिकेला इतका न्याय इतर कुणी दिला असता का, याबद्दल मी साशंक आहे.

जैनेंद्र जैन (कथा-पटकथा-संवाद) यांचाही उल्लेख आवश्यकच. ◻

---

इंग्रजी चित्रपट

# द टॉवरिंग इन्फर्नो

## आगीचा लोळ नव्हे, माणसाची झुंज खरी.

---

येणार म्हणून फार दिवस गाजलेला आणि प्रकाशित होण्याअगोदरच लोकप्रिय ठरलेला, वॉर्नर ब्रदर्स आणि ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्सतर्फे संयुक्तरीत्या निर्मिला गेलेला हा इंग्रजी चित्रपट मुंबईत गेले चार–सहा महिने गाजत असतानाच पुण्यात दाखल झाला आहे. एका एकशेअडतीस मजली 'स्कायस्क्रेपर'ला तिच्या उद्‌घाटनाच्या दिवशीच काही तांत्रिक बिघाडामुळे आग लागते, इमारतीतल्या माणसांची आगीच्या या राक्षसी लोळापुढे ससेहोलपट सुरू होते आणि याचवेळी अग्निशामक दलाचंही अशा पिसाट ज्वालांविरुद्ध निकराचं युद्ध सुरू असतं, सर्व प्रयत्न थकल्यानंतर अखेर शेवटच्या मजल्यावरच्या पाण्याच्या प्रचंड टाक्या फोडण्यात येतात आणि होणारा जलप्रलय अग्निप्रलयाला शांतवून स्वतःही संपून जातो, अशा पार्श्वभूमीवर आधारलेला हा 'ज्वलंत' अरिष्टपट. अरिष्टपट -crisis movies च्या जातीतला एक–पॉसिडन् अॅडव्हेंचर–अलीकडेच प्रदर्शित झाला होता, त्याचे निर्माते इर्विन यांनीच हा अधिक उग्र इन्फर्नो चितारला आहे.

पॉसिडनपेक्षा इन्फर्नो खूपच वेगळा आहे. पॉसिडनमध्ये सामूहिक rescue operations हा प्रकार जवळजवळ नव्हताच, आणि म्हणून सगळा focus होता तो त्या तुफानी लाटा आणि ओढवणारं अरिष्ट यांच्यावरच. इन्फर्नोमध्येही आगीचा पिसाट लोळ हाच नायक असल्याचा दृष्टिकोन व्यक्त करण्यात आलेला आहे, तथापि मी त्याच्याशी सहमत होऊ शकत नाही. माझ्या मते आगीचा लोळ हा 'इन्फर्नो'चा मध्यबिंदू नव्हे, तो त्याचा climax ही नव्हे किंवा ती त्याची themeही नव्हे, ती आहे केवळ त्याची पार्श्वभूमी. विशेषतः चित्राचा सुखान्त आणि दिग्दर्शकाचा कल ध्यानात घेतला, तर असं दिसून येतं की, दिग्दर्शकाला मानवी प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर आगीच्या लोळाची प्रतिमा चितारायची नाही, तर अग्निप्रलयाच्या 'कॅन्व्हास'वर माणसाची जिद्द आणि झुंजार वृत्ती यांचं चित्रदर्शन घडवायचं आहे, आणि म्हणून चित्राचा खरा नायक आगीचा पिसाट लोळ नव्हे. प्रमुख भूमिका आहे ती त्या अरिष्टाशी माणसानं आपल्या सर्व शक्तियुक्तीनिशी दिलेल्या निकराच्या झुंजीची !

पॉसिडनपेक्षा मला इन्फर्नोचं एक आणखी वेगळेपण जाणवलं. पॉसिडनमध्ये दिग्दर्शकानं संकटग्रस्त माणसांच्या सामूहिक प्रतिक्रियांपेक्षा गटशः प्रतिक्रियांवर जरूरीपेक्षा जास्त लक्ष केंद्रित केलं होतं आणि त्यामुळे त्यातली विविधता कमी होऊन साहजिकच एकंदर अरिष्टाची तीव्रता पातळ झाली होती. इन्फर्नोमध्ये वैयक्तिक प्रतिक्रिया किंवा प्रयत्न यापेक्षा सामूहिक प्रतिक्रियेला जास्त महत्त्व मिळालं आहे, आणि त्यामुळे प्रसंगाचं गांभीर्य वाढायला मदत होते. या समूहाच्या प्रतिक्रियांच्या पार्श्वभूमीवरच इमारतीचा एक भागीदार मालक (विल्यम होल्डन), प्रमुख आर्किटेक्ट (पॉल न्यूमन) आणि अग्निशामकदलाचा प्रमुख ऊर्फ फायर चीफ् (स्टीव्ह मॅक्वीन) या तीन व्यक्तिरेखा ठळकपणे चितारल्या आहेत, या तिघा खंद्या अभिनेत्यांनी त्या तितक्याच जिवंतपणे, आव्हान स्वीकारल्यासारख्या उभ्या केलेल्या आहेत. अर्थात लेखक–दिग्दर्शकांकडूनच स्टीव्ह मॅक्वीनला थोडंफार झुकतं माप मिळालं आहे, आणि त्यानंही त्याचा पुरेपूर फायदा उठवला आहे. कर्तव्याची जाणीव, थंड डोक्यानं योजना आखून पद्धतशीरपणे अंमलात आणायची क्षमता, आभाळाएवढी जिद्द आणि तिच्यासाठी कुठलंही साहस पत्करायची हिंमत हे चीफ्चे गुणविशेष, त्याचा फायरफायटिंगचा अवजड पोशाख आणि आगीच्या धगीनं काळा पडलेला चेहरा या शरीरविशेषांसकट त्यानं साकार केले आहेत. होल्डन–न्यूमनच्या कॅरॅक्टर्समधले रंगच त्यामानानं मर्यादित आहेत.

काही चित्तथरारक क्षणांसाठी आणि thrilling दृश्य प्रसंगांसाठी पॉसिडनपेक्षाही द टॉवरिंग इन्फर्नो अधिक लक्षात राहील. पेटलेल्या व्यक्तीची होरपळ, हेलिकॉप्टरमधून सुटकेचे प्रयत्न, दोर-पुलीच्या मदतीनं पलीकडच्या इमारतीवर जाण्यासाठी उसळलेली गळेकापू दंगल, आग विझवणारे पाण्याचे लोंढे आणि या दोन प्रलयातूनही सुखरूप बचावलेली एक मांजरी !

अरिष्टपटालाही वास्तवतेचा अविभाज्य किनारा असू शकतो याची सुखद जाणीव देणारे काही प्रसंगही असेच संस्मरणीय. मृत्यूच्या उंबरठ्यातही माणसामाणसांत उभे राहणारे राग, लोभ, द्वेष हे त्याचं एक उदाहरण.

आणि या अजस्र चित्रनिर्मितीची तांत्रिक बाजू ?

–ती आपल्या कृतीच्याच नव्हे, तर कल्पनेच्याही आवाक्याबाहेरची आहे !

– शिरीष सहस्रबुद्धे

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ९।१०।७६ ते १५।१०।७६

**मेष :** यशाची चाहूल

रवी सातवा होणार आहे. मंगळ सहावा झाला आहे. ही ग्रहपरिस्थिती तशी वाईट नाही. व्यक्तिमत्त्व उंचावून प्रतिष्ठा वाढणार आहे. सार्वजनिक जीवनात नवे घडवण्याची जिद्द निर्माण होईल. कौटुंबिक नेतृत्व लाभेल. घरात शिस्त लावू शकाल. घरगुती वातावरण बरेचसे प्रसन्न राहील. नवी वास्तू लाभण्यासारखी परिस्थिती निर्माण होणार आहे. नवे दालन खुले होईल. कलाकौशल्य प्रसिद्धीस येईल. नोकरीत प्रमोशन मिळेल. बदलीच्या प्रयत्नाला यश येईल. उच्चपदस्थांच्या आशीर्वादाने महत्त्वाची कामे पार पडतील. शुभ दिनांक १०—१२

**महिलांना :** घरगुती वातावरण आपुलकीचे राहील.

*विद्यार्थ्यांना : मनाची परिस्थिती प्रसन्न राहील.*

**वृषभ :** यश पदरात पडेल

रवी-मंगळासारखे ग्रह शत्रूस्थानी असणे ही एक असामान्य घटनाच होय. ज्या एका संधीची वाट तुम्ही पाहत होता ती संधी तुम्हाला अलगद लाभणार आहे. एखादी समस्या अनेक दिवस रक्त आटवत असेल तर ती यावेळी सुटून तुम्ही सुटकेचा निःश्वास सोडाल. नोकरीत तुमच्या कर्तृत्वाचा प्रभाव वाढेल. तुमच्या गुणांचे चीज होईल. एखाद्या नव्या जागी तुमची नेमणूक होऊन जबाबदारी सोपवण्यात येईल. चालू पगारात वाढ होईल. ओव्हर टाईमने पैसा मिळविता येईल. बेकारांना स्वतंत्र धंदा मिळेल. तब्येत सुधारत राहील. शुभ दिनांक १३—१४

**महिलांना :** लेखन व इतर कलागुणांमुळे प्रसिद्धी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** दुर्मिळ वस्तू हाती पडेल. आनंद मिळेल.

**मिथुन :** उत्कर्षकारक

बाराव्या गुरूची तुम्ही आता मुळीच खंत बाळगू नका. कारण पंचमस्थान रवी व मंगळ या दोन समर्थ ग्रहांनी भूषविले आहे. त्यामुळे यश व प्रगतीचे नवे पर्व सुरू होणार आहे. धंदा, नोकरी, प्रवास या सर्वच बाबतीत पुढे पाऊल पडेल. रेंगाळलेला पत्रव्यवहार पुरा होईल. तुम्ही लेखक असाल तर, तुमच्या साहित्याने यावेळी तुम्ही लोकांवर प्रभाव पाडणार आहात. नाटक, सिनेमा या कलांशी संबंधीत असलेल्या लोकांना प्रतिसाद मिळणार आहे. पैसा कमी पडणार नाही. नोकरीत त्रास कमी होणार आहे. कामात कार्यक्षमता वाढणार असून वरिष्ठांची मर्जी संपादन होणार आहे. शुभ दिनांक ११—१५

**महिलांना :** संसारातील अडचणी कमी होणार असून स्वास्थ्य मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** ठरवलेले बेत पार पडतील.

**कर्क :** प्रगतिकारक

राशीत शनी, अकरावा गुरू तर रवी-मंगळ चौथे आहेत. आठवडा मानसिकदृष्ट्या थोडासा अस्वस्थतेचा गेला तरी, प्रगतिकारक जाईल. हाती घेतलेली कामे कार्यक्षमतेने उरकण्याची शक्ती प्राप्त होईल. नवे काही तरी करावे असे वाटेल. नोकरीत सारे गैरसमज दूर होऊन तुमच्या हक्काचे तुम्हाला मिळेल. यावेळी वरिष्ठांच्या मर्जीचा तुम्हाला काही चांगला प्रसाद मिळू शकेल. लांबणीवर पडत असलेले प्रमोशनचे प्रकरण मार्गी लागेल. स्थावराचा व घरांचा प्रश्न सुटेल. जमिनीच्या खरेदीविक्रीत लाभ होईल. शुभ दिनांक १२—१३

**महिलांना :** बंगल्यात वास्तव्य घडून मनोरथ पूर्ण होतील.

**विद्यार्थ्यांना :** संशोधनाची दृष्टी येईल.

**सिंह :** समस्या सुटतील

रवि-मंगळासारखे ग्रह जेव्हा पराक्रमात वास्तव्य करतात तेव्हा माणसाच्या हातून असामान्य असा पराक्रम घडत असतो. जे मिळणार नाही असे वाटते तेच त्याला प्राप्त होते. या आठवड्यात सिंहराशीची माणसे या दृष्टीने फार मोठी भाग्यवान ठरणार आहेत. साडेसातीचा बागुलबुवा तुम्ही आता मनात बाळगू नका. आजवर ज्या संधीची तुम्ही वाट पहात होता ती संधी तुमच्यासमोर आली आहे. नव्या क्षेत्रात गुण दाखवा व गेलेली प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करा. राजकारण व नोकरी यात नव्या पर्वाची सुरुवात होईल. शुभदिनांक ११—१३

**महिलांना :** मोठेपणा सहज पदरात पडणार आहे. पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीची चमक अनेक बाजूंनी दिसेल.

**कन्या :** अनुकूलता आहे

कन्या राशीच्या व्यक्तीची मानसिक कोंडी आता फुटलेली आहे. नवे काही तरी करून दाखवण्याची जिद्द निर्माण होईल. अप्रसन्नता कमी होईल. आळस दूर होईल. स्वास्थ्य गवसेल. कामाचे चीज होईल. वरिष्ठांमार्फत तुमच्या इच्छाआकांक्षांना चालना मिळेल. तुम्ही ज्या कचेरीत काम करता तेथे लोकप्रियता लाभेल. गैरसमजाचे सावट नाहीसे होईल. कामाचा ताण अजून तरी कमी होणे कठीण आहे. तरी पण सहकार्य मिळेल. प्रकृती बरी राहील. आर्थिक बाजू भक्कम नसली तरी गरजेपुरते पैसे सहज उपलब्ध होतील. शुभदिनांक १४—१५

**महिलांना :** घरगुती कामात थोडा-फार विरंगुळा मिळेल. मुलांचे कौतुक कराल.

*विद्यार्थ्यांना : प्रवासाचा बेत प्रसन्न वातावरणात पार पडेल.*

**तूळ :** नोकरीत वर्चस्व

रवि-मंगळाची प्रतिकूलता संपून आता त्यांच्या सहकार्याचा हात पुढे झाला आहे. त्याचा निश्चितपणे फायदा होईल. प्रामुख्याने अंगभूत गुणांचा वाव मिळून नावलौकिक वाढणार आहे. नोकरीत वरची जागा मिळून स्वतंत्र बाणा दाखवू शकाल. व्यवस्थापकात कार्यक्षमता वाढेल. बेकारांना काम मिळून बुद्धीला योग्य क्षेत्र लागेल. नाविन्याची हौस भागेल. चालू नोकरीत बदलीची शक्यता आहे. लेखक, गायक, संगीततज्ञ यांना लोकप्रियता लाभेल. आर्थिक बाजू यावेळी चांगलीच सुधारणार आहे. अचानक पैसा मिळणार आहे. धंद्यात तोटा येईल. प्रवासात नव्या ओळखी होतील. शुभ दिनांक १२—१३

**महिलांना :** कलाक्षेत्रात आकर्षण निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना :** प्रसिद्धी मिळेल. पैसाही मिळेल.

**वृश्चिक : पैसा जपून वापरा.**

व्ययस्थानात अनेक रथीमहारथी ग्रहांची गर्दी झाली आहे, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. रोजच्या गरजेला पुरेसा पैसा मिळेल हे खरे, तरी पण व्यापारी, कमिशन भेजन्ट, शेअर्सचा धंदा करणारे यांनी या वेळी बेसावध राहून चालणार नाही. अंदाज अचूक ठरतील याची खात्री बाळगू नका. रेस खेळणाऱ्यांनी मोह आवरला पाहिजे. जमिनीचे व्यवहार जपूनच करा. नोकरीत कामाचा ताण फार पडणार आहे. नोकरीत आडमार्गाने पैसे मिळवण्याचा मोह अजीबात टाळा. लोकांच्या पैशाशी ज्यांचा संबंध आहे त्यांनी डोळयात तेल घालून जपावे. शुभदिनांक १४–१५

**महिलांना :** घरगुती खर्च आटोक्यात ठेवा.

**विद्यार्थ्यांना :** व्यसनाच्या जाळयात अडकू नका.

**धनू : लाभकारक**

गेले काही दिवस अनेक प्रकारच्या शंका-कुशंकांनी ग्रासलेले तुमचे मन प्राप्त परिस्थितीत सुरळीतपणे मार्गी लागेल. या राशीच्या लाभस्थानी मंगळ-रवीसारखे ग्रह आले आहेत. ते तुमची पैशाची बाजू अतिशय भक्कम करतील. रेस-लॉटरीच्या मार्गाने पैसे मिळतील. कर्जातून मुक्त व्हाल. धनिकांची मदत मिळू शकेल. बुद्धी नव्या क्षेत्राचा वेध घेईल. लोकप्रियता मिळेल. नोकरीत बदलीची शक्यता आहे, पण काम आवडेल असे मिळेल. आध्यात्मिक शक्ती जास्त होईल. व्यापारात नव्या ओळखीचा लाभ होईल. तुमच्यापैकी ज्याना वाहन–खरेदीची इच्छा असेल त्यांची इच्छा पुरी होईल. शुभ दिनांक १२–१३

**महिलांना :** दागिन्यांची हौस पुरी होईल.

**विद्यार्थ्यांना :** बुवाबाजीचा मोह टाळणे आवश्यक आहे.

**मकर : नोकरीत समाधान**

मंगळ हा तूळ राशीत आहे व तो मकर राशीचा मित्र आहे. हा मंगळ व त्याच्या जोडीला असलेला रवी तुमचे मनोरथ पूर्ण केल्याखेरीज राहणार नाही. यावेळी कितीही अडचणी येऊ द्यात, तुमच्या नोकरीतील सर्व कामे पुरी होतील. वरिष्ठांची अगर मालकाची मर्जी राहून तुम्ही म्हणाल ती तुमची इच्छा पुरी होईल. प्रामुख्याने नोकरीत अनुकूल असा अपेक्षित बदल होईल. नवे काम तुम्ही समर्थपणे स्वीकारा. तब्येतीची कुरकूर चालू राहणार नाही. आर्थिक बाजू भक्कम होईल. इतकेच नव्हे तर बचतीत काही भर पडेल. उद्योगात नवे पर्व सुरू होईल. मनात नसलेली कामे पुरी होतील. शुभ दिनांक १३–१४

**महिलांना :** तब्येतीची काळजी करू नका. नोकरीत बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** लॉटरीचा लाभ घ्या. मोठे यश पदरात पडेल.

**कुंभ : शुभयोग**

राजकारणी डावपेच करण्यात तुमचा हात धरणारा दुसरा कोणी माणूस नाही. पण शुभ ग्रह असले, तर हे डावपेच यशस्वी व्हावा तसा काळ आहे. रवी-मंगळ भाग्यस्थानी आले असून, कुंभ राशीबरोबर त्रिकोणयोग करीत आहेत. त्यामुळे यश व उत्कर्ष यांचे वरदान तुम्हाला लाभणार आहे. तुमच्या मनात असलेल्या फारा दिवसांच्या इच्छाआकांक्षा यावेळी पुऱ्या होतील. महत्त्वाच्या जबाबदाऱ्या अंगावर पडतील व त्या पार पाडण्यात तुमचे यशस्वी कर्तृत्व पणाला लागेल. आर्थिक बाजू सुधारेल. नोकरीत अत्यंत अनुकूल असे परिवर्तन घडून येईल. शुभ दिनांक १०–११

**महिलांना :** नोकरीत अधिकारप्राप्ती होईल.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक क्षेत्रात बुद्धिमत्तेचे कौतुक होईल.

**मीन : आर्थिक सुस्थिती**

मन:स्थितीच्या नाजूक परिस्थितीतून तुम्ही आता बाहेर पडणार आहात. काही चांगले घडेल. तब्येत सुधारेल. कर्तृत्वशक्ती जागी होईल. लेखनात पुढे पाऊल पडेल. लिहिलेले साहित्य लोकप्रिय होईल. अनेकांबरोबर आर्थिक व्यवहार सुलभ होतील. पैशाची टंचाई भासणार नाही. रेस-लॉटरीत भाग घेत असाल तर तो घ्यावा. स्थावराचा तंटा–प्रश्न सुलभ रीतीने सुटून निकाली निघेल. तुमच्यापैकी एखादा भाग्यवान यावेळी परदेशवारीदेखील करून येईल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील काही हितकारक असे घडेल. फार तर बदली होऊ शकेल. एकंदरीत आठवडा प्रगतिकारक आहे. शुभ दिनांक १२–१३

**महिलांना :** माहेरी उत्तमपैकी कौटुंबिक सुख तुम्हाला लाभणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** नवे वाहन मिळून मन आनंदी होईल.


**पॅपिलॉन**
**पॅपिलॉन**

**लेखक : हेन्री शॅरीयर**
**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**किंमत : पंचवीस रुपये**
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# पॅपिलॉन पुस्तक योजना

## पांचवे पुस्तक

'लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी' ही श्री. पु. ल. इनामदारांची माणूसमधून बहुत गाजलेली लेखमाला ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे. पॅपिलॉन योजनेतील ग्राहकांना एकूण पाच पुस्तके द्यायची ठरले आहे. पाचवे पुस्तक 'सिनेकलावंतांची चरित्रे' हे योजले होते. परंतु अद्याप या पुस्तकाचे हस्तलिखित, करार वगैरे सर्व सोपस्कार व्यवस्थित होऊनसुद्धा हाती आलेले नाही. योजनेतील पुस्तक नाहीतर एव्हाना ग्राहकांना मिळालेही असते. या पुस्तकाची अंदाजे किंमत वीस रुपये झाली असती. या पुस्तकाऐवजी श्री. इनामदार यांचे चालू आठवड्यात प्रसिद्ध होणारे पुस्तक पॅपिलॉन योजनेतील ग्राहकांना देऊन योजनेची पूर्तता करण्यात येणार आहे. इनामदारांच्या पुस्तकाची किंमतही वीस रुपयेच राहणार आहे.

ज्यांना 'सिनेकलावंतांची चरित्रे' हेच पुस्तक हवे असेल त्यांना आणखी काही काळ थांबावे लागेल. हस्तलिखित हाती आल्यावर दोन-तीन महिन्यात पुस्तक नक्कीच प्रसिद्ध होईल. परंतु हस्तलिखिताचाच भरवसा नाही– सिनेकलावंतांच्या लहरीची त्यालाही झळ पोचल्याशिवाय कशी राहणार? पॅपिलॉन योजनेतील पाच पुस्तकांपैकी तीन पुस्तकांचे वाटप पूर्ण झाले आहे. चवथे पुस्तकही काही ग्राहकांना रवाना झाले आहे. पाचवे व चौथे एकदम पाठवून पोस्टखर्च वाचवावा म्हणून चवथे सरसकट सर्वांना पाठविले नव्हते. आता दिवाळीच्या आगेमागे चवथ्या व पाचव्यापुस्तकाचे वाटप पूर्ण होईल. ज्यांना 'सिने कलावंतांची चरित्रे' या पुस्तकाऐवजी इनामदारांचे पुस्तक नको असेल त्यांनी मात्र ताबडतोब तसे कळवावे. नाहीतर सरसकट हा पुस्तक बदल ग्राहकांना सोयीस्कर आहे असे गृहीत धरून पूर्वीच्या तीन पुस्तकांप्रमाणे पोस्ट इत्यादी खर्चाची व्ही. पी. करून ही पुस्तके ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून रवाना होतील.

समक्ष नेणाऱ्यांनी माणूस कचेरीच्या वेळात पावती दाखवून पूर्वीप्रमाणेच पुस्तके न्यावीत.
९ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर पर्यंत.

व्यवस्थापक, राजहंस प्रकाशन


प्रसिद्ध झाले

**लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी**

**१९४८ – ४९**

लेखक : पु. ल. इनामदार

किंमत : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ पुणे ३०.